सत्यमेव जयते

अल्पसंख्याक कल्याण समिती

२०१३-२०१४

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) सर्वंकष विकासासाठी शासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा आढावा घेऊन त्यात योग्य त्या सुधारणा सुचविणारा अहवाल.

पहिला अहवाल

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ११ जून २०१४ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
जून, २०१४.

अल्पसंख्याक कल्याण समिती

२०१३-२०१४

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

पहिला अहवाल

(सदर अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक ११ जून, २०१४ रोजी सादर करण्यात आला.)

अल्पसंख्याक कल्याण समिती

(२०१३-२०१४)

समिती प्रमुख

१. श्री. बाबा सिद्धीकी, वि.स.स.

समिती सदस्य

***२. रिक्त

३. श्री. अस्लम शेख, वि.स.स.

४. श्रीमती ॲनी शेखर, वि.स.स.

५. श्री. नवाब मलिक, वि.स.स.

६. श्री. मिलिंद (आण्णा) कांबळे, वि.स.स.

७. श्री. गिल्बर्ट मेंडोन्सा, वि.स.स.

८. श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स.

९. श्री. प्रदीप जयस्वाल, वि.स.स.

१०. श्री. अबु आसिम आझमी, वि.स.स.

११. श्री. अब्दुल रशीद ताहीर मोमिन, वि.स.स.

*१२. रिक्त

**१३. रिक्त

१४. श्री. अब्दुल खान दुर्राणी, वि.प.स.

१५. श्री. नागो गाणार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

(४) श्री. घ. ज्ञा. देवडवार, कक्ष अधिकारी.

उपरोक्त समिती दिनांक २८ ऑक्टोबर २०१३ रोजी नामनिर्देशित करण्यात आली.

* श्री. एम. एम. शेख, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च २०१४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यामुळे रिक्त.

** श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यामुळे रिक्त.

*** श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी यांचा दिनांक २ जून २०१४ रोजी मंत्रिमंडळात समावेश झाल्याने रिक्त.

अल्पसंख्यांक कल्याण समिती
(सन २०१२-२०१३)

समिती प्रमुख

१. श्री. बाबा सिद्धीकी, वि.स.स.

समिती सदस्य

२. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
३. श्री. अस्लम शेख, वि.स.स.
४ श्रीमती ॲनी शेखर, वि.स.स.
५ श्री. नवाब मलिक, वि.स.स.
६ श्री. गिल्बर्ट मेंडोसा, वि.स.स.
७ श्री. मिलिंद (आण्णा) कांबळे, वि.स.स.
८ श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स.
९ श्री. बबनराव घोलप, वि.स.स.
१० श्री. अबु आसिम आझमी, वि.स.स.
११ श्री. मुफ्ती मोहम्मद ईस्माईल खलीक, वि.स.स.
१२ श्री. एम. एम. शेख, वि.प.स.
१३ श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
*१४ श्री. अब्दुल खान दुर्राणी, वि.प.स
**१५ श्री. प्रविण पोटे पाटील, वि.प.स

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

उपरोक्त समिती दिनांक ६ जून २०१२ रोजी नामनिर्देशित करण्यात आली.

* ॲड. उषाताई दराडे, वि.प.स यांची सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अब्दुल खान दुर्राणी, वि.प.स यांची मा. सभापतींनी सदस्य म्हणुन दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी नामनियुक्ती केली.

** श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स यांची सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. प्रविण पोटे पाटील, वि.प.स यांची मा. सभापतींनी सदस्य म्हणुन दिनांक ३ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली.

अल्पसंख्याक कल्याण समिती

(सन २०११-२०१२)

समिती प्रमुख

१. श्री. बाबा सिद्धीकी, वि.स.स.

समिती सदस्य

२. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
३. श्री. अस्लम शेख, वि.स.स.
४. श्रीमती ॲनी शेखर, वि.स.स.
५. श्री. नवाब मलिक, वि.स.स.
६. श्री. गिल्बर्ट मेंडोसा, वि.स.स.
७. श्री. मिलिंद (आण्णा) कांबळे, वि.स.स.
८. श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स.
९. श्री. बबनराव घोलप, वि.स.स.
१०. श्री. अबु आसिम आझमी, वि.स.स.
११. रिक्त
१२. श्री. जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स.
१३. श्री. एम. एम. शेख, वि.प.स.
१४. ॲड. उषाताई दराडे, वि.प.स.
१५. श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

उपरोक्त समिती दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी नामनिर्देशित करण्यात आली.

अनुक्रमणिका

अ.क्र	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
(१)	प्रस्तावना	(सात)
(२)	अहवाल	१
(३)	परिशिष्ट “अ” मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून प्राप्त झालेली माहिती.	२९
(४)	परिशिष्ट “ब” महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून प्राप्त झालेली माहिती ..	५५
(५)	परिशिष्ट “क” अल्पसंख्याक विकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती ..	६३
(६)	परिशिष्ट “ड” समितीच्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त.	१५१

प्रस्तावना

मी, अल्पसंख्याक कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांची अल्पसंख्याक कल्याण समिती या नावाची संयुक्त समिती दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी सर्वप्रथम स्थापन करण्यात आली. सदर समितीचा हा पहिला अहवाल आहे. त्याअनुषंगाने समितीच्या स्थापनेची पुर्वपिठीका जाणून घेणे आवश्यक आहे.

राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) विकासासाठी राज्य शासन राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व परिणामकारकरित्या संनियंत्रण करून या समाजाचा सर्वांगीण विकास साधणे तसेच शासनाच्या विविध योजनांची संबंधित क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांमार्फत प्रभावी अंमलबजावणी होऊन या समाज घटकातील लोकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या योजनांचा लाभ झाला किंवा कसे याची तपासणी करणे, शासन राबवित असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या, निर्धारित उद्दिष्ट साध्य झाले किंवा कसे इत्यादी बाबींचा सर्वंकष आढावा घेऊन अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करण्याच्या दृष्टीने तसेच महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल विचारात घेऊन त्यावर शासनाला सुनियोजित अशी उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने अल्पसंख्याक कल्याण समिती गठीत करण्यात आली.

उपरोक्त नमूद उद्दीष्ट परिणामकारकरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने समितीची रचना करण्यात आली. त्यासाठी समितीची एकूण सदस्य संख्या १५ ठेवण्यात आली. त्यातील ११ सदस्य विधानसभेतील असतील. उर्वरित सदस्यांपैकी एक महिला सदस्या अल्पसंख्याक समाजातील असतील. ह्या अल्पसंख्याक समाजातील महिला सदस्या नसल्यास खुला प्रवर्गातील महिला सदस्या असतील. विधानपरिषदेतील ४ सदस्य असतील. त्यापैकी ३ सदस्य हे अल्पसंख्याक महिला सदस्या असतील. महिला सदस्या नसल्यास खुला प्रवर्गातील महिला सदस्या असतील अशी तरतूद करण्यात आली.

अल्पसंख्याक कल्याण समितीने सर्वप्रथम अल्पसंख्याक प्रवर्गासाठी शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची तसेच राज्य शासन अंमलबजावणी करत असलेल्या केंद्र शासनाच्या योजनांची माहिती अल्पसंख्याक विभागाकडून मागविली. सदर योजनांचा समितीने साधकबाधक विचार केला. योजनांबाबतची अधिक माहिती व परिणामकारकता विचारात घेण्यासाठी व शासनास त्यात योग्य ते बदल सुचविण्याच्या दृष्टीने समितीने अल्पसंख्याक विभाग तसेच वक्फ बोर्ड व मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या अधिका-यांसमवेत बैठका आयोजित केल्या.

त्याअनुषंगाने समितीस प्राप्त झालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी संबंधित विभागाच्या सचिवांनी दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने या अहवालात अभिप्राय व शिफारशी केल्या आहेत.

समितीने दिनांक १५ मे, २०१४ रोजी प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक १५ मे, २०१४.

बाबा सिद्धीकी
समिती प्रमुख,
अल्पसंख्याक कल्याण समिती.

अहवाल

महाराष्ट्र विधीमंडळात प्रथमच अल्पसंख्याक कल्याण समिती सन २०११-२०१२ या वर्षासाठी गठीत करण्यात आली. अल्पसंख्याक कल्याण समितीने अल्पसंख्याक विभागाकडून अल्पसंख्याक प्रवर्गाच्या विकासासाठी शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती वेळोवेळी मागवून घेतली. तसेच यासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागासह वक्फ बोर्ड तसेच मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या अधिका-यांसमवेत चर्चा केली.

प्रथमच गठीत झालेल्या अल्पसंख्याक कल्याण समितीच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या प्रारंभिक बैठकीत समितीने पुढील बाबी निश्चित केल्या.

१. अल्पसंख्याक प्रवर्गातील काही जाती शेड्युल-१ आणि शेड्युल-२ मध्ये मोडतात. सदरहू जातीमुळे त्यांना देय असलेल्या सवलती ते घेतात तथापि, अल्पसंख्याक समाजातून सुद्धा योजना/सवलतींचा फायदा घेतात. अशा त-हेने दुहेरी लाभ घेणा-यांवर प्रतिबंध आणण्याबाबत कोणत्या उपाययोजना करणे शक्य आहे त्याबाबत पडताळणी करणे.

२. केंद्र व राज्य सरकारच्या अल्पसंख्याक समाजासाठी राबविण्यात येणा-या योजनांची अल्पसंख्याक विकास विभागाकडून माहिती घेणे.

३. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गेल्या तीन वर्षांत अल्पसंख्याकांसाठी कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत त्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून किती निधी प्राप्त झाला, किती खर्च झाला व किती अखर्चित राहिला या बाबतची माहिती विभागाकडून मागविणे.

४. संपूर्ण राज्यात वक्फ बोर्डाची मालमत्ता विकसित करताना कोणत्या अटी व शर्तींच्या अधीन राहून 'ना-हरकत प्रमाणपत्र' देण्यात आले व वक्फ बोर्डावर सद्य:स्थितीत कोणते सदस्य कार्यरत आहेत याबाबतची माहिती संबंधितांकडून मागविण्यात यावी.

५. वक्फ बोर्डाच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या सद्य:स्थितीबाबत आढावा घेण्यात यावा.

समितीच्या दिनांक ८ मे, २०१२ रोजीच्या बैठकीत प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग तसेच व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांच्यासह संबंधित अधिका-यांची साक्ष आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीच्या अनुषंगाने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून प्रश्नावलीच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाली. **(परिशिष्ट अ)**

उक्त बैठकीत समितीने सर्वप्रथम अल्पसंख्याक विकास विभागाबाबतची माहिती तसेच सद्य:स्थितीत विभागाकडून करण्यात येत असलेल्या कामाबाबतची माहिती देण्यास सांगितले. विभागीय सचिवांनी यासंदर्भात असे नमूद केले की, दिनांक ९ ऑक्टोबर, २००६ मध्ये अल्पसंख्यांक आयोगाच्या संबंधातील अधिसूचनेन्वये स्वतंत्र विभाग निर्मीतीची घोषणा करण्यात आली आणि दिनांक २१ फेब्रुवारी, २००८ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने अल्पसंख्याक विकास विभागाची निर्मिती केली. या विभागास कॅबिनेट मंत्री व राज्यमंत्री आहेत. अपर मुख्य सचिवासह या विभागामध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ मधील एकंदर कर्मचा-यांची संख्या ६९ आहे. त्यापैकी ५१ पदे भरण्यात आली आहेत आणि १८ रिक्त आहेत. अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय स्तरावर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई इत्यादी कार्यालये आहेत. राज्यात अल्पसंख्याक संचालनालय असावे असा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीसाठी वेगळी पदे आहेत. मात्र सध्या अकादमी स्वतंत्र नसून ती विभागाचाच एक भाग आहे. तसेच याची जिल्हास्तरावर अंमलबजावणी व्हावी म्हणून सर्व जिल्ह्यांसाठी महसूल व वन विभागामार्फत दिनांक ९ सप्टेंबर, २०१० रोजी शासन निर्णय काढण्यात आला. त्यानुसार प्रत्येक जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले, अल्पसंख्याक विकास विभाग नवीन असल्यामुळे सदरहू योजनांमध्ये बदल करून त्यानुसार शाळांना पायाभूत सुविधेंतर्गत जिल्हाधिका-यांमार्फत चार योजना राबविल्या जातात. अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम या योजनेतंर्गत महानगरपालिका/नगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मूलभूत नागरी सोयी सुविधांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. तसेच राज्य पोलिसांची भरती करण्याअगोदर प्रशिक्षण सेवा केंद्रे सुरू करण्यात येतात. यामध्ये जिल्हाधिका-यांतर्गत एक समिती नेमण्यात आली असून त्यामार्फत सदरहू योजना राबविली जाते. केंद्र शासनाच्या एम.एस.डी.सी. मार्फत कार्यक्रम होत असतो. प्रौढ शिक्षणाची बाब शालेय योजनेच्या अंतर्गत येते. यासाठी अल्पसंख्याक संचालक असे पद निर्माण केलेले आहे.

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यासाठी निधी दिला आहे किंवा कसे तसेच त्या अनुषंगाने सन २००८-२००९, सन २००९-२०१०, सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ मध्ये किती निधी खर्च झाला आहे या समितीच्या प्रश्नाच्या अनुषंगाने विभागाच्या प्रतिनिधीनी समितीच्या निदर्शनास आणले की, अल्पसंख्याक समाजातील १ ते ४ इयत्तेच्या विद्यार्थ्यांना सन २००८-२००९ पासून गणवेश देण्यात येतो. सन २००९-२०१० मध्ये २१ कोटी रुपयांची तरतूद यासाठी करण्यात आली होती आणि प्रत्यक्ष खर्च देखील २१ कोटी रुपये करण्यात आला असून, यातील लाभार्थींची संख्या ५ लाख इतकी आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना तसेच उर्दू शाळेच्या

विद्यार्थ्यांनादेखील गणवेष वाटप करण्यात येते काय? या प्रश्नावर ही योजना जिल्हा परिषदेच्या शाळेतील १ ते ८ इयत्तेतील विद्यार्थी तसेच बी.पी.एल. आणि एस.सी., एस.टी. यांच्यासाठी आहे. तसेच ही योजना जिल्हा परिषदेच्या अनुदानित आणि खाजगी शाळांना देखील लागू आहे असे समितीसमोर विदित करण्यात आले. शालेय शिक्षण विभागामार्फत हजारो कोटी रुपयांची योजना सुरू असताना अल्पसंख्याक विकास विभागाचा निधी त्याठिकाणी का देण्यात येत आहे? शासन निर्णयामध्ये असा उल्लेख आहे की, विद्यार्थ्यांना दुहेरी लाभ घेता येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना गणवेश मिळत नाही त्यांना ते पुरविण्याचे काम शिक्षण विभागामार्फत होत असताना परत यासाठी निधी देण्याची गरज नाही असे मत समितीने व्यक्त केले. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, खाजगी संस्थांच्या प्राथमिक शाळा यामध्ये शिकणा-या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात येतो काय? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी उत्तर दिले की, यात दोन योजना आहेत, पहिली योजना अशी आहे की, शासकीय, खाजगी अनुदानित व विना अनुदानित प्राथमिक शाळेतील, इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळा वगळून इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरविण्यात येतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्र्य रेषेखालील असणा-या विद्यार्थिनींना सर्व शिक्षा अभियानांतर्गत गणवेश दिला जातो.तसेच शालेय शिक्षण विभागामार्फतही अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी/विद्यार्थिनींना गणवेश दिला जातो. जिल्हा परिषदेतील इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या अल्पसंख्याक विद्यार्थी/विद्यार्थिनींना गणवेश दिला जातो. विद्यार्थ्यांना गणवेशाचा दुहेरी लाभ मिळणार नाही याची दक्षता घ्यावी असा यासंबंधीच्या शासन निर्णयामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थी/विद्यार्थिनींना गणवेशाचा दुहेरी लाभ देण्यात येत नाही. राज्यातील शासकीय, खाजगी अनुदानित व विना अनुदानित प्राथमिक शाळेतील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळा वगळून इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ दिला जातो. सर्व शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या एस.सी., एस.टी.व बी.पी.एल. इत्यादी प्रवर्गातील विद्यार्थिनींना गणवेशाचा लाभ देण्यात येतो.

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी/विद्यार्थिनींना अजून कोणत्या योजनेचा लाभ देण्यात येतो या समितीच्या विचारणेनुसार विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, राज्यातील इयत्ता ५ वी व ७ वी मध्ये शिक्षण घेणा-या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकरिता पालकांना प्रोत्साहन भत्ता देणे अशीही योजना राबविण्यात येत आहे. अल्पसंख्याक समाजातील मागासलेपण दूर होण्यासाठी तसेच अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांचे शाळा गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळा वगळून इतर वरिष्ठ प्राथमिक शाळेत इयत्ता ५ वी व ७ वी मधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रतिदिवस रुपये २/- या प्रमाणे वर्षाचे कमाल २२० दिवस ग्राह्य

धरुन विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीकरिता प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. अल्पसंख्याक समाजातील ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के आहे, त्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ देण्यात येतो. ७५ टक्के उपस्थितीचे प्रमाण हे शासनाने निश्चित करून दिलेले आहे. एका विद्यार्थ्यासाठी एका वर्षाची ४४० रुपये एवढी रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून देतो. सदर योजना ही संचालक, प्रौढ शिक्षण यांच्याकडून राबविली जाते. सदर योजनेचा निधी हा परस्पर या योजनेच्या लेखाशीर्षाखाली जमा केला जातो. प्राथमिक शाळांच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकरिता पालकांना प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी सन २००९-१० या वर्षासाठी ३० कोटी ८५ लाख २८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सदरहू रक्कम पूर्णपणे खर्च करण्यात आली आहे. तर सन २०१०-११ या वर्षासाठी १८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यातील १६ कोटी २० हजार रुपयांची तरतूद खर्च करण्यात आली आहे. यामध्ये सन २००९-१० या वर्षी ६ लाख ८४ हजार ४४ व सन २०१०-११ या वर्षी ६ लाख ८६ हजार विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर भत्त्याचे वाटप करण्यात आले आहे, असेही समितीसमोर विदित करण्यात आले.

तसेच सन २००९-१० या वर्षासाठी ३० कोटी तर सन २०१०-११ या वर्षासाठी १८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. २ हजार लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या वाढूनही कमी निधी उपलब्ध होण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता पायाभूत सुविधा तसेच शिष्यवृत्ती देण्यासाठीची तरतूद वाढविण्यात आली आहे. शिष्यवृत्ती योजनेसाठी सन २००९-१० मध्ये १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती व सर्व १५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. सन २०१०-११ मध्ये ४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. तथापि, प्रत्यक्षात ५४ कोटी रुपये खर्च करण्यात आले. सन २०११-१२ मध्ये ७२ कोटी ६८ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली व प्रत्यक्ष खर्च ७० कोटी १८ लाख रुपये इतका करण्यात आला. गणवेश योजनाकरिता सहायक अनुदान यासाठी सन २००९-२०१० मध्ये २१ कोटी व सन २०१०-२०११ या वर्षासाठी १६.२० कोटी रुपये खर्च झाले. पालकांना इन्सेन्टिव्ह देणे यासाठी सन २००९-२०१० मध्ये ३.८५ कोटी, सन २०१०-२०११ मध्ये १६.२० कोटी खर्च झाले. आयटीआय संस्थांना सहाय्यक अनुदान यासाठी सन २००९-२०१० या वर्षात तरतूद केली नव्हती. सन २०१०-२०११ मध्ये २ कोटी रुपये खर्च झाले. क्षेत्र विकास योजनेकरिता सहायक अनुदान यासाठी सन २००९-२०१० मध्ये १४.७३ कोटी व सन २०१०-२०११ मध्ये १४.६८ कोटी रुपये खर्च झाले. मुलींच्या वसतिगृहांकरिता सहायक अनुदानासाठी २००९-२०१० मध्ये ४ कोटी व सन २०१०-२०११ मध्ये ४ कोटी ५० लाख रुपये खर्च झाले. अल्प कालावधीत व्यवसायावर आधारित पाठ्यक्रमांकरिता सहायक अनुदान यासाठी २००९-२०१० मध्ये १ कोटी ८६ लाख व सन २०१०-२०११ मध्ये ३ कोटी ३६ लाख रुपये खर्च झाले. पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता सहायक अनुदान यासाठी सन २००९-२०१० मध्ये १५ कोटी ३६ लाख व सन २०१०-२०११ मध्ये ३७ कोटी ७५ लाख रुपये खर्च झाले. ज्या शाळांमध्ये ७० टक्के विद्यार्थी अल्पसंख्याक समाजाचे आहेत त्यांना या सुविधा देण्यात येतात. त्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर समिती गठीत

करण्यात आलेली आहे. सदर समिती छाननी करते. त्यासाठी शाळेची मागील ३ वर्षांची आर्थिक स्थिती विचारात घेतली जाते. शाळांना जो पैसा देण्यात येतो तो शाळेच्या व्यवस्थापनाकडून खर्च करण्यात येतो, असेही समिती समोर सांगण्यात आले.

तसेच नवीन तंत्रनिकेतन सुरू करण्यासाठी सन २००९-२०१० मध्ये योजना केली होती. परंतु आर्थिक तरतूद करण्यात आली नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी/तिसरी पाळी सुरू करण्याकरिता सहायक अनुदान यासाठी सन २००९-१० मध्ये तरतूद केली नव्हती. सन २०१०-२०११ मध्ये १ कोटी ८० लाख रुपये खर्च करण्यात आले. उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना यासाठी सन २००९-२०१० मध्ये १५ कोटी व २०१०-२०११ मध्ये ५४ कोटी ७२ लाख रुपये खर्च करण्यात आले.

जे विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतात त्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. त्यानुसार जे विद्यार्थी आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील असतील त्यांना ई.बी.सी. चा व अल्पसंख्याक योजनांमधूनही शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला पाहिजे. या समितीच्या अभिप्रायावर अल्पसंख्याक प्रवर्गामधील ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला असेल त्या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते यासाठी सन २००९-१० या वर्षात १५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. ७८४ विद्यार्थ्यांचा कोटा वाढवून देण्यात आला आहे. गेल्या वर्षी १० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. अनेक पालकांमध्ये असा गैरसमज होता की, ज्यांनी कर्ज घेतले आहे त्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येत नाही. ज्यांना शिष्यवृत्ती पाहिजे ते विद्यार्थी अर्ज करु शकतात. ज्यांनी कर्ज घेतले असेल ते विद्यार्थीही शिष्यवृत्तीचा अर्ज करण्यास पात्र आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांकडे शाळा सोडल्याचा दाखला मागितला जातो असेही समितीसमोर सांगण्यात आले.

महाराष्ट्राच्या शेजारील कर्नाटक, बिहार व मध्यप्रदेश या राज्यात अल्पसंख्याकासाठी कोणत्या योजना राबविण्यात येत आहेत तसेच त्या ठिकाणी अल्पसंख्याक संचालनालय स्थापन करण्यात आले आहे काय या संबंधीची माहिती संबंधित राज्यांकडून घेण्यात आली आहे काय ? या समितीच्या प्रश्नावर सदर माहिती घेण्यात येत आहे असे उत्तर देण्यात आले. त्यावर समितीने इतर राज्यात अल्पसंख्याक संचालनालय असो अथवा नसो ते महाराष्ट्र राज्यात सुरू करण्यात यावे, अशी सूचना केली.

त्यानंतर समितीने नागरी दलित वस्त्यांमध्ये ज्याप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतात त्याप्रमाणे मुस्लिम वस्त्यांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. यासाठी अर्थसंकल्पामध्ये वेगळे लेखाशीर्ष ठेवण्यात यावे, अशी विभागास सूचना केली.

अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक वसतिगृह उभारण्यात येणार आहे. या वसतिगृहासाठी लागणा-या जमिनी किती जिल्ह्यांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत आणि किती जिल्ह्यामध्ये अद्याप त्या उपलब्ध व्हावयाच्या आहेत, या योजनेची अंमलबजावणी झालेली आहे काय या समितीच्या प्रश्नावर दिनांक २ मार्च, २०१० मध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक वसतिगृह बांधण्याचा शासन निर्णय घेण्यात

आला आहे. या अनुषंगाने चंद्रपूर, औरंगाबाद, नंदूरबार आणि परभणी या चार जिल्ह्यांमध्ये सन २००९-२०१० मध्ये प्रत्येक जिल्ह्याला एक कोटी रुपये निधी वितरित केलेला आहे. सन २०१०-२०११ मध्ये अमरावती, पनवेल या प्रत्येक जिल्ह्यासाठी एक कोटी रुपये निधी वितरित करण्यात आलेला आहे. तसेच कोल्हापूर, भंडारा या प्रत्येक जिल्ह्यासाठी सव्वा कोटी रुपये निधी वितरित केलेला आहे. हे सर्व पैसे जिल्हाधिका-यांना दिलेले आहेत व जिल्हाधिका-यांकडे जमिनीची मागणी करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने जागा मिळाली आहे व बांधकामाला सुरुवात झालेली आहे. या वसतिगृहांचे फक्त बांधकाम शासनामार्फत करण्यात येणार असून ती चालविणे आणि त्यांची देखभाल करणे ही कामे एन.जी.ओं. मार्फत करण्यात येणार आहेत. सदरहू योजनेत अनेक संदिग्धता असल्यामुळे याबाबत सुस्पष्टता असणारी योजना तयार करावयाची सूचना समितीने विभागास केली.

अनुदानासाठी पात्र असलेल्या संस्थांकडून शासनामार्फत अहवाल मागितला जातो. त्याअनुषंगाने उर्दू माध्यमाच्या शाळांकडून अनुदानासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. तथापि, संगणकीय प्रणालीमध्ये करण्यात आलेल्या व्यवस्थेमुळे ज्या वर्गात ३० विद्यार्थ्यांपेक्षा कमी विद्यार्थी असतील तर सदर अर्ज संगणकाकडून स्वीकारण्यात येत नाही अशी वस्तुस्थिती निदर्शनास आणताच अल्पसंख्याक शाळेत १५ विद्यार्थी असतील तरी वर्ग चालविण्याची तरतूद एस.एस. कोड मध्ये आहे. त्यामुळे एस.एस. कोडचे पालन व्हावे, असे समितीने अभिप्राय व्यक्त केले.

राज्यात फक्त १५ जिल्ह्यांत अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर समितीने उर्वरीत २० जिल्ह्यात एक महिन्यात अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्याची सूचना विभागाला केली.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ :—

अल्पसंख्याक कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग तसेच व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांचा साक्षीपुरावा नोंदविण्यात आला.

व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांनी महामंडळाच्या कामकाज व कार्यपद्धतीबाबत माहिती विषद करताना नमूद केले की, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना दिनांक २८ सप्टेंबर, २००० रोजी कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत करण्यात आलेली आहे. दिनांक २८ मार्च, २००८ पर्यंत सदर महामंडळाचा कार्यभार रोजगार व स्वयंरोजगार विभाग सांभाळत होते. तद्नंतर १३ ऑक्टोबर, २००८ पासून अल्पसंख्याक विभागाकडे कार्यभार आला. दिनांक १ डिसेंबर, २०११ पासून महामंडळाची १५ जिल्हा कार्यालये सुरू करण्यात आली आहेत. उर्वरित २० जिल्ह्यांचा अतिरिक्त कार्यभार सदरच्या जिल्हा कार्यालयातील अधिका-यांकडे सोपविण्यात आलेला

आहे. महामंडळाचे प्राधिकृत भाग भांडवल रुपये २५० कोटी एवढे आहे. सन २००१ ते २०१२ पर्यंत शासनाने महामंडळास रुपये १७९.३९ कोटी एवढे भाग भांडवल अदा केले आहे. शासनाने महामंडळास राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्लीकडून उपलब्ध होणा-या कर्जासाठी रूपये. ६० कोटी एवढी शासन हमी दिली आहे. सन २०११-१२ पर्यंत महामंडळाने राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवं वित्त निगमकडून ५६.३४ कोटी रुपये एवढे कर्ज घेतले आहे. त्यापैकी ३० कोटी रुपये परत केलेले आहे. २००१ पासून आतापर्यंत ७३, २२५ लाभार्थ्यांना ३३६ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केलेले आहे. त्यापैकी ५१, ०११ एवढया लाभार्थ्यांना २०३ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केलेले आहे. या महामंडळाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. मौलाना आझाद थेट कर्ज योजना राबविली जात आहे. या योजने अंतर्गत लाभार्थ्यांस ५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. सदर कर्ज हे ६ टक्के दराने दिले जाते.यामध्ये लाभार्थ्याने ५ टक्के स्वगुंतवणूक करावयाची असते. यानंतर उन्नती मुदत कर्ज योजने मार्फत लाभार्थ्यास ५ हजार ते १ लाखापर्यंत कर्ज ६ टक्के दराने उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये देखील लाभार्थ्याने स्वगुंतवणूक ५ टक्के एवढी करावयाची आहे. त्याचप्रमाणे राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना राबविली जात आहे. ही योजना केंद्र राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवं वित्त निगमच्या माध्यमातून राबविली जात आहे. या योजने अंतर्गत विद्यार्थ्याना ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. त्यानंतर मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना महामंडळामार्फत राबविली जात आहे. या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना २.५० लाख रुपये एवढया मर्यादेपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्याचप्रमाणे सुक्ष्म पतपुरवठा योजना राबविण्यात येते. या योजनेतून प्रति विद्यार्थी २५ हजार रुपये कर्ज उपलब्ध करून दिले जाते. महिला समृद्धी योजने अंतर्गत महिला बचत गटांमार्फत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्याचप्रमाणे शेतकरी व मच्छिमारांसाठी कर्ज योजना आहे, परंतु ती योजना चालू झाली नाही. राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना आणि मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना कर्ज रुपाने अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

सन २०११-२०१२ मध्ये मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत किती अर्जदारांना शैक्षणिक कर्ज देण्यात आले आहे अशी समितीने विचारणा केली असता, व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ यांनी जवळपास १५४४ विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मंजूर केले असल्याची तसेच यासंदर्भातील जवळपास २५०० प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती समितीला दिली.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास शासन आणि केंद्र शासनातील अल्पसंख्याक विभागाकडून २५० कोटी रुपयांचे भाग भांडवल उपलब्ध करून देण्यात आले आहे. काही भाग भांडवल कर्ज रुपाने महामंडळास मिळाले आहे. महामंडळांतर्गत काही कर्ज योजना राबविल्या जात आहेत, राष्ट्रीयीकृत बँकाकडून काही कर्ज योजना राबविल्या जात आहेत, त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या देखील काही कर्ज योजना आहेत. या योजनांमध्ये पुनरावृत्ती होत असल्याचे दिसून आले आहे. मौलाना आझाद महामंडळाची स्थापना झाली तेव्हापासून अशी मागणी होती की, महामंडळाकडे २५० कोटी रुपयांच्या भाग

भांडवलावर २५०० कोटी रुपयांची उलाढाल झाली पाहिजे. महामंडळाकडे २५० कोटी रुपयांचे भाग भांडवल असल्यामुळे २५०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध होऊ शकते व तेवढे कर्ज उपलब्ध करून द्यावयास पाहिजे अशी संकल्पना शासन स्तरावर मांडली गेली होती. राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका यांच्या बरोबर टायअप करून लाभार्थ्यांना सीड मनी भरण्यासाठी बँकाकडून कर्ज रुपाने पैसे उपलब्ध करून दिले पाहिजे. सीड मनी भरण्यासाठी लाभार्थ्यास बँकाकडून कर्ज उपलब्ध करून दिले तर लाभार्थ्यांची आर्थिक अडचण दूर होण्यास मदत होईल. शैक्षणिक कर्ज योजना आहेत, त्या लाभार्थ्यांना देखील बँकाच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे. यासाठी राष्ट्रीयकृत बँका आणि सहकारी बँका यांच्या बरोबर टायअप केले पाहिजे.लाभार्थ्यांना कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असतो, त्यावेळी प्रथम त्याला सीड मनी भरावे लागते. लाभार्थ्यांस १० लाख रुपयांचे कर्ज घ्यावयाचे असेल तर त्यास सीड मनी म्हणून प्रथम १.५० लाख रुपये भरावे लागतात. सीड मनी न भरलेल्या लाभार्थ्यास कर्ज मिळू शकत नाही. लाभार्थ्यास सीड मनी भरण्यासाठी बँकेच्या माध्यमातूनच कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँका बरोबर महामंडळाने टायअप करावे. महामंडळास गेल्या दहा वर्षात २५० कोटी रुपये भाग भांडवल म्हणून प्राप्त झाले आहेत. महामंडळाकडून साधारणतः १ लाख लाभार्थ्यांना कर्ज वाटप केलेले आहे. २५०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध झाले असते तर १० लाख लाभार्थ्यांना कर्ज योजनेचा लाभ देता आला असता. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या कार्य पद्धतीमध्ये काही तरी बदल झाला पाहिजे. महामंडळाने राष्ट्रीयकृत बँका आणि सहकारी बँका यांच्या बरोबर टायअप करून लाभार्थ्यांना लागणारी सीड मनीची रक्कम देखील बँकेच्या माध्यमातून कर्ज रुपाने उपलब्ध करून दिली पाहिजे. लाभार्थ्यांस १ लाख रुपये मंजूर केले तर त्यास १० टक्के गुंतवणूक स्वतः करावी लागते. सदर गुंतवणुकीचे पैसे लाभार्थ्यांस बँकेकडून कर्जाच्या रुपाने उपलब्ध करून दिले तर त्यांना स्वतःची गुंतवणूक करण्याची आवश्यकता भासणार नाही. तत्कालिन मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांची देखील या संदर्भात अशीच संकल्पना होती. त्या अनुषंगाने त्यांनी बैठका देखील घेतल्या होत्या.त्या बैठकीत त्यांनी अशाच प्रकारची सूचना देखील केली होती. त्यांनी महामंडळाच्या अधिका-यांना त्यावेळी सांगितले होते की, महामंडळास २५० कोटी रुपयांचे भाग भांडवल देतो. परंतु आपण राष्ट्रीयीकृत बँका आणि सहकारी बँका यांच्या बरोबर टायअप करून २५०० कोटी रुपयांपर्यंतची उलाढाल केली पाहिजे. त्याअनुषंगाने समितीची अशी सूचना आहे की, राष्ट्रीयीकृत बँका आणि सहकारी बँका यांच्या बरोबर टायअप करून आपल्याकडे असलेल्या २५० कोटी रुपयांमध्ये २५०० कोटी रुपयांची उलाढाल झाली पाहिजे अशा प्रकारची एखादी योजना तयार करावी.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ :—

अल्पसंख्याक कल्याण समितीची बैठक दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ व दिनांक २९ नोव्हेंबर, २०१२ रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड यांची साक्ष आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून प्रश्नावलीच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाली. सदरहू विस्तृत माहिती **परिशिष्ट ब** मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

उक्त लेखी माहितीमध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची निर्मिती सन २००२ मध्ये करण्यात आली. मंडळाची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे. वक्फ मंडळाच्या अधिनस्त मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी राज्यस्तरावर काम पहातात. त्यांच्या अधिनस्त प्रादेशिक वक्फ अधिकारी व जिल्हा वक्फ अधिकारी हे काम पहातात. वक्फ मंडळाच्या बैठकीत वक्फ अधिनियम, १९९५ च्या तरतूदीनुसार व महाराष्ट्र वक्फ नियम, २००३ अन्वये नोंदणी /मुतवली/विश्वस्त/व्यवस्थापन समिती/ॲडहॉक कमिटी/ प्रशासक/ रिसीव्हर यांच्यावर देखरेख करण्याची व वक्फ संरक्षणाची जबाबदारी मंडळावर आहे. वक्फ अधिनियम, १९९५ च्या वेगवेगळया कलमाखाली प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून नोंदणी करणे, व्यवस्थापनासाठी समिती गठीत करणे, वक्फांच्या मालमत्ता भाडेपट्टयांवर देणे इत्यादी प्रस्ताव जिल्हा वक्फ अधिकारी व प्रादेशिक वक्फ अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या शिफारशीने वक्फ मंडळाच्या सभेत ठेवून मान्यता घेणे व वक्फ मंडळाच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणे. तसेच अर्ध न्यायालयीन प्रक्रिया (Quasi Judicial) पार पाडणे.

सन २०१२-२०१३ च्या वार्षिक अंदाजपत्रकात रुपये ७, ६९, ८०, ००० इतकी तरतूद करण्यात आली आहे. वक्फ मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची आहे. अल्पसंख्याक प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी अशी कोणतीही योजना वक्फ मंडळाकडे शासनाकडून देण्यात आलेली नाही व त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद वक्फ मंडळाकडे वर्ग करण्यात आलेली नाही.

सद्यःस्थितीत केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला कोणतेही नियमीत वा आवर्ती अनुदान प्राप्त होत नाही. तथापि, केंद्र शासनाकडून संगणकीकरणासाठी (एन.आय.सी.) वामसी प्रकल्पाकरिता एकूण रक्कम रुपये ३४, २३, ५६४ प्राप्त झाले असून त्यापैकी रुपये २२, ९२, ९४१ एवढी रक्कम खर्च झाली आहे. उर्वरित रक्कम रुपये ११,३०,६२३ शिल्लक असून त्याचा ही संगणकाच्या कामासाठी लवकर विनियोग करण्यात येणार आहे. शिवाय, केंद्र शासनाने राज्यातील विविध वक्फ मंडळांच्या बळकटीकरणासाठी एक योजना राबविण्याचे प्रस्तावित असून सदर योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत (२०१२-२०१७) एकूण वार्षिक रुपये ७५.१३ लक्ष इतके सहाय्यक अनुदान केंद्र शासनाकडून अपेक्षित असून या अनुदानात केंद्र शासनाने वार्षिक ५% वाढ गृहित धरली आहे. सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही.

वक्फ मंडळाच्या निर्मीतीपासून (सन २००२) वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ३७ प्रमाणे वक्फ मालमत्तांच्या तपशीला संबंधित नोंदवही ठेवण्यात येत आहे. आतापर्यंत ५८९१ वक्फांची नोंदणी करण्यात आली असून उर्वरित वक्फ संस्थाची नोंदणी होण्याच्या दृष्टिने महाराष्ट्र वक्फ मंडळाकडून प्रयत्न सुरू आहेत.

राज्यात वक्फ बोर्डाची मालमत्ता विकसित करतांना कोणत्या अटी व शर्तींच्या अधीन राहून "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात आले या समितीच्या प्रश्नावर वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ३२ (४) मधील तरतुदीनुसार विविध वक्फ संस्थांनी मागणी केल्याप्रमाणे त्या वक्फ संस्थांच्या संबंधीत असलेल्या वक्फ मिळकती विकसीत करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यात मुख्य अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. विकसीत केल्यानंतर सदर मिळकतीचे कायमस्वरुपी हस्तांतर होणार नाही, मालकी वक्फ संस्थेची राहील.

२. वक्फ संस्थांनी विकसित केलेल्या इमारतीमध्ये वक्फ संस्थेसाठी काही भाग कायमस्वरुपी द्यावा.

३. विकसीत करताना ज्या विकासकाला विकासाचे काम देण्यात येते ते त्यांचे दर वक्फ संस्थेला परवडणारे असावेत.

वक्फ बोर्डाच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या कामाची सद्यस्थिती काय आहे या प्रश्नाच्या अनुषंगाने याबाबतचा अहवाल शासनाच्या विचाराधीन असल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले.

वक्फ बोर्डाच्या साक्षी दरम्यान समितीच्या पुढीलप्रमाणे बाबी निदर्शनास आल्या आहेतः—

वक्फ बोर्डाची स्थापना सन २००२ मध्ये झाली. संपूर्ण राज्यात वक्फ बोर्डाच्या कर्मचारी वर्गाची संख्या ४९ आहे. त्यात मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद वर्ग-१ चे आहे. बाकी ४८ पदे वर्ग-३ व वर्ग-४ ची आहेत. वक्फ बोर्डाचे प्रादेशिक कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, नागपुर व अमरावती येथे आहेत. तर जिल्हा कार्यालय औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद व लातूर येथे आहेत. सध्या वक्फ बोर्डावर तीन सदस्य आहेत. वक्फ बोर्डाच्या एकुण चार बैठका झालेल्या आहेत. बैठकीची विषयसूची मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड तयार करतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे रजिस्ट्रेशन मैनेजमेंट कमिटीचे तसेच डॉक्यूमेंटेशन व रिकव्हरीचे काम आहे.

समितीस प्राप्त झालेल्या लेखी माहितीत नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र वक्फ बोर्डाकडे एकुण शेतजमिन क्षेत्र ३१०५९ हेक्टर ७ आर जमिन असून बिन शेती जमिनीचे क्षेत्र २६७२ हेक्टर ७८ आर जमीन आहे. प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या कृती दलाच्या (Task Force) अहवालानुसार सुमारे ७०% वक्फ मालमत्तांवर बेकायदेशीर ताबा/अतिक्रमण

अस्तित्वात आहेत. महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या अधिपत्याखालील नेमकी किती जमीन अतिक्रमण मुक्त आहे व कोणाला किती भाडे आकारुन भाडेपट्टयावर देण्यात आलेली आहे याबाबत देखील निश्चित माहिती उपलब्ध नाही. तसेच अपुरे कर्मचारीवृंद अपु-या निधीअभावी या बाबतचे सर्वेक्षण हाती घेणे वक्फ मंडळाला शक्य होत नाही. वक्फ बोर्डाच्या जमिनीतून निधीची उभारणी करण्यात तसेच वक्फ जमिनीच्या सॅटलाईट सर्वे/विडियोग्राफीक सर्वे करण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला. तसेच संपूर्ण महाराष्ट्रात वक्फ बोर्डाची किती जमीन आहे, किती जमिनीवर अतिक्रमण झाले आहे, किती जमीन भाडेपट्टीवर दिली आहे तसेच अतिक्रमणमुक्त किती जमीन आहे याबाबतची माहिती समितीस तात्काळ पाठविण्याच्या सूचनाही विभागास देण्यात आल्या.

समितीने बैठकीत अनेक मुद्दयांवर चर्चा केली त्यात विशेषत: एखाद्या विधीमंडळ सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यानंतर त्यांची वक्फ बोर्डावरील नेमणूक कायम राहते किंवा संपुष्टात येते याबाबत मुद्दा उपस्थित झाला असता त्यावर, विधी व न्याय विभागाचे अभिमत मागविण्याचा निर्णय समितीने घेतला तसेच वक्फ बोर्डावरील रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत वक्फ बोर्डाला आदेशित केले.

एखाद्या विधीमंडळ सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यानंतर त्यांची वक्फ बोर्डावरील नेमणूक कायम राहते किंवा संपुष्टात येते याबाबत प्रधान सचिव, विधी व विधीविधान यांनी पुढीलप्रमाणे अभिमत व्यक्त केले.

"The term of the member of Waqf Board should be co-terminus with the term of MLA/MLC. But we have to go by the provisions of law and it is a matter of interpretation. At present there is no provision in the Wakf Act to provide that the term of the Member of the State Board of Wakf will be made co-terminus with his term of the Member of the State Legislature. The Minorities Development Department has forwarded draft notification after incorporating the words and figure "for a period of 5 years with effect from the date of this notification or till he ceases to be a Member of the Legislative Council, whichever is earlier". Section 15 of the Wakf Act, 1995 provides that the Members of the State Wakf Board shall hold office for a term of five years. This provision is clear and specifically provides that once such Member is appointed, his term will be of 5 years even if he may have ceased to be a Member of the State Legislature."

त्यावर सचिव, विधी व न्याय विभाग यांनी पुढीलप्रमाणे माहिती समितीस विषद केली.

"Both the provisions are contradictory. This has been accepted by the High Court of Kerala. In case of Kutty Haji *V/s* State of Kerala (2008(3)KLT

1004), decided on 14th August 2008, the Kerala High Court has held that "One Muslim member of the Legislative Assembly is elected as the member of the Wakf Board, he will have to continue in office for five years in the absence of a specific provision that when he ceases to be a member of the Legislative Assembly, automatically his membership in the Wakf Board also will cease and this Court cannot fill the allowed gap and the Legislature is free to add such a clause in the Wakf Act if it is really needed. But it is not for the Court to fill up the gaps imagining the intention of the Legislature." Thus the proposed notification of the Minorities Development Department, using the words and figure "for a period of 5 years with effect from the date of this notification or till he ceases to be a Member of the Legislative Council, whichever is earlier", would be contrary to Section 15 of the Wakf Act, 1995. Even the Parliament has realised that there is a lacuna in law and an amendment has already been moved. The Bill was passed by the Lok Sabha and is pending in the Rajya Sabha.Even the Court has agreed that there is lacuna."

उपरोक्त नमूद विसंगती दूर करण्यासाठी संबंधित कायद्यात दुरुस्ती करावयास हवी या समितीच्या अभिप्रायावर प्रधान सचिव, विधी व विधीविधान यांनी पुढीलप्रमाणे माहिती समितीस दिली.

"The Central Government has taken initiative in this regard. In this regard, a provision for the purpose is proposed in the Wakf (Amendment) Bill, 2010, which was introduced in the Lok Sabha on the 27th April 2010 as Bill No. 53 of 2010. The Bill was passed by the Lok Sabha on 7th May 2010 and is pending in the Rajya Sabha. The Report of the Select Committee on the Wakf (Amendment) Bill, 2010 was presented to the Rajya Sabha on the 16th December 2011."

त्यानंतर समितीने वक्फ बोर्डावरील रिक्त पदांच्या निवडणुकीबाबत माहिती घेतली.

बोर्डाची मालमत्ता भाडेपट्टयाने देण्याची कार्यपद्धती कोणत्या प्रकारे अवलंबविली जाते अशी विचारणा समितीने केली असता, वक्फ बोर्डाची जमीन सर्वप्रथम तीन वर्षाच्या भाडेकराराने भाड्यावर दिली जाते. त्यानंतर संबंधित संस्थेला सदरहू जमीन भविष्यकाळामध्ये किती कालावधीकरिता भाड्याने देण्यात यावी, याचा निर्णय घेतला जातो. वक्फ बोर्डाने काही समाज व राष्ट्राचे कल्याण करणा-या संस्थांना भाडेपट्टा कराराने जमिनी दिलेल्या आहेत. त्यापैकी काही जमिनींचे भाडे वेळेवर बोर्डाला प्राप्त होते. परंतु काही जमिनींचे भाडे वसूल करण्याकरिता पुरेसा कर्मचारीवर्ग नाही. काही ठिकाणी वसुली करणे कठीण जाते. वक्फ बोर्डात १०६ कर्मचारी भरण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे. त्यानंतर समितीने वक्फ बोर्डाच्या रिक्त जमिनींवर अतिक्रमण होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचेही सुचित केले.

समितीने बैठकीत विभागाकडून पुढील मुद्दयांची माहिती मागविण्याचा निर्णय घेतला.

१. राज्यामध्ये सध्या दलित वस्ती सुधार कार्यक्रम सुरू आहे. त्यासाठी दलित विकास निधी उपलब्ध करून देण्यात येतो. त्याच धर्तीवर अल्पसंख्याक समाजाच्या कोणत्या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे त्यासाठी "विशेष निधी" ची तरतूद करण्याबाबतची उपाययोजना आखण्यात यावी.

२. वक्फ बोर्डाच्या जमिनींवरील अतिक्रमण थांबविण्यासाठी सदर जमिनींचा व्हिडीयोग्राफीक सर्वे करण्याबाबत विभागाकडून अभिप्राय मागविण्यात यावे.

३. मंदिरांना ज्याप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येतो त्याप्रमाणे राज्यातील दर्ग्यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत विभागाकडून माहिती मागविण्यात यावी.

४. राज्यातील उर्दू शाळांमध्ये उर्दू शिक्षकांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबतच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात यावा.

उपरोक्त बैठकीतील निर्णयांसह, अल्पसंख्यांक कल्याण समितीच्या दिनांक ८ मे, २०१२ ते दिनांक २७ नोव्हेंबर, २०१३ या कालावधीत झालेल्या बैठकांमध्ये करण्यात आलेल्या चर्चेच्या अनुषंगाने अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय यांच्याकडून सर्वंकष अशी माहिती खालील मुद्दांप्रमाणे मागविण्यात आली.

(१) जिल्हा परिषदेच्या योजनेमध्ये फक्त मुलींना गणवेश देण्यात येतात तर अल्पसंख्यांक विभागाच्या स्कीममध्ये मुली तसेच मुलांना गणवेश पुरविण्यात येतात, त्यामुळे योजनेचे डयुप्लीकेशन होते किंवा कसे याबाबतची माहिती.

(२) राज्यातील अल्पसंख्यांक कल्याण समाजाच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिद्धी देण्याबाबतची सहायक अनुदान योजनेची माहिती.

(३) अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतीगृहाची संपूर्ण योजना तयार करणेबाबतची माहिती.

(४) अल्पसंख्यांक समाजातील व्यक्तींवर झालेल्या अन्याय, अत्याचारासंदर्भात छाननी केल्याचा अहवाल.

(५) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडे असलेल्या २५० कोटी रुपयांच्या भाग भांडवलाच्या अनुषंगाने अल्पसंख्यांकांसाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करण्याची योजना तसेच इतर योजनांचा समावेश असलेली एक सर्वसमावेशक योजना विभागाने तयार करणेबाबतची माहिती.

(६) गत दहा वर्षात वक्फ बोर्डाच्या किती जमिनीवर अतिक्रमण झाले आहे? कोणाला किती जमीन किती भाडेपट्टी आकारुन दिली आहे? वक्फ बोर्डाच्या ज्या जमिनीवर अतिक्रमण झाले नाही अशी किती जमीन आहे याबाबतची माहिती.

(७) श्री. जैनुद्दिन जव्हेरी हे विधानमंडळाचे सदस्य असताना त्यांची वक्फ बोर्डावर "सदस्य" म्हणून निवड झाली होती, कालांतराने त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आले तरी त्यांची वक्फ बोर्डावरील नेमणूक कायम राहिली. त्या पार्श्वभूमिवर एखाद्या विधीमंडळ सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यानंतर त्यांची वक्फ बोर्डावरील नेमणूक कायम राहते किंवा संपुष्टात येते याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिमत.

(८) जैन, शिख, ख्रिश्चन व बौद्ध लोकांसाठी अल्पसंख्याक विभागाच्या कोणत्या योजना आहेत? उक्त लोकांना या योजनांचा फायदा मिळाला आहे किंवा कसे याबाबतची माहिती.

(९) वक्फ बोर्डावरील नियुक्ती प्रक्रियेबाबत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास अवगत करण्याबाबत.

(१०) वक्फ बोर्डाच्या जिल्हानिहाय जमिनींची माहिती. त्यातील किती जमिनींची "शासनाची जमीन" अशी नोंद आहे याबाबतची माहिती.

(११) वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमणांची माहिती व बोर्डाच्या जमिनीचा सॅटेलाईट सर्व्हे करणे.

(१२) एखाद्या विधीमंडळ सदस्यास आपले वेतन वक्फ बोर्डास देता येऊ शकते काय तसेच लोकवर्गणी जमा करून वक्फ बोर्डास देता येऊ शकते काय याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिमत.

(१३) धर्माच्या आधारावर जनगणना करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून अशा धर्माच्या आधारावर केलेल्या जनगणनेची विस्तृत माहिती (प्रवर्गनिहाय)जनगणना आयोगाकडून घेऊन समितीस सादर करण्यात यावी.

(१४) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते त्या धर्तीवर अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते किंवा कसे याबाबतची माहिती.

(१५) सन २०१३-२०१४ च्या राज्याच्या अर्थसंकल्पात अल्पसंख्याकासाठी शैक्षणिक तसेच विकासात्मक बाबींसाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे याबाबतची माहिती.

(१६) राज्यात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण इत्यादी शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या सोयीसवलती देण्यात येतात? त्यासाठी शासनाकडून किती खर्च करण्यात येतो त्याबाबतची माहिती.

(१७) राज्यामध्ये " दलित वस्ती सुधार कार्यक्रम " सुरू आहे व त्यासाठी " दलित वस्ती निधी " देण्यात येतो. त्याअनुषंगाने राज्यात अल्पसंख्याक समाजाच्या कोणत्या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे व अल्पसंख्याक समाजासाठी " दलित वस्ती निधीच्या " आधारावर अल्पसंख्याकांसाठी " विशेष निधी " उपलब्ध करून देता येईल काय ? याबाबत विभागाचे अभिप्राय देण्यात यावे ?

(१८) अल्पसंख्याक प्रवर्गात " बौद्धाचा " देखील समावेश आहे तसेच बौद्ध धर्मातील काही जाती अनुसूचित जातीमध्ये येतात त्याअनुषंगाने अल्पसंख्याक प्रवर्गात येणा-या बौद्ध समाजास तसेच अनुसूचित जातीमध्ये येणा-या बौद्धांना कोणत्या कोणत्या सवलती/सुविधा देण्यात येतात ?

(१९) अनुसूचित जातीमध्ये येणारे " बौद्ध " व अल्पसंख्याक प्रवर्गामध्ये येणारे " बौद्ध " या दोन्हींमध्ये काय तफावत आहे?

(२०) उपरोक्त दोन्ही प्रवर्गातून सवलती/सुविधा किंवा लाभ प्राप्त करण्यात आल्याची उदाहरणे आढळून आली आहेत काय? असल्यास अशा त-हेचा दुहेरी लाभ प्राप्त करण्यापासून रोखण्यासाठी विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात आली ?

(२१) यापुर्वी वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींचे सॅटेलाईट सर्वे करण्याबाबत आपल्या विभागास कळविण्यात आले होते त्याअनुषंगाने आदेश निर्गमित करण्यात आल्याचे विभागाने कळविले होते. वक्फ बोर्डाची मालकी असलेली जमीन राज्यभरात विखुरलेल्या स्वरुपात असल्याने अशा जमिनींचा अचूक सॅटेलाईट सर्वे करणे व अतिक्रमण झाले असल्याचे शोधणे शक्य आहे किंवा कसे याबाबत विभागाचे अभिप्राय देण्यात यावेत.

(२२) वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींचे सॅटेलाईट सर्वे शक्य नसल्यास व्हीडीयोग्राफीक सर्वे करणे उपयुक्त ठरु शकेल किंवा कसे याबाबत विभागाचे अभिप्राय देण्यात यावे.

(२३) वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींचे सॅटेलाईट सर्वेऐवजी व्हीडीयोग्राफीक सर्वे केल्यास त्यास किती खर्च येणे व किती कालावधी लागणे अपेक्षित आहे याबाबतची विस्तृत माहिती, प्रस्ताव व अंदाजित खर्च याबाबत माहिती.

(२४) सदर खर्चासाठी करावयाचा निधी शासनाकडून उपलब्ध होऊ शकतो किंवा कसे याबाबतचे विभागाचे अभिप्राय देण्यात यावे.

(२५) सच्चर समितीच्या किती व कोणत्या शिफारशी शासनाने स्विकारल्या आहेत व त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात आली आहे याबाबतची माहिती देण्यात यावी. तसेच अन्य कोणत्या शिफारशींची अंमलबजावणी प्रलंबित आहे याबाबतची माहिती.

(२६) ज्याप्रमाणे मंदिरासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो त्याप्रमाणे राज्यातील दर्ग्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो काय व नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत याबाबत विभागाने अभिप्राय द्यावेत.

(२७) राज्यात जास्तीत जास्त उर्दू शाळांना मान्यता देण्याबाबत तसेच राज्यातील शाळांमध्ये उर्दू शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिका किंवा खाजगी उर्दू शाळांमध्ये मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था करण्याबाबत तसेच इतर मूलभूत सुविधांबाबत विभागाकडून काय पाठपुरावा करण्यात आला ?

(२८) राज्यात अल्पसंख्याक वर्गातील उमेदवारांसाठी शासकीय, निमशासकीय सार्वजनिक उपक्रम, वैधानिक मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानावर चालविल्या जाणा-या शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठांमधील नोक-यांमध्ये आरक्षण आहे काय ?

(२९) असल्यास, मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन उमेदवारांसाठी प्रत्येकी किती टक्के पदे आरक्षित आहेत ? उक्त उमेदवारांना बढतीमध्ये आरक्षण आहे काय ? असल्यास प्रत्येकी किती टक्के ?

(३०) सद्यःस्थितीत राज्यात शासकीय सेवेतील अल्पसंख्याकांच्या किती पदांचा अनुशेष भरणे बाकी आहे ? सदर अनुशेष भरण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे ?

(३१) भिवंडी तसेच मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत दोन वर्षांपुर्वी घोषणा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने भिवंडी व मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे? नसल्यास होत असलेल्या विलंबाची कारणे व याप्रकरणाची सद्यःस्थिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून मागविण्यात यावी.

(३२) राज्यात अल्पसंख्याक विकास विभागाकडून अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांची तपशीलवार माहिती देण्यात यावी.

त्याअनुषंगाने अल्पसंख्याक विकास विभागाकडून दिनांक ९ जानेवारी २०१४ रोजी माहिती प्राप्त झाली असून ती **(परिशिष्ट-क)** मध्ये समाविष्ट आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाकडून दिनांक ९ जानेवारी २०१४ रोजी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १५ जानेवारी २०१४ रोजी प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग; अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग; मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड; प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग; प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची साक्ष आयोजित केली.

सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या स्कीममध्ये फक्त मुलींना गणवेश देण्यात येतात. तर अल्पसंख्याक विकास विभागाच्या स्कीममध्ये मुली तसेच मुलांना गणवेश पुरविण्यात येतात. त्यामुळे योजनेचे ड्युप्लीकेशन होते किंवा कसे या बाबतची माहिती द्यावी. तसेच सर्व मुलांना गणवेश वाटप करण्याबाबतची योजना असताना अल्पसंख्यांक विभागाकडून वेगळा गणवेश वाटप करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे शासनाचे दुप्पट पैसे खर्च होतात. याबाबत काय केले जाणार आहे? त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, सदर बाब लक्षात आल्यानंतर या वर्षापासून ही योजना बंद करण्यात आली आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत एससी/एसटी आणि बीपीएल या प्रवर्गातील मुलांना गणवेश देण्याची योजना देखील बंद करण्यात आली आहे.

प्री मॅट्रिक व पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप बाबतची सद्यःस्थिती समितीला सांगताना शिक्षण सहसंचालक, पुणे यांनी नमूद केले की, शालेय शिक्षण विभागामार्फत सन २०१३-२०१४ या वर्षात ७ लाख ८८ हजार १७७ विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मंजूर केलेली आहे. या स्कॉलरशिपचे पैसे उपलब्ध झाले असून ते विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये ऑनलाईन भरण्यास सुरूवात झालेली आहे. १६ लाख २४ हजार विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप करिता अर्ज केले होते. इयत्ता ६ वी ते १० वीतील एका विद्यार्थ्याला १ हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जाते. प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांनी यासंदर्भात समितीस अशी माहिती दिली की, या संदर्भात केंद्र शासनाचा वाटा ७५ टक्के तर राज्य शासनाचा वाटा २५ टक्के इतका असतो.

या संदर्भात मिळालेले पैसे विभाग खर्च करु शकले नाही.सन २०१२-२०१३ मध्ये प्राप्त झालेल्या ८० कोटी रुपयांपैकी ३६ कोटी रुपये खर्च झालेले आहेत.त्यावर शिक्षण सहसंचालक, पुणे यांनी नमूद केले की, प्रधान सचिव पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीबाबत सांगत आहेत. आमच्याकडे शिष्यवृत्तीपोटी मिळालेल्या निधीच्या खर्चाबाबतची आकडेवारी आहे. प्राप्त झालेल्या निधीनुसार सर्व विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीचे पैसे विभाग जमा करते.ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर आहे, त्या सर्वांच्या खात्यामध्ये विभाग शिष्यवृत्तीचे पैसे जमा करते.यामध्ये विद्यार्थ्याच्या खाते उघडण्यातील अडचण वगैरे तुरळक केसचा अपवाद असतो.सन २०१२-२०१३ करिता ४२ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. या वर्षीचा निधी अद्याप प्राप्त व्हावयाचा आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करून पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप बाबतची सद्यःस्थिती समितीला सांगताना प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण, पुणे यांनी असे नमूद केले की, इयत्ता १२ वी पासून ते पीएचडी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीची योजना लागू आहे. सन २०१३-२०१४ या वर्षासाठी महाविद्यालयीन शिक्षणासंदर्भातील पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेसाठी १ लाख ३ हजार २४० विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ४५१८९ विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले.पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती ७ हजार रुपये ते १४ हजार पर्यंत असून जसा अभ्यासक्रम असेल त्याप्रमाणे शुल्क असते. अनेक विद्यार्थ्यांना उक्त योजनेची माहिती होत नसल्याच्या पार्श्वभूमिवर प्रवेशाच्या वेळेस विद्यार्थ्यांना योजनेची माहिती होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत विद्यापीठाच्या माध्यमातून प्राचार्यांना बंधनकारक करावे असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.तसेच वार्षिक उत्पन्न २.५ लाखापर्यंत असणा-या अल्पसंख्याकांना योजनेचा फायदा मिळतो त्यामुळे अनेक गरजू विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २.५ लाखावरून १.५ लाख इतकी करण्याची व १.५ लाख उत्पन्न असणा-यांना संपूर्ण शुल्क मिळण्याची आवश्यकता समितीने व्यक्त केली.

उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये तेलगू शिक्षकांना पाठविण्यात येत असल्याचे यावेळी समितीच्या निदर्शनास आले. या पार्श्वभूमिवर समितीने राज्यातील उर्दू शिक्षकांच्या संख्येबाबत विचारणा केली असता सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, राज्यात उर्दू शिक्षकांची ६०८ पदे रिक्त आहेत. सीईटीच्या संदर्भात उच्च न्यायालयात केस सुरू आहे. केसचा निकाल लागल्यानंतर हा प्रश्न सुटू शकेल. त्यावर समितीने असे अभिप्राय व्यक्त केले की, उर्दू शाळांत आरक्षणाप्रमाणे भरती केली पाहिजे. परंतु, अनुसूचित जातीमध्ये उर्दू लिहिणारे, बोलणारे डी.एड् किंवा बी.एड् केलेले उमेदवार मिळत नाहीत. अनुसूचित जमातीमध्ये काही प्रमाणात असे शिक्षक मिळतात.अनुसूचित जातीमध्ये उर्दू शिक्षक मिळत नसतील तर उर्दू शिक्षकांचा कोटा इतर भाषेसाठी वर्ग केला पाहिजे आणि हे पद आरक्षण मुक्त केले पाहिजे असेही समितीने नमूद केले.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिका किंवा खाजगी उर्दू शाळांमध्ये मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था तसेच इतर मुलभुत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत काय? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी राज्यात ४, ७३१ शाळा आहेत आणि मुलांसाठी ३, ८९६ टॉयलेट आहेत असे उत्तर दिले. त्यावर समितीने ९०० शाळामंध्ये अशी सुविधा उपलब्ध नसल्याचे अभिप्राय व्यक्त करून याबाबतची जिल्हानिहाय माहिती १५ दिवसात उपलब्ध करून देण्याची सूचना शालेय शिक्षण विभागास केली.

भिवंडी तसेच मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत दोन वर्षांपुर्वी घोषणा करण्यात आली होती. तथापि, अद्यापही सदर महाविद्यालयाची स्थापना झालेली नसल्याने विलंबाची कारणे काय आहेत या समितीच्या प्रश्नावर प्रधान सचिव, अल्पसंख्याक विभाग यांनी समितीस माहिती दिली की, भिवंडी व मालेगांव येथील निवीदा निघाल्या होत्या. केंद्र शासनाचे निकष बदलल्यानंतर पुन्हा निवीदा निघाल्या. यामध्ये वित्तीय तसेच प्रशासकीय मान्यतेचा अंतर्भाव आहे. महाराष्ट्रातील तंत्र निकेतन महाविद्यालयांमध्ये खुप जागा विनाप्रवेशामुळे रिक्त आहेत. मालेगावमध्ये ५११ जागा रिक्त आहेत. भिवंडीत तंत्र निकेतन महाविद्यालय नाही. ठाणे व उपनगरात ८९९ जागा रिक्त आहेत. त्यामुळे वित्त विभाग नवीन तंत्र निकेतन महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देत नाही.

ठाणे जिल्ह्यात तंत्रनिकेतन महाविद्यालये नेमकी किती व कुठे आहेत तसेच ८०० जागा कुठे रिक्त आहेत ते वित्त व नियोजन विभागास विनिर्दिष्टरित्या कळवावयास हवे असे सुचित करून समितीने संचालनालयाकडून ठाणे जिल्ह्यातील तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रवेशाची तालुकानिहाय स्थिती देण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागास आदेशित केले.

राज्यामध्ये “दलित वस्ती सुधार कार्यक्रम” सुरू आहे व त्यासाठी “दलित वस्ती निधी” राज्य शासनाकडून देण्यात येतो. त्या आधारावर अल्पसंख्याक विभागामार्फत ज्या योजना राबविण्यात येतात त्या करिता किती निधीची तरतूद करण्यात येते या समितीच्या प्रश्नाबाबत साधारणपणे २० लाख रुपये दिले जातात अशी माहिती समितीस देण्यात आली.

त्याअनुषंगाने समितीने दलित वस्ती सुधार योजनेसाठी निधीची तरतूद असते त्याप्रमाणे अल्पसंख्याक वस्तीमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे सुचित करून विभागास नगरविकास विभागाकडून ए, बी, सी आणि डी ग्रेड अनुसार संबंधीत ठिकाणी कोणत्या कोणत्या सुविधा उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत त्याबाबत प्रस्ताव मागविण्याची सूचना केली.

मंदिरांकरिता ज्या पद्धतीने निधी उपलब्ध करून देण्यात येतो त्या प्रमाणे दर्ग्यांकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबतची सद्यःस्थिती समितीस विषद करताना ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेकरिता दरवर्षी साधारणपणे २५ ते ३० कोटी रुपयांची तरतूद केली जाते. तीर्थक्षेत्रांना ‘ अ ’, ‘ ब ’ व ‘ क ’ असा दर्जा असतो. राज्यस्तरावर ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांना ‘ ब ’ वर्गाचा दर्जा देऊन तेथील भक्तनिवास बांधकाम सारख्या विकास कामांकरिता निधी उपलब्ध करून दिलेला आहे. दिनांक १६ नोव्हेंबर २०१२ पूर्वी एका देवस्थानाकरिता १ कोटी रुपयांच्या मर्यादेत निधी दिला जात होता. राज्यस्तरावर एकंदर १७६ देवस्थानांना ‘ ब ’ वर्गाचा दर्जा दिलेला आहे. त्यामध्ये ७ दर्ग्यांचे प्रस्ताव आले होते, ते प्रस्ताव समिती समोर मांडून त्यांना ‘ ब ’ वर्गाचा दर्जा देऊन निधी उपलब्ध करून दिलेला आहे. ही केवळ ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या संदर्भातील माहिती आहे. शहरी विभागात हे काम नगर विकास विभागामार्फत केले जाते. त्याअनुषंगाने सदरहू बाब नगर विकास विभागाकडे सादर केलेली आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने विभागाने शासनास ‘ अ ’, ‘ ब ’ व ‘ क ’ अशा दर्जानुसार प्रस्ताव पाठविण्याची सूचना समितीने केली.

वक्फ बोर्डाच्या उर्वरित रिक्त जमीनीवर अतिक्रमण होऊ नये यासाठी व्हिडीयोग्राफिक सर्वे करण्याबाबत तसेच सदर जमीनीची माहिती समितीस देण्याबाबत वक्फ बोर्डास समितीने आदेशित केले.

तसेच समितीने वक्फ बोर्डाकडून गत ३-४ वर्षात किती सूतगिरण्या व पॉवरलूमना कर्ज देण्यात आले व कर्ज मागूनही न मिळालेल्या पॉवरलूमबाबतची माहिती देण्याबाबत वक्फ बोर्डास आदेशित केले.

अभिप्राय व शिफारशी :—

(१) अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती.

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक प्रवर्गासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची पुरेशी माहिती गरजू व पात्र लोकांपर्यंत पोहोचत नसल्यामुळे व त्यायोगे अनेक लाभार्थी योजनांचा लाभ मिळण्यापासून वंचित राहत असल्याचे साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले. या योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांना मिळण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांची राज्यात व्यापक व सर्वदूर प्रसिद्धी करण्यात यावी, अशी ही समिती शिफारस करीत आहे.

(२) राज्यात अल्पसंख्याक संचालनालय उभारण्याबाबत.

राज्यात अल्पसंख्याक संचालनालय स्थापन करण्यात यावे. संचालनालयाची कार्यकक्षा ठरविण्यात यावी.अल्पसंख्याक संचालनालयासाठी शासनाने तीन महिन्यात जमीन उपलब्ध करून द्यावी. तसेच संचालनालयाचे कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक तो अधिकारी व कर्मचारी वर्ग पुरविण्यात यावा तसेच वर्ग १ ते वर्ग ४ ची पदसंख्या निर्धारित करून उक्त पदे नव्याने अथवा प्रतिनियुक्तीने सत्वरतेने भरण्यात यावीत व याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्यात अवगत करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

(३) अल्पसंख्याकासाठी अर्थसंकल्पात वेगळी तरतूद - अल्पसंख्याकबहूल वस्तींसाठी विशेष निधी .

राज्यामध्ये दलित वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत ज्याप्रमाणे नागरी दलित वस्त्यांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतात त्याप्रमाणे अल्पसंख्याकबहूल वस्त्यांमध्ये पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. त्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येते त्या धर्तीवर अल्पसंख्याक प्रवर्गासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात विशेष निधीची स्वतंत्र लेखाशीर्षान्वये तरतूद करण्यात यावी व सदर योजना शहरी व ग्रामीण या दोन्ही भागातील अल्पसंख्याकबहूल वस्तीमध्ये राबविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(४) अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक वसतिगृह उभारण्याबाबत.

अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक वसतिगृह उभारण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने चंद्रपूर, औरंगाबाद, नंदूरबार, परभणी, अमरावती, रायगड, कोल्हापूर व भंडारा जिल्ह्यांमधील वसतीगृहांच्या बांधकामासाठी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. राज्यातील उर्वरित जिल्हांमध्ये वसतीगृह उभारण्यासाठी तात्काळ निधी वितरीत करण्यात यावा तसेच संबंधीत जिल्हाधिका-यांनी तात्काळ जमिनी उपलब्ध करून द्याव्यात यासाठी विभागामार्फत पाठपुरावा करण्यात यावा व त्याअनुषंगाने वसतीगृहांचे बांधकाम सत्वरतेने पूर्ण करून याचा लाभ जास्तीत जास्त मुलींना कसा मिळेल याबाबत शासनाने योग्य व तातडीने नियोजन करून याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत द्यावी.

उपरोक्त वसतिगृहांचे शासनामार्फत फक्त बांधकाम करण्यात येणार असून वसतीगृहे चालविणे आणि त्यांची देखभाल करणे ही कामे एन.जी.ओं. मार्फत करण्यात येणार आहेत. तथापि, या योजनेत अनेक बाबी संदिग्ध असल्यामुळे याबाबत सुस्पष्टता असणारी योजना अल्पसंख्याक विभागाने तीन महिन्यांत तयार करून समितीच्या अवलोकनार्थ पाठवावी, अशी समितीची शिफारस आहे.

(५) राज्यात उर्दू अंगणवाडया सुरू करणे.

केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक विभागाने ज्या वॉर्डमध्ये १५ टक्क्यांपेक्षा जास्त आणि विभागामध्ये ४० टक्क्यांपेक्षा जास्त अल्पसंख्याक असतील अशा अल्पसंख्याक बहूल क्षेत्रांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करून उर्दू माध्यमाची आंगणवाडी सुरू करण्याबाबतचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी गेल्या ३ वर्षांपासून देशात सुरू झालेली आहे. परंतु, राज्यात मात्र अद्यापही या कार्यक्रमाची अमलबजावणी होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. उक्त पार्श्वभूमिवर राज्यात सहा महिन्यात शिक्षकांच्या नेमणूका करून अल्पसंख्याकबहूल क्षेत्रांमध्ये उर्दू माध्यमाच्या आंगणवाडया सुरू करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात अवगत करण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.

(६) राज्यात जिल्हानिहाय अल्पसंख्याक कल्याण समिती नेमण्याबाबत.

शासन निर्णयानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक कल्याण समिती नेमणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत राज्यात केवळ १५ जिल्ह्यात अल्पसंख्याक कल्याण समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सबब, उर्वरीत जिल्ह्यात तात्काळ अल्पसंख्याक कल्याण समित्या स्थापण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्याच्या आत अवगत करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

(७) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडे असलेल्या भांडवलातून निधी उभारण्याबाबत.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडे सद्यःस्थितीत २५० कोटी रुपयांचे भाग भांडवल उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याअनुषंगाने महामंडळास २५०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध होऊ शकते. लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या निरनिराळया कर्ज योजनांच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना प्रथम सीड मनी भरावे लागते. सीड मनी भरल्याशिवाय लाभार्थ्यास कर्ज मिळू शकत नाही. अनेक लाभार्थ्यांची सीड मनी भरण्याइतकी आर्थिक कुवत नसते. परिणामी अर्जदारांना कर्ज योजनेचा लाभ मिळू शकत नाही. ही बाब टाळण्यासाठी लाभार्थ्यांना सीड मनी भरण्यासाठी बँकाकडून कर्ज रुपाने पैसे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीयीकृत बँका तसेच सहकारी बँका यांच्या बरोबर टायअप करण्यात यावे व २५० कोटी रुपयांमध्ये २५०० कोटी रुपयांची उलाढाल होईल अशा प्रकारची सर्वंकष योजना विभागाने तीन महिन्यात तयार करून त्यावर अंमलबजावणी करावी. तसेच मौलाना आझाद

अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांचेकडे शैक्षणिक कर्जाची जवळपास २,५०० प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती समितीसमोर देण्यात आली. याबाबतही योग्य तो मार्ग काढून या योजनांचा जास्तीत जास्त लाभ लाभार्थ्यांना मिळण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी व याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करण्यात यावे. तसेच ज्या उद्देशाने मौलाना आझाद अल्पसंख्याक आथिर्क विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे तो उद्देश सर्वार्थाने पुर्ण करण्यासाठी योग्य ते सर्व प्रयत्न करण्यात यावे. या महामंडळाचे ख-या अर्थाने सबलीकरण करण्याची नितांत आवश्यकता असून याअंतर्गत योजनांचा पुर्ण लाभ लाभार्थ्यांना मिळणेकरीता सकारात्मक दृष्टीकोन ठेवून योग्य ती पुढील कार्यवाही व उपाययोजना करावी व शासनाने यांसदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळवावी, अशी समितीची शिफारस आहे.

(८) वक्फ बोर्डासंदर्भात शिफारशी.

समितीने वक्फ बोर्डासमवेत घेतलेल्या बैठकांमध्ये समितीस असे आढळून आले की, वक्फ जमीनींवर प्रचंड प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. उक्त अतिक्रमणांचे प्रमाण इतके प्रचंड आहे की, वक्फ बोर्डाकडे याबाबत नेमकी माहिती देखील उपलब्ध नाही. तसेच अतिक्रमणमुक्त जमीनीची माहिती सुद्धा वक्फ बोर्डाकडे उपलब्ध नाही. वक्फ बोर्डाच्या किती जमीनींवर अतिक्रमणे झालेली आहेत ते सुनिश्चित करण्यात यावे. तसेच सदर अतिक्रमणे त्वरीत हटविण्यात यावीत व अतिक्रमण करणा-यांविरुद्ध कायदेशीर कारवाई तीन महिन्यांत करण्यात यावी.उर्वरीत जमीनींवर अतिक्रमण होऊ नये यासाठीही तात्काळ उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असून तसे न केल्यास वक्फ महामंडळाकडे शिल्लक असलेली जमीन देखील अतिक्रमीत होण्याची शक्यता आहे. यासाठी सदर जमीनींचा तात्काळ व्हिडीयोग्राफिक सर्वे करण्यात यावा व त्यासाठी आवश्यक निधी शासनाने उपलब्ध करून द्यावा तसेच त्याजागेवर अतिक्रमण रोखण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी व याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात अवगत करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

वक्फ बोर्डाने भाडेपट्टीवर दिलेल्या जमीनींचा तीन महिन्यात फेरआढावा घेण्यात यावा तसेच भाडेपट्टीमध्ये आवश्यक तेथे वाढ करण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

अपु-या कर्मचारी वर्गामुळे वक्फ बोर्डास उपरोक्त कामकाज पार पाडण्यात अडचण निर्माण होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने वक्फ बोर्डाने एकुण १०६ पदांच्या भरतीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास पाठविला आहे. सदरहू १०६ रिक्त पदे भरण्याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभागाने तात्काळ मान्यता द्यावी व तीन महिन्यात सदर पदे भरण्यात यावीत आणि याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस अवगत करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

राज्यातील वक्फ बोर्डाच्या किती जमिनींची "शासनाची जमीन" अशी नोंद आहे याबाबत महसूल विभागाने तीन महिन्यात अल्पसंख्याक विकास विभागामार्फत समितीस अवगत करावे तसेच यासंदर्भात पुढे कोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने शासनाने केलेली कारवाई याबाबतची माहितीदेखील समितीस देण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे. अतिक्रमण रोखण्यासाठी व असलेले अतिक्रमण हटविण्यासाठी आवश्यक असलेली सर्व यंत्रणा शासनाने पुरवावी व स्थानिक प्रशासनाने यात सहकार्य करणेबाबतही योग्य ते आदेश तातडीने शासनामार्फत पारित करावे, अशीही शिफारस ही समिती करीत आहे.

एखाद्या विधीमंडळ सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यानंतर त्याची वक्फ बोर्डावरील नेमणूक कायम राहते किंवा संपुष्टात येते याबाबत कायद्यात असलेली विसंगती दूर करण्याबाबत राज्यसभेत प्रलंबित असलेल्या विधेयकासंदर्भातील सद्य:स्थिती समितीस अवगत करण्यात यावी व यासंदर्भात केंद्र शासनाकडे देखील योग्य तो पाठपुरावा करण्यात यावा, अशी शिफारस ही समिती करीत आहे.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ प्रमाणे वक्फ मालमत्तांच्या तपशीलासंबंधित नोंदवही ठेवण्यात येत असून आतापर्यंत ५८९१ वक्फांची नोंदणी करण्यात आली असल्याचे व अद्यापही काही वक्फ संस्थाची नोंदणी होणे प्रलंबित असल्याचे समितीच्या साक्षीदरम्यान निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र वक्फ मंडळाने उर्वरित वक्फ संस्थाची नोंदणी सत्वरतेने करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करावे, अशी शिफारस समिती करीत आहे.

वक्फ बोर्डाच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल अद्याप शासनाच्या विचाराधीन असल्याची बाब समितीस पाठविलेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने निदर्शनास आली आहे. त्याअनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती समितीस अवगत करण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.

वक्फ बोर्डावरील काही सदस्यांची नियुक्ती ही महाराष्ट्र विधानसभा सदस्यांमधून होत असते. या प्रकरणी अशा नियुक्त्या व निवडणूक प्रक्रियेबाबतची विस्तृत माहिती विहित मुदतीत महाराष्ट्र विधीमंडळास अवगत करण्यात यावी तसेच निवडणूक जाहीर झाल्यास त्याबाबतही तातडीने महाराष्ट्र विधीमंडळास अवगत करावे, अशीही शिफारस समिती करीत आहे.

वक्फ बोर्डाच्या कामकाजाकडे शासनाने अधिक गांभिर्याने बघण्याची सद्य:स्थितीत नितांत आवश्यकता असून वक्फ बोर्डाच्या जमिनी अबाधित ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना शासनस्तरावरून करण्याचीही आवश्यकता आहे. वक्फ बोर्डामध्ये होत असलेले गैरव्यवहार व अनियमितता रोखण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलण्याची गरज आहेच तसेच निधीअभावी व कर्मचा-यांअभावी वक्फ बोर्डाला काम करण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून यादृष्टीने देखील आवश्यक ती उपाययोजना शासनस्तरावरून करण्यात येऊन बोर्डाचे सबलीकरण करण्याच्या दृष्टीने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून उपाययोजना करण्यात यावी, अशीही शिफारस ही समिती करीत आहे.

वक्फ बोर्डाची खरी मालमत्ता ही वक्फ बोर्डाच्या जमिनी हीच असून त्यावर मोठया प्रमाणात झालेले अतिक्रमण, ते हटविण्यास येत असलेले अपयश, शिल्लक जमिनीवर अधिक अतिक्रमण भविष्यात होऊ नये याबाबत शासनाकडून तातडीने करावयाची उपाययोजना तसेच या जमिनींच्या माध्यमातून वक्फ बोर्डाला काही निधी उभा करता येईल किंवा कसे यासंदर्भात नियोजन करणे या सर्व मुद्यांबाबत समिती अतिशय आग्रही असून त्याअनुषंगाने तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात व केलेल्या उपाययोजनांची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस देण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच सदस्यांची रिक्त असलेली पदेही तातडीने भरण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

(९) शैक्षणिक कर्ज योजना :

(अ) प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.

शालेय शिक्षण विभागाकडून अंमलबजावणी करण्यात येणा-या प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेनुसार इयत्ता ६ वी ते १० वीतील एका विद्यार्थ्याला १ हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जाते. सन २०१३-२०१४ या वर्षात १६ लाख २४ हजार विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरिता अर्ज केले होते.त्यातील ७ लाख ८८ हजार १७७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने ९ लाख विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व कमाल उत्पन्नाच्या मर्यादेच्या निकषानुसार सदर शिष्यवृत्तीचे वाटप केले जाते. अल्पसंख्याक प्रवर्गातील कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये यासाठी राज्य शासनाने प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या निकषांचा फेरआढावा घेण्याबाबत केंद्र शासनाकडे सत्वरतेने पाठपुरावा करावा व या योजनेसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध घेण्यात यावा.यासाठी जर काही निधी कमी पडल्यास तो राज्य शासनाने द्यावा अशीही आग्रहाची शिफारस ही समिती करीत आहे. तसेच याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करण्यात यावे.

प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेची माहिती वेळेवर मिळत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागते. यापुढे कोणताही विद्यार्थी प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहू नये यासाठी प्रवेशाच्या वेळेस विद्यार्थ्यांना योजनेची विस्तृत माहिती मिळण्याच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांना परिपत्रक/ माहितीपत्रक उपलब्ध करून देण्याबाबतची जबाबदारी सर्व विद्यालयांच्या मुख्याध्यापकांवर सोपविण्यात यावी व शासनाने त्याचा सातत्याने आढावा घेऊन कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणेबाबत समितीची शिफारस आहे.

(ब) पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.

पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना इयत्ता १२ वी पासून ते पीएचडीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना लागू आहे. सन २०१३-२०१४ या वर्षासाठी महाविद्यालयीन शिक्षणासंदर्भातील पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेसाठी १ लाख ३ हजार २४० विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज दाखल केले होते. त्यातील ४५,१८९ विद्यार्थ्यांचे केंद्र

शासनाने अर्ज मंजूर केले आहेत. विद्यार्थ्यांना ५० टक्के मार्क्स मिळविणे आवश्यक असल्याची अट सदर योजनेत आहे. त्यामुळे सदर योजनेच्या लाभापासून लाखाच्या वर विद्यार्थी वंचित राहिल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अल्पसंख्याक प्रवर्गातील कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये यासाठी राज्यशासनाने पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या निकषाचा फेरआढावा घेण्याबाबत केंद्र शासनाकडे सत्वरतेने पाठपुरावा करावा व या योजनेसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून घेण्यात यावा. यासाठी जर काही निधी कमी पडल्यास तो राज्य शासनाने द्यावा अशीही आग्रहाची शिफारस ही समिती करीत आहे. तसेच याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करण्यात यावे.

पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेची माहिती वेळेवर मिळत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागते. यापुढे कोणताही विद्यार्थी पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहू नये यासाठी प्रवेशाच्या वेळेस विद्यार्थ्यांना योजनेची विस्तृत माहिती मिळण्याच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांना परिपत्रक/माहितीपत्रक उपलब्ध करून देण्याबाबतची जबाबदारी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर सोपविण्यात यावी व शासनाने त्याचा सातत्याने आढावा घेऊन कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणेबाबत समितीची शिफारस आहे.

(१०) उर्दू शिक्षकांची रिक्त पदे भरणे व त्यासाठी आवश्यक असल्यास आरक्षण हटविणे.

राज्यात एकूण २५० उर्दू शिक्षकांची कमतरता असल्याने काही ठिकाणी उर्दू शिकविण्यासाठी तेलगु शिक्षकांची नेमणूक होत असल्याची धक्कादायक बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. उर्दू शाळांत आरक्षणाप्रमाणे भरती केली पाहिजे. परंतु, अनुसूचित जातीमध्ये उर्दू लिहिणारे, बोलणारे डी.एड् किंवा बी.एड् केलेले उमेदवार मिळत नाहीत. त्यामुळे अनुसूचित जातीमध्ये उर्दू शिक्षक मिळत नसतील तर उर्दू शिक्षकांचा कोटा इतर भाषेसाठी वर्ग केला पाहिजे आणि हे पद आरक्षण मुक्त करण्यात यावे तसेच उर्दू शिक्षकांची रिक्त पदे सहा महिन्यात भरण्यात यावीत, अशी समितीची शिफारस आहे.

(११) शाळांमध्ये वेगळी स्वच्छतागृहे उभारणे.

अल्पसंख्याक प्रवर्गात मोडणा-या महानगरपालिकांच्या तसेच खाजगी शाळांमध्ये मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केलेले आहे. त्याअनुषंगाने राज्यातील ज्या शाळांमध्ये अशा त-हेच्या सुविधा उपलब्ध नाहीत अशा शाळांमध्ये सहा महिन्यांत उक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

(१२) भिवंडी तसेच मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत.

भिवंडी तसेच मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत दोन वर्षांपुर्वी घोषणा करण्यात आली होती. तथापि, अद्यापही सदर महाविद्यालयाची स्थापना झालेली नसल्याचे विभागीय

सचिवांच्या साक्षीच्यावेळी समितीच्या निदर्शनास आले. ठाणे व उपनगरात तंत्र निकेतन महाविद्यालयातील ८९९ जागा रिक्त असल्यामुळे भिवंडी तसेच मालेगाव येथे तंत्र निकेतन महाविद्यालयांची स्थापना होऊ शकत नसल्याचे विभागीय सचिवाच्या साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले. त्याअनुषंगाने ठाणे जिल्ह्यात तंत्रनिकेतन महाविद्यालये नेमकी किती व कुठे आहेत तसेच ८०० जागा कुठे रिक्त आहेत याबाबतची विनिर्दिष्ट माहिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वित्त व नियोजन विभागास कळवावी व भिवंडी तसेच मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालये सुरू करण्याबाबत वित्त व नियोजन विभागाकडे योग्य तो पाठपुरावा करावा, अशी समितीची शिफारस आहे.

(१३) दर्ग्यांना पर्यटन क्षेत्र घोषित करून त्याचे श्रेणीनिहाय प्रस्ताव तयार करून ५ वर्षांत निधी उपलब्ध करून देणे.

राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील दर्ग्यांना पर्यटन क्षेत्र घोषित करून त्यांच्या ‘ अ ’, ‘ ब ’ व ‘ क ’ अशा श्रेणीनिहाय वर्गीकरणाचा प्रस्ताव संबंधित विभागांमार्फत तीन महिन्यात शासनास पाठविण्यात यावा व त्याअनुषंगाने संबंधित दर्ग्यांना शासनाने येत्या पाच वर्षात टप्प्याटप्प्याने जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून द्यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(१४) सच्चर समितीच्या शिफारशी.

सच्चर समितीने शासनास अनेक शिफारशी केलेल्या आहेत. सच्चर समितीने केलेल्या शिफारशी शासनाने मान्य करून तातडीने त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी व या अहवालाच्या अंमलबजावणी संदर्भातील माहिती समितीला तीन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी शिफारस ही समिती शासनास करीत आहे.

(१५) अल्पसंख्याक प्रवर्गातील लोकांना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या धर्तीवर सुविधा मिळण्याबाबत.

अल्पसंख्याक प्रवर्गातील नागरिकांची परिस्थिती अतिशय वाईट असल्याचे सच्चर समितीच्या अहवालावरुन समितीच्या निदर्शनास आले. त्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्या सुविधा अल्पसंख्याक प्रवर्गातील नागरिकांना उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी समितीची शिफारस आहे.

(१६) अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या पूर्ण रकमेची प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

अभियांत्रिकीचे शिक्षण घेणा-या गरजू अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना केवळ २५, ००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती होते. सद्यःस्थितीत ही रक्कम अतिशय कमी असून त्यामुळे अनेक अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. या योजनेचा जास्तीत जास्त लाभ अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी सदरहू २५, ००० रुपयांची मर्यादा वाढवून जेवढे शिक्षण शुल्क

भरण्यात आले ती पूर्ण रक्कम गरजू विद्यार्थ्यांना अदा करण्याची तरतूद करण्यात यावी, अशी ही समिती आग्रहाची शिफारस करत आहे. त्याचप्रमाणे इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या लोकांना जी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा (क्रीमीलेयर) लागू करण्यात आलेली आहे तीच वार्षिक उत्पन्नाची मर्यादा अल्पसंख्याक प्रवर्गासाठी-देखील तातडीने लागू करण्यात यावी व यासंदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत अवगत करण्यात यावी, अशी शिफारस ही समिती शासनास करत आहे.

(१७) सूतगिरण्यांचे भाग भांडवल मिळण्याबाबतचे शासनस्तरावर प्रलंबित असलेले प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याबाबत.

सूत गिरणी उभारण्यासाठी शासनामार्फत भाग भांडवल देण्यात येते. परंतु सूत गिरणी उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या भाग भांडवलाच्या मागणीचे अनेक प्रस्ताव शासनस्तरावर मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत. हे सर्व प्रस्ताव तातडीने मान्य करण्याबाबतची कार्यवाही शासनाने करावी व या प्रवर्गातील लोकांचे आर्थिक सबलीकरण होण्याच्या दृष्टीने मार्ग उपलब्ध करून देऊन त्यांना योग्य ते सहकार्य शासनामार्फत करण्यात यावे तसेच प्रस्ताव मान्यतेच्या प्रक्रियेत अधिक सुसुत्रता व सुलभता आणण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(१८) शिक्षण हक्क कायद्यांतर्गत इच्छुक अल्पसंख्याक संस्थेचा अंतर्भाव करणेबाबत.

शिक्षण हक्क कायदा (RIGHT TO EDUCATION ACT) अल्पसंख्याक संस्थांना लागू होत नाही. ज्या अल्पसंख्याक संस्थांना स्वेच्छेने सदरहू कायदा लागू करून घेण्याची व त्याअंतर्गत काम करण्याची इच्छा असेल तर त्या संस्थांना सामावून घेणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी समितीची शासनास शिफारस आहे.

(१९) राज्यात अलीगढ मुस्लिम विद्यापीठ सुरू करण्याबाबत.

अलीगढ मुस्लिम विद्यापीठ देशातील पाच राज्यात सुरू करण्यास परवानगी देण्यात आलेली असून चार राज्यांमध्ये अलीगढ मुस्लिम विद्यापीठ सुरू करण्यात आले आहे. तथापि, महाराष्ट्रात अद्याप सदर विद्यापीठ सुरू झालेले नाही. सबब, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ राज्यात तातडीने सुरू करण्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावी तसेच या विद्यापीठासाठी २५० एकर जमीन देण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित आहे त्यासदेखील तातडीने मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस ही समिती शासनास करत आहे.

(२०) इस्माईल युसुफ महाविद्यालय.

जोगश्वरी, मुंबई येथील इस्माईल युसुफ महाविद्यालय हे मुलतः अल्पसंख्याक समाजाच्या निधीतून उभारण्यात आलेले महाविद्यालय आहे. सदर महाविद्यालयास अल्पसंख्याक संस्था असा दर्जा देण्यात येऊन त्याअन्वये वेगळी शासन अंतर्गत अल्पसंख्याक संस्था निर्माण करून त्यानुसार त्याची देखभाल व पुढील कामकाज करण्यात यावे तसेच या ठिकाणी उपलब्ध जागेवर अन्य शैक्षणिक उपक्रम

जसे की, वैद्यकिय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक उपक्रमदेखील सुरू करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.

(२१) मुंबईतील सेंट जॉन बॅप्टिस्ट चर्चच्या जागेवरील आरक्षण हटवून सदर जागा आर्च बिशप हाऊस मुंबई यांच्याकडे देणे तसेच सदर चर्चचे सुशोभिकरण करून ते वर्षभर उपासनेसाठी खुले करण्याबाबत.

मुंबईच्या सिप्झ, एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व) येथील सेंट जॉन बॅप्टिस्ट चर्च हे जवळजवळ पाचशे वर्ष जुने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले चर्च आहे. ज्या जागेवर सदरहू चर्च आहे ती व त्यालगतची सर्व जागा नंतर एम.आय.डी.सी. ने औद्योगिक विकासासाठी ताब्यात घेतली. उक्त जागेची मूळ मालकी व ताबा आर्च बिशप हाऊस मुंबई यांच्याकडे देण्यात यावा व त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी. सन १९७३ पर्यंत या चर्चमध्ये दररोज प्रार्थनेसाठी येण्यास ख्रिस्ती बांधवांना मुभा होती. पण एम.आय.डी.सी. ने सदरहू जागा ताब्यात घेतल्यानंतर या चर्चमध्ये वर्षातून एकदाच (मे महिन्याच्या दुस-या रविवारी) प्रार्थनेसाठी उपस्थित राहण्याची मुभा देण्यात येते. ही बाब ख्रिस्ती बांधवांची भावना दुखावणारी असल्यामुळे याबाबत ख्रिस्ती बांधवांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. सदरहू चर्चला प्राप्त झालेले ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता याकडे शासनाने अधिक गांभीर्याने पाहण्याची नितांत आवश्यकता आहे. सदरहू चर्चची अत्यंत दुरावस्था झालेली असल्यामुळे शासनाने या चर्चचे सुशोभीकरण करण्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही तातडीने करावी व त्यासाठी लागणारा निधी देखील शासनामार्फत देण्यात यावा.तसेच सदरहू चर्च हे वर्षभर उपासनेसाठी सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कार्यवाही शासनाने करावी तसेच तशा प्रकारचे आदेश एम.आय.डी.सी.ला देण्यात यावेत, अशीही शिफारस ही समिती शासनास करत आहे.

परिशिष्ट ‘ अ ’

(मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून प्राप्त झालेली माहिती)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
अल्पसंख्यांक कल्याण समिती
मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ

प्रश्नावली

अनु. क्र.	प्रश्न	उत्तर
१	आर्थिक दृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकांच्या सामाजिक आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी शासनाने सन २०१०-११, सन २०११-१२ या कालावधीत महामंडळाला किती निधी उपलब्ध करुन दिला आहे व किती निधीचे आर्थिक वर्षात वाटप केले आहे. तसेच महामंडळाने थेट कर्ज योजनेअंतर्गत सन २००९ ते २०१२ या कालावधीत किती कर्ज प्रकरणे मंजुर केली आहेत त्यापैकी किती लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आले आहे, तसेच सदर फॉर्म मिटकॉनच्या माध्यमातून भरण्यात आले आहेत हे खरे आहेत काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत ?	मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रू.२५० कोटी आहे. आर्थिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी राज्य शासनाने सन २०१०-११ व सन २०११-१२ या आर्थिक वर्षात अनुक्रमे ₹१८.३६५० कोटी व ₹९.३९१० कोटी इतके भाग भांडवल दिले आहे. याबाबतची माहिती **परिशिष्ट-१** मध्ये जोडली आहे. थेट कर्ज योजनेंतर्गत सन २००९-१० या वर्षात २१२२२ लाभार्थ्यांना रू.८१.३९ कोटी कर्ज मंजूर करण्यात आले असून १३६९६ लाभार्थ्यांना रु. ४६.७० कोटीचे वाटप करण्यात आले आहे. सन २०१०-११ या वर्षात १६०४१ लाभार्थ्यांना रू. ५५.६१ कोटी कर्ज मंजूर करण्यात आले असून ८६०४ लाभार्थ्यांना रु. ३०.४१ कोटीचे वाटप करण्यात आले तर सन २०११-१२ मध्ये ६६१६ लाभार्थ्यांना रु. २३.३३ कोटी वितरित करण्यात आले आहेत. **(परिशिष्ट-२)** सदर कालावधीत महामंडळाचे जिल्हा स्तरावरील कामकाज मे. मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि. या संस्थेमार्फत करण्यात येत होते, हे खरे आहे. जिल्हा स्तरावर महामंडळाची स्वत:ची यंत्रणा नसल्यामुळे मिटकॉन तर्फे काम करुन घेण्यात येत होते.
२	महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत विधवा महिला, परित्यक्त्या, अपंग यांना विशेष बाब म्हणुन कर्ज प्रकरणे स्विकारण्याचा ठराव समंत करण्यात आला होता त्याबाबत अद्याप अमंलबजावणी झाली नाही हे खरे आहे काय ? असल्यास त्याची कारणे काय आहेत ?	सन्मा. संचालक मंडळाच्या दि. ०६ जुन,२०१२ रोजी झालेल्या ७३ व्या बैठकीतील बाब क्रमांक ४.११ अन्वये विधवा महिला, परित्यक्त्या, अपंग यांना विशेष बाब म्हणुन कर्ज प्रकरणे स्विकारण्याचा ठराव तत्त्वत: मान्य करण्यात आला होता. **(ठरावाची प्रत- परिशिष्ट-३)** तथापि दि. ६ ऑगस्ट, २०१२ रोजी झालेल्या ७५ व्या बैठकीत या योजनेचा आढावा घेतला असता, यासाठी स्वतंत्र योजना तयार करण्याची आवश्यकता नसून सध्याच्या कर्ज योजनांतर्गत या घटकांना प्राधान्य देण्याचे ठरले आहे.

३	महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये महामंडळाचा कारभार सुरळीत चालावा या करिता १०५ कर्मचाऱ्यांची स्थानिक पातळीवर रोजंदारी तत्वावर भरती करण्याविषयी ठराव समंत करण्यात आला होता. त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे काय, नसल्यास विलंबाची करणे काय आहेत?	महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये महामंडळाचा कारभार सुरळीत चालावा या करिता मंजूर १०५ कर्मचाऱ्यांची स्थानिक पातळीवर कंत्राटी तत्वावर भरती करण्याविषयी ठराव संचालक मंडळाच्या दि.१९ मे,२०११ व ४ जुलै,२०११ रोजी झालेल्या ६७ व्या संस्थागित बैठकीतील बाब क्रमांक १.१ अन्वये संमत करण्यात आला होता. **(ठराव प्रत-परिशिष्ट-४)** सध्या मंजूर १०५ पदापैकी प्रतिनियुक्ती तसेच कंत्राटी तत्वावर एकूण ६७ कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरीत ३८ पदे रिक्त आहेत. महामंडळांतर्गत पदांचा फेर आढावा घेऊन एकूण २०८ पदांचा सुधारित आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये नवीन ११२ पदे निर्माण करणे, सध्याची सहाय्यकाची मंजूर ८ पदे कमी करणे तसेच रोखपाल हे पद लिपिक टंकलेखक संवर्गात वर्ग करण्याचा समावेश आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून सुधारित आकृतीबंधास मान्यता प्राप्त होताच सर्व जिल्हयांत नवीन आकृतीबंधानुसार पदभरती करण्यात येईल. त्यामुळे सध्या रिक्त असलेली विविध संवर्गातील ३८ पदे भरण्यात आलेली नाहीत.
४	महामंडळाची वसुली करण्याच्या हेतूने ३ वसुली अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना थकित कर्जदार लाभार्थ्यांना नोटीस पाठविणे तसेच कायदेशीर बाबी हाताळण्याचे अधिकार संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव समंत करुन दिले असताना थकित कर्जदाराना वकिलामार्फत नोटीस पाठविण्याची कारणे काय आहेत ?	महामंडळाच्या कर्जाची वसुली करण्याच्या हेतूने सन २००३ पासून प्रत्येक जिल्हयाच्या कायदेशीर बाबी हाताळण्यासाठी वकीलांसोबत महामंडळाने केलेल्या करारानुसार हे वकील लाभार्थ्यांना महामंडळाच्या निर्देशानुसार नोटीस देत होते. महामंडळात ३ वसुली अधिकाऱ्यांची नियुक्ती या बाबीचा पाठपुरावा करण्यासाठी करण्यात आली होती. सध्या सदर ३ वसुली अधिकारी मुख्यालयात कार्यरत असुन त्यांच्याकडून वसुली अनुषंगाने करण्यात येत असलेल्या कामाचा पाठपुरावा करण्यात येतो. दि. ०२ मे, २०१२ रोजी संचालक मंडळाच्या ७२ व्या बैठकीत बाब क्रमांक ४.१७ अन्वये मंजुर ठरावानुसार सध्या वकिलामार्फत लाभार्थ्यांना नोटीस देण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. **(ठरावाची प्रत-परिशिष्ट-५)** त्यामुळे थकित कर्जदारांना वकिलामार्फत नोटीस पाठविण्याचे कामकाज जिल्हा स्तरावरील जिल्हा व्यवस्थापक यांच्यामार्फत केले जात आहे. नवीन आकृतीबंधात वसुली अधिकारी यांच्या पदाचा समावेश असुन त्यांच्या मार्फत लाभार्थ्यांना नोटीसा पाठविण्याचे काम करुन घेण्यात येईल.

५	महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये प्रत्येक विभागावर एक कायदे तज्ञ नेमण्यात यावा असा ठराव मंजूर केला असताना अद्याप त्याची अमंलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत ?	प्रत्येक विभागावर एक कायदे तज्ञ नेमण्यात यावा असा ठराव संचालक मंडळाच्या दि. ०२ मे, २०१२रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीतील बाब क्रमांक ४.१७ अन्वये मंजुर करण्यात आला होता. **(ठराव प्रत-परिशिष्ट-५)** दरम्यान महामंडळाच्या पदांच्या सुधारित आकृतिबंधामध्ये प्रादेशिक विभाग निहाय कायदे सल्लागारांची ६ पदे प्रस्तावित करण्यात आली आहेत.
६	महामंडळाद्वारे लाभार्थ्यांना दिलेल्या चेक वरील तारखेच्या काही तांत्रिक अडचणीमुळे सुमारे ३५० चेक ६ महिन्यापासून संबधितांना दिले नाहीत हे खरे आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहत ?	हे अशंतः खरे आहे. महामंडळात सुमारे ३२५ धनादेश तारखा बदलुन देण्यासाठी प्रलंबित आहेत. या धनादेशाच्या तारखा यापुर्वी ३ ते ४ वेळा बदलून दिल्या आहेत. तरी ही लाभार्थ्यांना हे धनादेश अदा केलेले नसल्याचे निदर्शनास आले असल्याने संबधित कागदपत्राची संपुर्ण छाननी करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.
७	लाभार्थ्यांना धनादेश महामंडळाकडून थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत ठराव महामंडळाने मंजूर केला असताना अद्याप त्याची अमंलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत ?	लाभार्थ्यांना धनादेश महामंडळाकडून थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबतचा ठराव महामंडळाने सन्मा संचालक मंडळाच्या दि. ०५ ऑक्टोबर, २०११ रोजी झालेल्या ६९ व्या बैठकीतील १० (६) व्या ठरावानुसार संमत करण्यात आला होता. **(ठराव प्रत-परिशिष्ट-६)** लाभार्थ्यांचे खाते हे जिल्हास्तरीय सहकारी बँकामध्ये असल्यामुळे त्यांचे खाते हे किमान ११ किंवा १३ आकडी असणे आवश्यक आहे. मात्र लाभार्थ्यांचे खाते क्रमांक व अन्य सविस्तर तपशिल अर्जात उपलब्ध नाही. यापुढे सदर माहितीचा समावेश कर्ज मागणी अर्जामध्ये करून हा निर्णय कार्यान्वीत करण्याचे निदेश महामंडळास देण्यात येतील.
८	अल्पसंख्यांक दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी सन २०१०-११, २०११-१२ या सालासाठी किती आर्थिक मदत केली ?	अल्पसंख्यांक दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी सन २०१०-११ मध्ये एकूण १०,३०८ लाभार्थ्यांना रु. ३,५५१.४९ लक्ष वितरित करण्यात आले. सन २०११-१२ मध्ये एकूण ६,६१६ लाभार्थ्यांना रु. २३३२.८१ लक्ष वितरित करण्यात आले आहेत. **(परिशिष्ट-७ व जिल्हा निहाय माहिती परिशिष्ट-७ अ मध्ये देण्यात आली आहे.)**
९	अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनीना शिक्षणासाठी सन २०१०-११, २०११-१२ साली किती कर्ज उपलब्ध करुन दिले याची तपशीलवार माहिती देण्यात यावी. (जिल्हानिहाय संख्या देण्यात यावी.) ?	सन २०१०-११ मध्ये अल्पसंख्यांक समाजातील २११८ विद्यार्थी-विद्यार्थीनीना शिक्षणासाठी रु. ११७६.४३ लक्ष वितरित करण्यात आले. सन २०११-१२ मध्ये एकूण २०६८ विद्यार्थी-विद्यार्थीनीना रु. १२४६.५७ लक्ष वितरित करण्यात आले. **(परिशिष्ट- ८ व परिशिष्ट- ८ अ मध्ये** जिल्हानिहाय संख्या दर्शविण्यात आली आहे.
१०	अल्पसंख्यांकांच्या उन्नतीसाठी महामंडळामार्फत कोणकोणत्या योजना राबविण्यात येतात. या बाबतची सविस्तर माहिती द्यावी ?	अल्पसंख्यांकांच्या उन्नतीसाठी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती **परिशिष्ट-९** मध्ये देण्यात आली आहे

११	राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ नवी दिल्ली यांच्या सहकार्याने अद्याप पर्यंत किती रक्कमेचे अनुदान वाटले आहेत ?	राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ नवी दिल्ली यांच्या सहकार्याने आतापर्यंत रु. ५६.३४ कोटी प्राप्त निधीचे वाटप करण्यात आले आहे.
१२	सन २०१०-११, व सन २०११-१२ या कालावधीत अल्पसंख्यांक दुर्बल घटकाच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी राजीव गांधी योजनेमार्फत किती रक्कमेचे कर्ज देण्यात आले याची माहिती देण्यात यावी ?	सन २०१०-११ मध्ये अल्पसंख्यांक दुर्बल घटकाच्या ३७३ विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी राजीव गांधी योजनेअंतर्गत रु. १५६.०८ लक्ष कर्ज वितरित करण्यात आले आहे. तर सन २०११-१२ मध्ये ३०९ विद्यार्थ्यांना रु. २३८.५९ लक्ष वितरित करण्यात आले आहेत. **(परिशिष्ट-१०)**
१३	अल्पसंख्यांक शेतकरी व मच्छिमारांसाठी किती रक्कमेचे कर्ज वाटप करण्यात आले?	अल्पसंख्यांक शेतकरी व मच्छिमारांसाठी योजना कार्यान्वीत करण्यात आलेली नाही.
१४	अल्पसंख्यांक समुह विकास कार्यक्रम अंतर्गत कोणकोणते कार्यक्रम आयोजित करण्यात येतात गतवर्षी कोणत्या कार्यक्रमावर निधी खर्च करण्यात आला ?	अल्पसंख्यांक समुह विकास कार्यक्रम अंतर्गत महामंडळामार्फत कोणतीही योजना राबविण्यात आलेली नाही.
१५	अल्पसंख्यांकासाठी कोणकोणत्या प्रशिक्षण योजना राबविण्यात येतात याची सविस्तर माहिती देण्यात यावी ?	अल्पसंख्यांकासाठी राबविण्यात आलेल्या विविध प्रशिक्षण योजनांची माहिती **परिशिष्ट-११** मध्ये देण्यात आली आहे.
१६	अल्पसंख्यांक स्वयंरोजगार जनजागृती कार्यक्रम यांची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी ?	अल्पसंख्यांक स्वयंरोजगार जनजागृती कार्यक्रम अशी कोणतीही योजना नाही. तथापि, महामंडळाच्या कर्ज योजनांची माहिती होण्यासाठी मेळावे, प्रदर्शने व इतर कार्यक्रम वेळोवेळी घेण्यात येतात.

परिशिष्ट-१

महामंडळाच्या भागभांडवलाचा तपशील :-

महामंडळाचे प्राधिकृत भागभांडवल ₹२५०.०० कोटी असून मार्च, २०१२ पर्यंत शासनाने ₹१७९.३९ कोटी महामंडळास अदा केले आहे. भागभांडवलाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	सन्	प्राप्त भागभांडवल	
१	२०००-०१	₹०५.०० कोटी	दि.१३/०३/२००१
२	२००१-०२	₹०१.०० कोटी	दि.३०/०३/२००२
३	२००२-०३	₹०१.५० कोटी	दि.३१/०३/२००३
४	२००३-०४	₹०६.५० कोटी	दि.०६/०२/२००४
५	२००४-०५	₹०५.०० कोटी	दि.०२/०३/२००५
		₹१९.२० कोटी	दि.३१/०३/२००५
एकूण		₹२४.२० कोटी	
६	२००५-०६	निरंक	
७	२००६-०७	₹०१.४० कोटी	दि.०१/११/२००६
८	२००७-०८	₹०१.५४ कोटी	दि.१५/०३/२००८
९	२००८-०९	₹५०.०० कोटी	दि.२४/०३/२००९
		₹०१.५० कोटी	दि.१६/०४/२००९
एकूण		₹५१.५० कोटी	
१०	२००९-१०	₹१६.२० कोटी	दि.१४/०१/२०१०
		₹४२.७९५० कोटी	दि.३१/०३/२०१०
एकूण		₹५८.९९५० कोटी	
११	२०१०-११	₹०८.०० कोटी	दि.२३/१२/२०१०
		₹०६.६८ कोटी	दि.०२/०२/२०११
		₹०३.६८५० कोटी	दि.२५/०३/२०११
एकूण		₹१८.३६५० कोटी	
१२	२०११-१२	₹०७.५० कोटी	दि.०३/११/२०११
		₹०१.०० कोटी	दि.१६/०४/२०१२
		₹००.८९१० कोटी	दि.१६/०४/२०१२
एकूण		₹०९.३९१० कोटी	
एकूण (१ ते १२)		₹१७९.३९१० कोटी	

परिशिष्ट-२

Maulana Azad Alpasankhyank Arthik Vikas Mahamadal Maryadit, Mumbai
Loan Sanctioned / Disbursed under various Loan Scheme from 2009-10 to 2011-12

(Rs. In Lakhs)

Sr. No.	Year	Direct Loan				Term Loan				Schemes Education Loan												Micro Finance Total with No. of Beni.				Grand Total			
										Sanctioned						Disbursed													
		Sanctioned		Disbursed		Sanctioned		Disbursed		Maulana Azad EL		Rajiv Gandhi EL		Total EL Sanctioned		Maulana Azad EL		Rajiv Gandhi EL		Total EL Disbursement		Sanctioned		Disbursed		Sanctioned		Disbursed	
		No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Groups	No. of Beni.	Amt.	No. of Groups	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.
1	2009-10	21222	8138.94	13696	4669.56	2231	1463.94	2359	1562.05	434	426.64	62	208.64	496	635.28	482	391.25	597	246.18	1079	639.43	334	1486	497.46	590	5310	787.08	25435	10735.62	22444	7658.12
2	2010-11	16041	5560.75	8604	3041.49	4595	2759.14	424	285.73	1852	2955.06	320	1021.50	2172	3976.56	1745	1020.35	373	156.08	2118	1176.43	574	6754	760.24	128	1280	224.27	29562	13056.69	12426	4727.92
3	2011-12	0	0.00	6616	2332.81	0	0.00	0	0.00	1544	2178.12	89	282.29	1633	2460.41	1759	1007.98	309	238.59	2068	1246.57	0	0	0.00	0	0	0.00	1633	2460.41	8684	3579.38
	Grant Total	37263	13699.69	28916	10043.86	6826	4223.08	2783	1847.78	3830	5559.82	471	1512.43	4301	7072.25	3986	2419.58	1279	642.85	5265	3062.43	908	8240	1257.7	718	6590	1011.35	56630	26252.72	43554	15965.42

परिशिष्ट-३

मौलाना आज़ाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई

संचालक मंडळाच्या दिनांक ०६ जून, २०१२ रोजी झालेल्या ७३ व्या बैठकीचे इतिवृत्त

मौलाना आज़ाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची ७३ वी बैठक दिनांक ०६ जून, २०१२ रोजी महामंडळाचे मुख्यालय, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीसाठी सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्मा.संचालक / अधिकारी उपस्थित होते.

बाब क्र.(१) :- **सन्मा.संचालकांना अनुपस्थितीची रजा मंजूर करणे.....**

व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक मंडळाच्या असे निदर्शनास आणले की, कोणत्याही सन्मा. संचालकाचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत. श्रीमती जेनेट डिसोझा, सन्मा.संचालिका व सन्मा.श्री.हुसेन शेख, संचालक यांनी दूरध्वनीवरुन बैठकीस अनुपस्थित राहण्याची अनुमती मागितली. त्यांची अनुपस्थितीची रजा मान्य करुन संचालक मंडळाने सदर बाबीची नोंद घेतली.

बाब क्र.(२) :- **संचालक मंडळाच्या दिनांक ०२ मे २०१२ रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे....**

व्यवस्थापकीय संचालकांनी संचालक मंडळाच्या दिनांक ०२ मे, २०१२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त बैठकीस उपस्थित सन्मा.संचालकांना वाचून दाखविले. संचालक मंडळाने सदर बाबींची नोंद घेतली आणि संचालक मंडळाच्या ७२ व्या बैठकीचे इतिवृत्तात सुधारणा करुन सुधारणेसह कायम करण्यात आले.

बाब क्र. (३) :- **संचालक मंडळाच्या दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीत ठेवण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले विषय तसेच संचालक मंडळाच्या दिनांक ०२ मे, २०१२ रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाही....**

पुर्वीची बाब क्र.	निर्णय	कार्यवाही
बाब क्र. ३.१	सन्माननीय संचालकांना अनुपस्थितीची रजा मंजूर करणे....	नोंद घेण्यात आली.
बाब क्र. ३.२	संचालक मंडळाच्या दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीत ठेवण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले विषय तसेच दिनांक ०२ मे, २०१२ रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे....	नोंद घेऊन इतिवृत्तामध्ये अंशतः बदल करुन कायम करण्यात आले.
बाब क्र. ३.३	संचालक मंडळाच्या दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे....	नोंद घेण्यात आली.

ठराव :

"मे.हेंदादे अँड कंपनीकडून आलेल्या पत्रांबद्दल माहिती देऊन महामंडळाचे प्रलंबित लेखे तसेच लेखांकन विषयी सेवा बंद केल्याबाबतची माहिती मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सन्मा.संचालक यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर मा.अध्यक्ष व सर्व सन्मा.संचालकांनी मे.हेंदादे अँड कंपनी यांना कार्यालयात बोलावून पुन्हा एकदा समज देण्यात यावी अन्यथा त्यांच्या विरुध्द FIR दाखल करण्यात येऊन महामंडळाच्या वतीने योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. दरम्यान मे.हेंदादे अँड कंपनी यांनी लेखांकनाच्या सेवा पुर्ववत सुरु केली असल्यामुळे F.I.R. चा प्रश्न उद्‌भवत नाही."

बाब क्र.४.११ :- **अल्पसंख्यांक समाजातील विधवा व घटस्फोटित महिलांना तसेच दंगलपिडीत महिलांना कर्ज योजनेचा लाभ मिळणेबाबत.....**

श्री.इब्राहिम पठाण, सन्मा.संचालक यांनी दिनांक ०२ मे, २०१२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मांडलेल्या सूचनेनुसार अल्पसंख्यांक समाजातील विधवा व घटस्फोटित महिलांना व दंगलपिडीत कमवता पुरुष, नैसर्गिक आपदग्रस्त कमवता पुरुष या दोघांचाही पोलीस पंचनामा असल्यास त्यांचा थेट कर्ज योजनेचा प्रस्ताव १२ ही महिने घेण्यात यावेत तसेच अपंग व्यक्ती ज्यांचे अपंगत्व ४०% व त्यापेक्षा जास्त असून ज्यांची व्यवसायामध्ये रुची आहे त्यांनाही १२ महिने कर्ज प्रस्ताव स्विकारुन लाभ देण्यात यावा असा प्रस्ताव तयार करण्याचा ठराव मा.अध्यक्ष व सर्व सन्मा.संचालक यांच्या मंजूरीअन्वये सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

मान्यतेसाठी सादर.

ठराव :

"सदर योजनेस तत्वतः मान्यता देण्यात येत आहे असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. या योजनेबाबत आवश्यक रुपरेषा तयार करुन व निकष निर्धारित करुन ₹५०,०००/- च्या मर्यादेत अर्थसहाय्य करण्याची योजना तयार करण्यात यावी असाही ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला."

बाब क्र.४.१२ :- **शेतकरी व मच्छिमार यांच्यासाठी कर्ज योजना चालू करण्याबाबत.....**

ॲड.श्रीमती हुस्नबानो खलिफे, सन्मा.संचालिका यांनी दिनांक ०२ मे, २०१२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत सुचविल्यानुसार अल्पसंख्यांक शेतकरी व मच्छिमार यांच्यासाठी कर्ज योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रस्ताव तयार करुन सादर करण्यास सांगण्यात आले होते. परंतु निधी अभावी सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा. निधी प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावावर सन्मा.संचालक मंडळाच्या मान्यतेप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

परिशिष्ट-४

मौलाना आज़ाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई

संचालक मंडळाच्या दिनांक १९ मे, २०११ रोजी झालेल्या व दिनांक ०४ जुलै, २०११ रोजी झालेल्या संस्थगित ६७ व्या बैठकीचे इतिवृत्त

मौलाना आज़ाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची ६७ वी बैठक दिनांक १९ मे, २०११ रोजी तसेच दिनांक ०४ जुलै, २०११ रोजी झालेली संस्थगित बैठक सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीसाठी सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्मा.संचालक / अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीचे अध्यक्षपद महामंडळाचे अध्यक्ष, मा.ना.अमीन पटेल यांनी भुषविले व व्यवस्थापकीय संचालक यांनी बैठकीची सुरुवात केली.

बाब क्र.(१) :- **सन्मा.संचालकांना अनुपस्थितीची रजा मंजूर करणे.....**

व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक मंडळाच्या असे निदर्शनास आणले की, कोणत्याही सन्मा. संचालकाचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत. श्री.मौलाना जहिर अब्बास रिझवी, श्री.सय्यद नविदुज्जमा सय्यद फकरुज्जमा, श्री.शब्बीर अहेमद विद्रोही, ॲड.अबु सईद, श्रीमती जेनेट डिसोझा या सन्मा.संचालकांनी दूरध्वनीवरुन बैठकीस अनुपस्थित राहण्याची अनुमती मागितली. त्यांची अनुपस्थितीची रजा मान्य करुन संचालक मंडळाने सदर बाबीची नोंद घेतली.

बाब क्र.(२) :- **संचालक मंडळाच्या दिनांक २९ मार्च, २०११ रोजी झालेल्या ६६ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे....**

व्यवस्थापकीय संचालकांनी संचालक मंडळाच्या २९ मार्च, २०११ रोजी झालेल्या ६६ व्या बैठकीचे इतिवृत्त बैठकीस उपस्थित सन्मा.संचालकांना वाचून दाखविण्यात आले. संचालक मंडळाने सदर बाबीची नोंद घेतली आणि संचालक मंडळाच्या ६६ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम केले. **(प्रपत्र-१)**

बाब क्र. (३) :- **संचालक मंडळाच्या दिनांक २९ मार्च, २०११ रोजी झालेल्या ६६ व्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाही....**

बाब क्र.	निर्णय	कार्यवाही
बाब क्र. (१)	सन्माननीय संचालकांना अनुपस्थितीची रजा मंजूर करणे....	नोंद घेण्यात आली.
बाब क्र. (२)	संचालक मंडळाच्या दिनांक २९ मार्च, २०११ रोजी झालेल्या ६६ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे....	नोंद घेऊन इतिवृत्त कायम करण्यात आले.

२६) लेखी परीक्षेचे पेपर ज्या दिवशी लेखी परीक्षा आहे त्याच दिवशी सकाळी गोपनीय पध्दतीने छपाई करावी.

२७) लेखी परीक्षा व मुलाखती दिनांक २३ जुलै, २०११ ते दिनांक ३० जुलै, २०११ दरम्यान पुर्ण करावे असे ठरले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

२८) महामंडळातील लेखी परीक्षा व मुलाखतीचा कृति आराखडा सोबत जोडला आहे. शासनाने पुन्हा एक वर्षासाठी पद भरतीवर बंदी आणलेली आहे. सदरील बाब माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

सदरील पदभरतीच्या कार्यप्रणालीबाबत दिनांक २२ जून, २०११ रोजी मा.श्री.अमीन पटेल, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) व सन्मा. संचालिका ॲड.हुस्नबानो खलिफे यांच्या बरोबर चर्चा करण्यात आली. तथापि, मा.अध्यक्ष यांनी सदरील कार्यप्रणालीवर चर्चा करण्यासाठी दिनांक २९ जून, २०११ रोजी पाच सन्मा.संचालकांबरोबर बैठक आयोजित केली होती तसेच दिनांक १ जुलै, २०११ रोजी संचालक मंडळाची बैठकही बोलाविण्यात आली होती. परंतु ती तांत्रिक अडचणीमुळे दिनांक ४ जुलै, २०११ रोजी घेण्यात आली. पदभरतीच्या कार्यप्रणालीबाबत दिनांक ४ जुलै, २०११ रोजी सकाळी ११.३० वा: मा.श्री.अमीन पटेल, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा), सन्मा.संचालक, श्री.मुनाफ हकीम, ॲड.श्रीमती हुस्नबानो खलिफे, श्री.नविदुज्जमा फकरुज्जमा व व्यवस्थापकीय संचालक हे उपस्थित होते. सदरील बैठकीत व दिनांक ४ जुलै, २०११ राजी दुपारी ४.३० वा. झालेल्या ६७ व्या संस्थगित बैठकीतही सदरीलबाबत चर्चा करुन सोबत जोडलेल्या कार्यप्रणालीत सुधारणा करुन मान्यता दिलेली आहे.

ठराव -

१) महामंडळातील मंजूर पदे, भरलेली पदे (प्रतिनियुक्ती व कंत्राटी), सध्या रिक्त असलेली पदे यांचा तपशिल काढून फक्त रिक्त पदे भरण्यात यावीत.

२) रिक्त पदांच्या संख्येच्या १:१० पटीने पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी निमंत्रित करण्यात यावे.

३) लेखी परीक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणानुक्रमानुसार मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या पाच पदापर्यंत - ५ पटीत व ६ व त्याहून अधिक पदासाठी तीन पटीत ठेवावे.

४) लिपिकवर्गीय पदासाठी मुलाखती न घेता फक्त लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी परीक्षा घेण्यात यावी. लेखी परीक्षेत व चाचणी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत दिलेल्या पात्रता व अटीनुसार निवड करावी.

५) वाहनचालक पदासाठी व्यावसायिक चाचणी व मुलाखत घेण्यात यावी.

६) शिपाई पदासाठी फक्त मुलाखत घेण्यात यावी.

परिशिष्ट-५

मौलाना आज़ाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई

संचालक मंडळाच्या दिनांक ०२ मे, २०१२ रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीचे इतिवृत्त

मौलाना आज़ाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची ७२ वी बैठक दिनांक ०२ मे, २०१२ रोजी महामंडळाचे मुख्य कार्यालय, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीसाठी सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्मा.संचालक / अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा.अध्यक्ष यांनी मा.व्यवस्थापकीय संचालकांना सन्मा.सदस्यांची ओळख करुन दिली. तद्नंतर सदर बैठकीचे अध्यक्षपद महामंडळाचे अध्यक्ष, मा.ना.अमीन पटेल यांनी भुषविले व व्यवस्थापकीय संचालक यांनी बैठकीची सुरुवात केली.

बैठकीच्या सुरुवातीला मा.अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) व सन्मा.संचालक यांनी कार्यालयात असलेल्या शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत किती प्रकरणे प्रलंबित आहेत व किती धनादेश पाठवावयाचे आहेत असा प्रश्न केला. त्यावर मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी शैक्षणिक कर्जाचे धनादेश अद्याप वितरित करण्यात आलेले नाहीत मात्र लवकरच वितरित करण्यात येतील असे आश्वासन दिले.

बाब क्र.(१) :- **सन्मा.संचालकांना अनुपस्थितीची रजा मंजूर करणे.....**

दिनांक ०२ मे, २०१२ रोजी संपन्न झालेल्या बेठकीस सर्व सन्मा.संचालक उपस्थित असल्याने रजा मंजूरीचा प्रश्न उद्भवत नाही. ही बाब व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले.

बाब क्र.(२) :- **संचालक मंडळाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या ७० व्या व दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे....**

व्यवस्थापकीय संचालकांनी संचालक मंडळाच्या दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ व दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त बैठकीस उपस्थित सन्मा.संचालकांना वाचून दाखविण्यात आले. संचालक मंडळाने सदर बाबींची नोंद घेतली आणि संचालक मंडळाच्या ७० व ७१ व्या बैठकीचे इतिवृत्त सुधारणेसह कायम करण्यात आले.

बाब क्र. (३) :- **संचालक मंडळाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या ७० व्या व दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी झालेल्या ७१ व्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाही....**

बाब क्र.	निर्णय	कार्यवाही
बाब क्र. (१)	सन्माननीय संचालकांना अनुपस्थितीची रजा मंजूर करणे....	नोंद घेण्यात आली.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली च्या धर्तीवर सुक्ष्म पतपुरवठा योजनेचे उद्देश, अटी-शर्ती, पात्रता, कागदपत्र, अंमलबजावणीसह प्रस्ताव तयार करुन शासनास पाठविण्याच्या मान्यतेसाठी सादर.

ठराव :

"मान्यता देण्यात येत आहे असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला."

बाब क्र.(४.१७):- **कायदे सल्लागारांच्या नेमणुकीबाबत....**

मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या थकित उमेदवारांना त्यांचे धनादेश न वठल्यास नोटिसा पाठविणे व कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्ह्यात कायदे सल्लागार नेमण्यात आलेले आहेत. नोटीस पाठविण्यासाठी कलम-१३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टनुसार नोटीस फी ₹२००/-, न्यायालयात खटला दाखल केल्यानंतर कोर्ट फी ₹२००/-, प्रोसेसिंग फी ₹२००/- व खटला फी ₹११००/- खटला फी यामध्ये खटला दाखल केल्यानंतर २५% आगाऊ रक्कम देण्यात येते व उर्वरित ७५% रक्कम खटल्याचा निकाल लागल्यानंतर देण्यात येते अशी एकूण फी ₹१७००/- ची देयके अदा करण्यात येतात.

तसेच ज्या लाभार्थ्यांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे आणि ज्या प्रकरणी न्यायालयाचा अंतिम निर्णय झालेला नाही अशा प्रकरणी लाभार्थी One Time Settlement करुन थकित मुद्दल + Settlement च्या तारखेपर्यंत देय व्याज भरण्यास तयार असल्यास अशा प्रकरणी दंडणीय व्याज माफ करण्यास तसेच अशी प्रकरणे सामोपचाराने मिटत असल्यास किंवा लोकअदालत मध्ये मार्ग निघत असल्यास अशा प्रकरणी कायदे सल्लागारांना २५% फी अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे असा ठराव दिनांक २४/११/२००६ रोजी झालेल्या ४४ व्या बैठकीत संमत करण्यात आला आहे.

तसेच जवळपास १) मुंबई, २) रत्नागिरी, ३) सिंधुदुर्ग, ४) नंदुरबार, ५) सातारा, ६) अकोला, ७) वर्धा, ८) भंडारा, ९) गडचिरोली, १०) चंद्रपुर, ११) गोंदिया, १२) हिंगोली, १३) बीड, १४) जळगाव या जिल्ह्यांमध्ये कायदे सल्लागार महामंडळाचे काम करण्यास उत्सुक नाहीत त्यामुळे अशा ठिकाणी पुर्वीच्याच दराने करार करुन कायदे सल्लागारांच्या नेमणुकीच्या मान्यतेसाठी सादर.

ठराव :

"मा.सन्मा.संचालक यांनी जिल्हयातील कायदे सल्लागार (लिगल ॲडव्हायजर) यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी तसेच दिनांक ०५ मे, २०१२ पासून महामंडळाचे काम बंद करण्याबाबत मा.सहसचिव व व्यवस्थापकीय संचालक यांनी चर्चा करावी व संबंधितांना कळविण्यात यावे असा ठराव सर्व सन्मा.संचालक यांनी सर्वानुमते मांडला. तसेच मुख्य कार्यालय येथे २ कायदे सल्लागार व विभागीय कार्यालयासाठी ०६ कायदे सल्लागारांची नेमणुक महामंडळामार्फत करण्यात यावी व नोटीसा मुख्य

कार्यालयामार्फतच पाठविण्यात याव्यात असेही ठरले. ठराव सर्वानुमते मंजूर."

बाब क्र.(४.१८):- **महामंडळातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचा प्रशिक्षण अहवाल....**

महामंडळातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी दिनांक २४/१२/२०११ ते २६/१२/२०११ दरम्यान तीन दिवसाचे प्रशिक्षण कार्यक्रम मराठवाडा महसुल प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाबाबत प्रशिक्षणार्थींनी दिलेल्या मुल्यमापनाचा अहवाल व कार्यक्रमाचे वेळापत्रक खाली दिलेले आहे.

१) अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम कसे वाटले ?

१) चांगला, २) अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण हे फार उपयुक्त होते, ३) छान होता, ४)कार्यक्रमाचा वेळ कमी होता तरी पण आम्हाला बरेच काही शिकायला मिळाले, ५)कार्यक्रमाचा वेळ कमी पडला त्या कमी वेळात आम्हाला शिकण्यासाठी बरेच काही मिळाले, ६) अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केलेले प्रशिक्षण हे फार उपयुक्त होते, ७) प्रशिक्षण अतिशय चांगले व त्यात सर्व समस्यांचे निराकरण, अडचणी सुटण्यास मदत झाली, ८) उत्कृष्ट वाटले कारण या प्रशिक्षणामुळे प्रभावी कार्य करण्यास तयार झालो, ९) खुप काही शिकलो, एकदम व्यवस्थित होते, १०) उत्तम, नवीन अधिकाऱ्यांसाठी हे प्रशिक्षण आवश्यक, उपयुक्त होते, ३ दिवसात चांगली माहिती मिळाली. ११) योग्य वाटले, महामंडळाच्या सर्व योजना अटी माहिती झाल्या, १२)उत्कृष्ट, अतिशय महत्त्वाचे, आमच्या अर्धवट संकल्पना पुर्ण होण्यास वाव मिळाला, १३)खुपच छान - काम करण्यास योग्य दिशा मिळाली. प्रशिक्षण कार्यक्रम अतिशय प्रेरणादायी वाटला, १४) प्रशिक्षण हे अतिशय चांगले होते व सर्वात उत्तम वक्ते व आमचे मा.श्री.गफ्फार शेख (व्यवस्थापकीय संचालक) यांनी सांगितलेले सर्व विषय मला अतिशय चांगल्या प्रकारे समजले आहेत. १५) छान, भरपूर प्रशिक्षण मिळाले. १६) प्रशिक्षण कार्यक्रमातुन प्रत्येक अधिकारी / कर्मचाऱ्याला अगदी सोप्या भाषेत सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. १७) पुरक असे प्रशिक्षण होते सदर प्रशिक्षणात वेळेची कमतरता होती हे निश्चित. १८) प्रशिक्षण कार्यक्रमातुन प्रत्येक अधिकारी / कमचाऱ्यांना अगदी सोप्या पध्दतीत सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. १९) चांगले होते व ते वर्षातुन एकदा झाले पाहिजे. २०) प्रशिक्षण कार्यक्रम खुप फायदेशीर होते. मनामध्ये काही योजनांबद्दल शंका होती ती दुर झाली. २१) अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी आयोजित कार्यक्रम पुढील महामंडळाचे कार्य करण्याकरिता खुप उपयुक्त वाटले. २२) अतिशय महत्त्वाचे आणि उपयुक्त, अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी आयोजित प्रशिक्षण फार छान झाले. २३) पुढील कार्यासाठी, प्रगतीसाठी संबंधित विषयाला धरुन होते ज्यामुळे आमच्या मनातील जवळजवळ ८०% प्रश्नांची उत्तरे मिळाली- धन्यवाद! २४) खुप उपयुक्त असा प्रशिक्षण कार्यक्रम होता.

कार्यालयीन कपाट, चार फाईल्स रॅक, दोन संगणक, एक प्रिन्टर्स घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. फर्निचर खरेदीसाठी मा.अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) व मा.सहसचिव अल्पसंख्याक विकास विभाग व व्यवस्थापकीय संचालक यांची समिती पुढील निर्णय घेईल असा ठराव समंत करण्यात आला."

बाब क्र. (१०)(४):- **एकाच घरातील दोन ते तीन लाभार्थ्यांना कर्ज प्रकरणे मंजुर करण्याबाबत....**

महामंडळातील विविध योजनेअंतर्गत कर्ज मंजुर करताना एकाच घरातील दोन ते तीन लाभार्थ्यांना कर्ज मंजुर करण्यात आले आहे तसेच त्याच घरातील लाभार्थ्यांच्या वडिलांना देखील व्यवसाय कर्ज मंजुर करण्यात आल्याचा मुद्दा श्री.इब्राहिम पठाण, सन्मा.संचालक यांनी पुराव्यासह निदर्शनास आणून दिला. याबाबत सन्मा.संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

"एकाच घरातील दोन ते तीन लाभार्थ्यांना कर्ज प्रकरणे मंजुर करण्यात आली तसेच त्यांच्या वडिलांना अन्य योजनेअंतर्गत कर्ज मंजुर करण्यात आले या प्रकरणाचा तपास करुन सन्मा.संचालक मंडळाला अवगत करण्याचे व्यवस्थापकीय संचालक यांना सांगण्यात आले."

बाब क्र. (१०)(५):- **सन् २००७ ते २०११ या वर्षात महामंडळात मागविण्यात आलेली स्टेशनरी व त्यावरील खर्चाबाबत.....**

सन् २००७ ते २०११ या वर्षात महामंडळात मागविण्यात आलेली स्टेशनरी, त्यावरील खर्च व संबंधित नोंदवह्या याबाबतचा मुद्दा श्री.इब्राहिम पठाण, सन्मा.संचालक यांनी निदर्शनास आणून दिला. याबाबत सन्मा.संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

"सन् २००७ ते २०११ या वर्षात महामंडळात मागविण्यात आलेली स्टेशनरी व त्यावरील खर्चाबाबत तसेच त्यासंबंधी असलेल्या नोंदवह्यांबाबत चौकशी करण्यात यावी असे ठरविण्यात आले."

बाब क्र. (१०)(६):- **लाभार्थ्यांना विविध योजनेअंतर्गत मंजुर करण्यात येणाऱ्या कर्ज प्रकरणांची रक्कम RTGS मार्फत पाठविण्याबाबत....**

लाभार्थ्यांना विविध योजनेअंतर्गत मंजुर करण्यात येणाऱ्या कर्ज प्रकरणांची रक्कम RTGS मार्फत पाठविण्याचा मुद्दा श्री.इब्राहिम पठाण, सन्मा.संचालक यांनी मांडला. याबाबत सन्मा.संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

परिशिष्ट-६

ठराव :

"लाभार्थ्यांना विविध योजनेअंतर्गत मंजुर करण्यात येणाऱ्या कर्ज प्रकरणांची रक्कम RTGS मार्फत प्रदान करण्यास सन्मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे."

बाब क्र. (१०)(७):- **विभागीय स्तरावर मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री व मा.राज्यमंत्री तसेच संबंधित जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांच्या उपस्थितीत वर्षातुन ५ ते ६ वेळा अल्पसंख्यांकांच्या योजनांसाठी जनजागृती मोहिम राबविण्याबाबत.....**

विभागीय स्तरावर मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री व मा.राज्यमंत्री तसेच संबंधित जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांच्या उपस्थितीत वर्षातुन ५ ते ६ वेळा अल्पसंख्यांकांच्या योजनांसाठी जनजागृती मोहिम राबविण्याबाबतचा मुद्दा श्री.इब्राहिम पठाण, सन्मा.संचालक यांनी मांडला. याबाबत सन्मा.संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

"अल्पसंख्यांकांच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री व मा.राज्यमंत्री तसेच संबंधित जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जनजागती मोहिम वर्षातुन ५ ते ६ वेळा राबविण्यात यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले."

बाब क्र. (१०)(८):- **महामंडळातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करणेबाबत.....**

महामंडळातील मुख्य कार्यालयात गेले अनेक वर्षे विविध संवर्गात कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याबाबतचा मुद्दा श्री.इब्राहिम पठाण, सन्मा.संचालक यांनी सन्मा.संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिला. सध्याची महागाई लक्षात घेता यावर मा.अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा), श्रीमती हुस्नबानो खलिफे, सन्मा.संचालिका, श्री.मौलाना अब्बास रिझवी, सन्मा.संचालक यांनी सखोल चर्चा केली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

"महामंडळाच्या मुख्य कार्यालयात गेले अनेक वर्ष विविध संवर्गात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनात त्यांना

परिशिष्ट-७

Maulana Azad Alpasankhiyank Arthik Vikas Mahamadal Maryadit, Mumbai

Loan Disbursed under various Loan Scheme from 2010-11 & 2011-12

(Rs. In Lakhs)

Sr. No.	Year	Schemes											
		Direct Loan			Term Loan			Micro Finance			Total		
		Disbursed			Disbursed			No. of Groups	Disbursed		Disbursed		
		No. of Beni.	Amt.		No. of Beni.	Amt.			No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	
1	2010-11	8604	3041.49		424	285.73		128	1280	224.27	10308	3551.49	
2	2011-12	6616	2332.81		0	0.00		0	0	0.00	6616	2332.81	
	Total	15220	5374.30		424	285.73		128	1280	224.27	16924	5884.30	

परिशिष्ट-७अ

Maulana Azad Alpsankhyank Arthik Vikas Mahamandal Maryadit, Mumbai
Disbursement of Term/Direct/Micro Finance Scheme for the FY's 2010-11 & 2011-12

(Rs. In lakhs)

		2010-11								2011-12							
		Direct Loan		Term Loan		Micro Finance		Grand Total		Direct Loan		Term Loan		Micro Finance			Grand Total
Sr. No.	District	No. of Cases	Amount	No. of Cases	Amount	No. of SHGs	Amount	No. of Cases	Amount	No. of Beni.	Amount	No. of Beni.	Amount	No. of Groups	No. of Beni.	Amount	No. of Beni. / Amount
1	Mumbai Division:																
a)	Mumbai	432	169.45	9	6.56	20	2.76	461	178.77	447	176.77	0	0.00	0	0	0.00	447 / 176.77
b)	Thane	100	36.99	6	4.28	10	1.14	116	42.41	88	32.86	0	0.00	0	0	0.00	88 / 32.86
c)	Raigad	14	5.23	0	0.00	0	0.00	14	5.23	14	5.23	0	0.00	0	0	0.00	14 / 5.23
d)	Ratnagiri	44	15.82	1	0.76	0	0.00	45	16.58	20	7.70	0	0.00	0	0	0.00	20 / 7.70
e)	Sindhadurg	58	17.81	1	0.67	0	0.00	59	18.48	148	60.70	0	0.00	0	0	0.00	148 / 60.70
	Total	648	245.30	17	12.27	30	3.90	695	261.47	717	283.28	0	0.00	0	0	0.00	717 / 283.28
2	Nashik Division:																
a)	Nashik	199	54.36	26	18.10	0	0.00	225	72.46	371	111.12	0	0.00	0	0	0.00	371 / 111.12
b)	Dhule	256	78.76	20	12.67	0	0.00	276	91.43	71	23.42	0	0.00	0	0	0.00	71 / 23.42
c)	Jalgaon	85	31.91	5	3.90	0	0.00	90	35.81	29	10.45	0	0.00	0	0	0.00	29 / 10.45
d)	Ahmednagar	184	67.36	11	5.89	0	0.00	195	73.25	264	94.47	0	0.00	0	0	0.00	264 / 94.47
e)	Nandurbar	18	5.75			0	0.00	18	5.75	93	28.50	0	0.00	0	0	0.00	93 / 28.50
	Total	742	238.14	62	40.56	0	0.00	804	278.70	828	267.96	0	0.00	0	0	0.00	828 / 267.96
3	Amravati Division:																
a)	Amravati	183	60.39	0	0.00	0	0.00	183	60.39	29	11.02	0	0.00	0	0	0.00	29 / 11.02
b)	Buldhana	171	65.23	20	11.16	0	0.00	191	76.39	92	33.95	0	0.00	0	0	0.00	92 / 33.95
c)	Akola	420	129.17	14	10.95	0	0.00	434	140.12	166	51.09	0	0.00	0	0	0.00	166 / 51.09
d)	Yeotmal	183	58.59	38	23.69	350	29.93	571	112.41	218	64.37	0	0.00	0	0	0.00	218 / 64.37
e)	Washim	341	142.50	19	15.45	0	0.00	360	157.95	25	9.60	0	0.00	0	0	0.00	25 / 9.60
	Total	1278	455.88	91	61.45	350	29.93	1718	547.26	530	190.03	0	0.00	0	0	0.00	530 / 190.03
4	Nagpur Division:																
a)	Nagpur	541	188.71	25	16.58	10	95.00	576	300.29	517	207.61	0	0.00	0	0	0.00	517 / 207.61
b)	Wardha	210	87.02	2	1.02	0	0.00	212	88.04	93	37.68	0	0.00	0	0	0.00	93 / 37.68
c)	Bhandara	6	2.28	0	0.00	0	0.00	6	2.28	8	3.14	0	0.00	0	0	0.00	8 / 3.14
d)	Chandrapur	92	28.46	11	8.09	0	0.00	103	36.55	59	21.23	0	0.00	0	0	0.00	59 / 21.23
e)	Gadchiroli	8	2.90	1	0.57	0	0.00	9	3.47	1	0.43	0	0.00	0	0	0.00	1 / 0.43
f)	Gondia	3	1.28	1	0.71	0	0.00	4	1.99	12	4.99	0	0.00	0	0	0.00	12 / 4.99
	Total	860	310.65	40	26.97	10	95.00	910	432.52	790	275.08	0	0.00	0	0	0.00	790 / 275.08
5	Pune Division:																
a)	Pune	542	204.71	4	2.42	20	2.85	566	209.98	100	36.83	0	0.00	0	0	0.00	100 / 36.83
b)	Satara	38	14.87	0	0.00	0	0.00	38	14.87	109	39.95	0	0.00	0	0	0.00	109 / 39.95
c)	Sangli	481	161.04	3	2.33	0	0.00	484	163.37	1296	424.41	0	0.00	0	0	0.00	1296 / 424.41
d)	Kolhapur	235	99.99	3	2.28	0	0.00	238	102.27	171	72.94	0	0.00	0	0	0.00	171 / 72.94
e)	Solapur	903	291.14	13	9.98	520	55.07	1436	356.19	48	14.64	0	0.00	0	0	0.00	48 / 14.64
	Total	2199	771.75	23	17.01	540	57.92	2762	848.68	1724	588.97	0	0.00	0	0	0.00	1724 / 588.97
6	Aurangabad Division:																
a)	Aurangabad	401	148.82	28	17.81	150	15.87	579	182.30	288	105.36	0	0.00	0	0	0.00	288 / 105.36
b)	Jalna	99	36.13	21	15.25	0	0.00	120	51.38	265	96.47	0	0.00	0	0	0.00	265 / 96.47
c)	Prabhani	236	88.28	12	7.01	0	0.00	248	95.29	188	66.75	0	0.00	0	0	0.00	188 / 66.75
d)	Nanded	271	91.11	30	17.84	0	0.00	301	108.95	143	48.03	0	0.00	0	0	0.00	143 / 48.03
e)	Beed	1060	369.63	13	9.03	40	6.27	1113	384.93	681	246.07	0	0.00	0	0	0.00	681 / 246.07
f)	Osmanabad	69	27.60	52	35.39	0	0.00	121	62.99	62	27.93	0	0.00	0	0	0.00	62 / 27.93
g)	Latur	214	74.33	30	22.29	40	3.80	284	100.42	261	86.95	0	0.00	0	0	0.00	261 / 86.95
h)	Hingoli	527	183.87	5	2.85	120	11.76	652	198.50	139	49.93	0	0.00	0	0	0.00	139 / 49.93
	Total	2877	1019.77	191	127.47	350	37.52	3418	1184.76	2027	727.49	0	0.00	0	0	0.00	2027 / 727.49
	Grand Total	8604	3041.49	424	285.73	1280	224.27	10308	3551.49	6616	2332.81	0	0.00	0	0	0.00	6616 / 2332.81

परिशिष्ट-८

Maulana Azad Alpsankhiyank Arthik Vikas Mahamadal Maryadit, Mumbai

Loan Disbursed under Education Loan Scheme from 2010-11 to 2011-12

(Rs. In Lakhs)

Sr. No.	Year	Schemes: Education Loan — Disbursed — Maulana Azad EL		Rajiv Gandhi EL		Total EL Disbursement	
		No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.	No. of Beni.	Amt.
1	2010-11	1745	1020.35	373	156.08	2118	1176.43
2	2011-12	1759	1007.98	309	238.59	2068	1246.57
	Total	3504	2028.33	682	394.67	4186	2423.00

परिशिष्ट-८अ

Maulana Azad Alpsankhyank Arthik Vikas Mahamandal Maryadit, Mumbai

Disbursement of Education Loan Scheme for the FY's 2010-11 & 2011-12

(Rs. in lakhs)

Sr. No.	District	2010-11		2011-12							
		Education Loan		Maharashtra State EL		NMDFC EL		Total of MSEL+NMDFC EL		Grand Total	
		No. of Cases	Amount	No. of Benl.	Amount	No. of Benl.	Amount	No. of Benl.	Amount	No. of Benl.	Amount
1	Mumbai Division:										
a)	Mumbai	206	138.47	151	102.72	35	27.39	186	130.11	392	268.58
b)	Thane	219	56.73	141	81.34	29	17.64	170	98.98	389	155.71
c)	Raigad	34	22.13	25	19.47	4	3.40	29	22.87	63	45.00
d)	Ratnagiri	48	29.13	25	15.94	5	3.95	30	19.89	78	49.02
e)	Sindhadurg	15	7.66	4	2.24	2	1.14	6	3.38	21	11.04
	Total	522	254.12	346	221.71	75	53.52	421	275.23	943	529.35
2	Nashik Division:										
a)	Nashik	72	37.85	102	56.05	9	6.65	111	62.70	183	100.55
b)	Dhule	75	45.86	51	27.42	7	6.04	58	33.46	133	79.32
c)	Jalgaon	43	24.39	53	31.50	4	3.15	57	34.65	100	59.04
d)	Ahmednagar	89	55.49	76	47.90	15	11.95	91	59.85	180	115.34
e)	Nandurbar	8	4.22	0	0.00	1	0.90	1	0.90	9	5.12
	Total	287	167.81	282	162.87	36	28.69	318	191.56	605	359.37
3	Amravati Division:										
a)	Amravati	33	18.50	29	16.09	2	1.70	31	17.79	64	36.29
b)	Buldhana	91	46.21	123	63.28	11	8.38	134	71.66	225	117.87
c)	Akola	81	42.80	53	24.90	11	10.05	64	34.95	145	77.75
d)	Yeotmal	56	32.00	17	14.07	11	7.10	28	21.17	84	53.17
e)	Washim	13	8.44	17	11.93	16	10.85	33	22.78	46	31.22
	Total	274	147.95	239	130.27	51	38.08	290	168.35	564	316.30
4	Nagpur Division:										
a)	Nagpur	50	28.58	53	25.33	6	3.97	59	29.30	119	57.88
b)	Wardha	5	3.02	2	1.18	0	0.00	2	1.18	7	4.20
c)	Bhandara	7	4.66	1	0.45	1	0.85	2	1.30	9	5.96
d)	Chandrapur	14	9.30	10	6.29	4	3.10	14	9.39	28	18.69
e)	Gadchiroli	2	1.37	0	0.00	0	0.00	0	0.00	2	1.37
f)	Gondia	2	1.35	0	0.00	0	0.00	0	0.00	2	1.35
	Total	90	48.28	66	33.25	11	7.92	77	41.17	167	89.45
5	Pune Division:										
a)	Pune	94	57.19	90	54.85	11	9.19	101	64.04	195	121.23
b)	Satara	30	18.46	22	12.52	8	6.05	30	18.57	60	37.03
c)	Sangli	70	43.45	47	23.50	7	6.85	54	30.35	124	73.80
d)	Kolhapur	54	32.53	52	31.25	14	12.22	66	43.47	120	76.00
e)	Solapur	132	74.88	109	57.73	7	5.47	116	63.20	248	138.08
	Total	380	226.51	320	179.85	47	39.78	367	219.63	747	446.14
6	Aurangabad Division:										
a)	Aurangabad	177	93.19	137	66.74	22	17.58	159	84.32	336	177.51
b)	Jalna	16	9.45	31	16.19	4	3.75	35	19.94	51	29.39
c)	Prabhani	66	40.90	43	27.27	8	6.35	51	33.62	117	74.52
d)	Nanded	99	58.84	65	36.44	16	12.00	81	50.44	180	109.28
e)	Beed	75	50.49	100	53.97	13	10.95	113	64.92	188	115.41
f)	Osmanabad	47	23.43	35	21.07	8	5.86	43	26.93	90	50.36
g)	Latur	59	34.99	73	41.85	9	6.40	82	48.25	141	83.24
h)	Hingoli	26	20.47	22	14.50	9	7.71	31	22.21	57	42.68
	Total	565	331.76	506	280.03	89	70.60	595	350.63	1160	682.39
	Grand Total	2118	1176.43	1759	1007.98	309	238.59	2068	1246.57	4186	2423.00

परिशिष्ट-९

महामंडळ राबवित असलेल्या विविध योजना :-

१) मौलाना आजाद थेट कर्ज योजना :-
- १) कर्ज मर्यादा ₹५ हजार ते ५० हजार पर्यंत
- २) स्वगुंतवणूक ५%, कर्ज ९५%
- ३) व्याजदर (द.सा.द.शे.) ६%,
- ४) परतफेड - ५ वर्षाच्या कालावधीत

२) उत्रती मुदत कर्ज योजना :-
- १) कर्ज मर्यादा - ₹५ हजार ते १ लाखापर्यंत
- २) स्वगुंतवणूक - ५ %, कर्ज ९५%
- ३) व्याजदर (द.सा.द.शे.) ६ %
- ४) परतफेड - ५ वर्षाच्या कालावधीत.

३) राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना :-
- १) कर्ज मर्यादा - ₹५.०० लाखापर्यंत
- २) व्याजदर - फक्त ३ %.
- ३) १००% कर्ज
- ४) परतफेड:शिक्षणपूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यापासून पुढील ५ वर्षे.

४) मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजना :-
- १) कर्ज मर्यादा - ₹२.५० लाखापर्यंत
- २) व्याजदर - फक्त ३ %
- ३) १००% कर्ज
- ४) परतफेड:शिक्षणपूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यापासून पुढील ५ वर्षे.

५) सुक्ष्म पतपुरवठा योजना :-
- १) ₹२५,०००/- प्रति लाभार्थी
- २) SHG (स्वयंसहाय्यता गट)
- ३) व्याजदर - ५%
- ४) स्वयंसहायत्ता गटासाठी कर्ज दिले जाते.
- ५) परतफेड:३६ महिन्यात (१२ त्रैमासिक हप्ते)

६) महिला समृद्धी :- १) ₹२५,०००/- पर्यंत / लाभार्थी २)व्याजदर ४%

७) शेतकरी व मच्छिमारांसाठी कर्ज योजना
- १) कर्ज मर्यादा - ₹१.०० लाख प्रति लाभार्थी
- २) व्याजदर - ₹५०,०००/- पर्यंत फक्त २% प्रतिवर्ष
  - स्वगुंतवणूक - ५ %, कर्ज ९५%
  - ₹५०,०००/-पेक्षा जास्त ५% प्रतिवर्ष
  - स्वगुंतवणूक - १० %, कर्ज ९०%
- ३) कर्जाची परतफेड - ५ वर्षाच्या कालावधीत

परिशिष्ट-१०

Maulana Azad Alpasankhiyank Arthik Vikas Mahamadal Maryadit, Mumbai
Loan Disbursed under Rajiv Gandh Education Loan Scheme from 2010-11 & 2011-12

(Rs. In Lakhs)

S c h e m e s			
Sr. No.	Year	Rajiv Gandhi EL	
		No. of Beni.	Amt.
1	2010-11	373	156.08
2	2011-12	309	238.59
	Total	682	394.67

परिशिष्ट-११

ब) मिटकॉन कन्सलटंसी सर्व्हिसेस लि.पुणे या संस्थेमार्फत राबविण्यात आलेले प्रशिक्षण कार्यक्रम

अ. क्र.	वर्ष	जिल्हा	प्रशिक्षण कार्यक्रमाचे नाव	लाभार्थ्यांची संख्या	एकूण खर्च	विद्यावेतन	एकूण खर्च रुपयात
१	२००८-०९	औरंगाबाद	VTP - Imitation Jewellery	३०	१८००००		
२	२००८-०९	औरंगाबाद	EDP	४०	१०००००		
३	२००८-०९	औरंगाबाद	Mahila Samriddhi Yojana-Garment Mfg.	२०	९००००		
४	२००८-०९	औरंगाबाद	Computer Application	३०	१८००००		
५	२००८-०९	भिवंडी-ठाणे	VTP- Imitation Jewellery	३०	१८००००		
६	२००८-०९	भिवंडी-ठाणे	EDP - Mobile Repairing	४०	१०००००		
७	२००८-०९	भिवंडी-ठाणे	Mahila Samriddhi Yojana-Garment Mfg.	२०	९००००		
८	२००८-०९	भिवंडी-ठाणे	Computer Application	३०	१८००००		
९	२००८-०९	मुंबई	VTP - Jewellery	३०	१८००००		
१०	२००८-०९	मुंबई	EDP - Bakery	४०	१०००००		
११	२००८-०९	मुंबई	Mahila Samriddhi Yojana- Jardoshi Work	२०	९००००	७८००००	४०६००००
१२	२००८-०९	मुंबई	Computer Application	३०	१८००००		
१३	२००८-०९	नागपूर	VTP - Fabrication	४०	१८००००		
१४	२००८-०९	नागपूर	EDP - Food	२०	१०००००		
१५	२००८-०९	नागपूर	Mahila Samriddhi Yojana- Children Garments	३०	९००००		
१६	२००८-०९	नागपूर	Computer Application	३०	१८००००		
१७	२००८-०९	बीड	VTP - Home App. & Motor	३०	१८००००		
१८	२००८-०९	धुळे	VTP - Home App. & Motor	३०	१८००००		
१९	२००८-०९	नाशिक	VTP - Powerloom	३०	१८००००		
२०	२००८-०९	अमरावती	VTP - Tailoring & Fashion	३०	१८००००		
२१	२००८-०९	भंडारा	VTP - Mobile Repairing	३०	१८००००		
२२	२००८-०९	सोलापूर	VTP - Two / Three Wheeler	३०	१८००००		
एकूण				६६०	३२८००००	७८००००	४०६००००
एकूण अ + ब				९०३	४००००००	११४४५००	५१४४५००

परिशिष्ट-११

अ) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद या संस्थेमार्फत राबविण्यात आलेले प्रशिक्षण कार्यक्रम

अ. क्र.	वर्ष	जिल्हा	प्रशिक्षण कार्यक्रमाचे नाव	लाभार्थ्यांची संख्या	प्रशिक्षण खर्च	विद्यावेतन	एकूण खर्च रुपयात
१	२००७-०८	वाशिम	Bakery	२०	६००००		
२	२००७-०८	मालेगाव, नाशिक	Readymade Garment	२०	६००००		
३	२००७-०८	रत्नागिरी	Fashion Designing	२०	६००००		
४	२००७-०८	कागजोपुरा, औरंगाबाद	Handmade Paper	१६	६००००		
५	२००७-०८	खुलताबाद, औरंगाबाद	Vermicelli	२०	६००००		
६	२००७-०८	परभणी	Readymade Garment	२०	६००००	३६४५००	१०८४५००
७	२००७-०८	उस्मानाबाद	Fashion Designing	२०	६००००		
८	२००७-०८	नागपूर	Children Garment	२०	६००००		
९	२००७-०८	मुंबई	DTP	२२	६००००		
१०	२००७-०८	मुंबई	Garment & Zardoji Work	२५	६००००		
११	२००७-०८	पुणे	Readymade Garment	२०	६००००		
१२	२००७-०८	बुलडाणा	Furniture Cushion Work	२०	६००००		
एकूण				२४३	७२००००	३६४५००	१०८४५००

परिशिष्ट - "ब"

(महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून प्राप्त झालेली माहिती)

अल्पसंख्याक कल्याण समितीसमोरील दि.७.११.२०१२ च्या साक्षसाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची टिपणी

अ.क्र.	प्रश्नावली	तपशील
१	२	३
१	वक्फ बोर्डाची स्थापना केव्हा करण्यात आली ? वक्फ बोर्डावर किती ? व कोणकोणते सदस्य आहेत?	वक्फ बोर्डाची सन २००२ मध्ये स्थापना करण्यात आलेली आहे. सध्या वक्फ मंडळावर चार सदस्य असून त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत. १) श्री. मौलाना गुलाम अहमद वस्तानवी. २) श्री. जैनोद्दीन जव्हेरी ३) श्री. आसेफ कुरेशी ४) श्रीमती एस.एस.काद्री. श्रीमती एस.एस.काद्री दि.३१.१०.२०१२ रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे सदर रिक्त पदावर श्रीमती ऐनुल अतार, सह सचिव यांची नियुक्ती करण्याबाबत प्रस्तावित आहे.
२	राज्य वक्फ बोर्डाची कार्यपध्दती थोडक्यात विषद करावी ?	वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतूदीनूसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची निर्मीती सन २००२ मध्ये करण्यात आलेली आहे. मंडळाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विषद करण्यात येत आहे. वक्फ मंडळाच्या अधिनस्त मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी राज्यस्तरावर काम पाहतात. त्यांच्या अधिनस्त प्रादेशिक वक्फ अधिकारी व जिल्हा वक्फ अधिकारी हे काम पाहतात. वक्फ मंडळाच्या बैठकीत वक्फ अधिनियम १९९५ च्या तरतूदीनुसार व महाराष्ट्र राज्य वक्फ नियम २००३ अन्वये नोंदणी/ मुतवली / विश्वस्त / व्यवस्थापन समिती/ ॲडव्होक कमिटी/ प्रशासक/ रिसीव्हर यांच्यावर देखरेख करण्याची व वक्फ मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी मंडळावर आहे. वक्फ अधिनियम १९९५ च्या वेगवेगळया कलमाखाली प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन नोंदणी करणे, व्यवस्थापनासाठी समिती गठित करणे, वक्फांच्या मालमत्ता भाडेपटयावर देणे इ.प्रस्ताव जिल्हा वक्फ अधिकारी व प्रादशिक वक्फ अधिकारी

		यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या शिफारशीने वक्फ मंडळाच्या सभेत ठेवून मान्यता घेणे व वक्फ मंडळाच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणे. तसेच अर्ध न्यायालयीन प्रक्रिया (Quasi Judiacil) पार पाडणे.
३	वक्फ बोर्डामध्ये वर्ग १ ते ४ मधील अधिकारी, कर्मचारी यांची संख्या किती आहे?	महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात एकूण ४९ कर्मचारी आहेत त्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे. वर्ग - १ (मुख्य कार्यकारी अधिकारी) - १ वर्ग -२ - - वर्ग- ३ - ३० वर्ग -४ - १८ **एकूण - ४९**
४	वक्फ बोर्डामध्ये अभिलेखांची माहिती देण्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे ?	मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक वक्फ अधिकारी व जिल्हा वक्फ अधिकारी.
५	वक्फ बोर्डामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे कोणकोणती कामे सोपविली आहेत?	महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी असून वक्फ अधिनियम, १९९५ विविध कलमानुसार खालीलप्रमाणे कामे सोपविण्यात आली आहेत. **कलम २५-** (संबंधित वक्फ संस्थांच्या मुतवल्लीकडून लेखा आणि विवरणाबाबत माहिती घेणे, वक्फ संस्थांची तपासणी करणे इ.) **कलम २९ -** (वक्फ संस्थांशी संबंधित अभिलेख, नोंदवहया इ.तपासणी करणे.) **कलम ३३-** (विश्वस्तांच्या किंवा मुतवलींच्या निष्काळजीपणामुळे वक्फ संस्थेला झालेल्या नुकसानीची, अफरातफरीची चौकशी करणे.) **कलम -४०** (वक्फ मंडळाच्या निर्णयानुसार एखादी संस्था वक्फ असल्याचे घोषित करणे.) **कलम ५४-** (वक्फ संस्थावरील अतिक्रमण दूर करणे.) **कलम ५५-** (कलम ५४ खाली निर्गमित केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीकरिता उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करणे.) **कलम ७३ -** (देयके अदा करण्याबाबत बँकांना/अन्य व्यक्तींना निर्देश देणे.)

६	वक्फ बोर्डामध्ये पदे भरण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात येते ? याबाबतची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी .	सध्या एकूण ४९ पदे अस्तित्वात आहेत. त्यापैकी ४२ पदे मराठवाडा वक्फ मंडळ असतांना विविध ठराव व आदेशनुसार भरण्यात आली आहेत. उर्वरित ७ पदे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या निर्मितीनंतर भरण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी शासनाने १०६ पदांकरिता मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर पदांकरिता ५ प्रादेशिक कार्यालय सुरु करण्याकरिता आवश्यक ती तरतूद मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
७	वक्फ बोर्डाचे वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे आहे उक्त अंदाजपत्रकातील एकूण किती रक्कम अल्पसंख्याक प्रवर्गातील लोकांना राखून ठेवण्यात आली आहेत ?	२०१२-१३ वार्षिक अंदाजपत्रक- रु.७,६९,८०,०००/-. वक्फ मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची आहे. अल्पसंख्याक प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी अशी कोणतीही योजना वक्फ मंडळाकडे शासनाकडून देण्यात आलेली नाही व त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद वक्फ मंडळाकडे वर्ग करण्यात आलेली नाही.
८	राज्यात कोणकोणत्या ठिकाणी वक्फ बोर्डाची कार्यालये सध्या कार्यरत आहेत ?	**मुख्यालय औरंगाबाद -** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या दि.४.११.२००७ च्या सभेतील ठराव क्र.८/ २००७ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे प्रादेशिक कार्यालय सुरु करण्यांत आलेली आहेत. **प्रादेशिक कार्यालय-** मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती मराठवाडा विभागात पूर्वीपासून खालीलप्रमाणे **जिल्हा कार्यालय** कार्यरत आहेत. औरंगबाद, जालना, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद, लातूर.
९	वक्फ बोर्डासाठी केंद्र शासनाकडून किती रक्कम वर्षाला प्राप्त होते या रकमेचा विनियोग कशाप्रकारे करण्यात येतो ?	सद्य:स्थितीत केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला कोणतेही नियमित वा आवर्ती अनुदान प्राप्त होत नाही. तथापि, केंद्र शासनाकडून संगणकीकरणासाठी (एन. आय.सी.) वामसी प्रकल्पाकरिता एकूण रक्कम रु.३४,२३,५६४/- प्राप्त झाले असून त्यापैकी रु.२२,९२,९४१/- एवढी रक्कम खर्च झाली आहे. उर्वरित रक्कम रु.११,३०,६२३/- शिल्लक असून

		त्याचा ही संगणकाच्या कामासाठी लवकर विनियोग करण्यात येत आहे. शिवाय, केंद्र शासनाने राज्यातील विविध वक्फ मंडळांच्या बळकटीकरणासाठी एक योजना राबविण्याचे प्रस्तावित असून सदर योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत (२०१२-२०१७) एकूण वार्षिक रु.७५.१३ लक्ष इतके सहाय्यक अनुदान केंद्र शासनाकडून अपेक्षित असून या अनुदानात केंद्र शासनाने वार्षिक ५% वाढ गृहित धरलेली आहे. सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप सुरु करण्यात आलेली नाही.
१०	वक्फ बोर्डाला शासनाकडून किती एकर जागा मिळाली आहे व कोणकोणत्या ठिकाणी तसेच त्याचा विनियोग कशाप्रकारे केला जातो ?	शासनाकडून वक्फ मंडळाला कोणती ही जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.
११	वक्फ बोर्डाकडे किती स्थावर व जंगम मालमत्ता आहे त्याचा वापर कसा केला जातो ?	महाराष्ट्र राज्यातील वक्फांचे सर्वेक्षणामध्ये राज्यातील वक्फांचे विभाग निहाय व ढोबळमानाने एकूण २०१९४ वक्फ संस्था असून शेत जमीन क्षेत्र ३१०५९ हेक्टर ७ आर जमीन असून बिन शेती जमिनीचे क्षेत्र २६७२ हे.७८ आर अशी एकूण ३३७३२ हेक्टर ४८ आर जमीन आहे. वरील एकूण वक्फांच्या संख्येपैकी ५८९१ वक्फ संस्था नोंदणीकृत आहेत. उर्वरित वक्फ संस्थांच्या नोंदणीचे काम सुरु आहे. संस्थेकडे दोन मोटार वाहन, १९ संगणक व कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार फर्निचर उपलब्ध आहे.
१२	वक्फ बोर्डची मालमत्ता भाडेपट्टयाने देण्याची कार्यपध्दती कोणत्या प्रकारे अवलंबिली जाते याबाबतची माहिती देण्यात यावी ?	मराठवाडयामध्ये वक्फ मंडळाच्या सरळ निगराणीमध्ये असलेल्या वक्फांचे संबंधित असलेली वक्फ शेत जमीन एक साल लावणीवर देण्यासाठी वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिध्द करुन ज्या लावणीदाराची रक्कम जास्त असेल त्यांना वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ नुसार ११ महिन्यासाठी देण्यात येते. तसेच मराठवाडयाबाहेरील महाराष्ट्रात इतर विभागात ज्या त्या संस्थेच्या विश्वस्त व व्यवस्थापन

		समितीवरील कार्यपध्दती अवलंबून शेतीची जमीन एक साल लावणीवर देण्यात येते. बिन शेतीची जमीनीसाठी मराठवाडा विभागात ज्या वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या सरळ निगराणीखाली आहेत त्यांना जिल्हा वक्फ अधिकारी यांच्या प्रस्तावास वक्फ मंडळाच्या सभेसमोर ठेवून त्यांचे मान्यतेनुसार भाडे निश्चित करुन भाडे करार करण्याची कार्यपध्दती आहे. महाराष्ट्रातील इतर विभागात ज्या त्या वक्फ संस्थांनी मागणी केल्यास त्यांना ही वक्फ मंडळाच्या मंजूरीनुसार मान्यता देण्यात येते.
१३	वक्फ बोर्डाची अंशदानाची वसुली कशाप्रकारे केली जाते ?	एकूण उत्पन्नावर वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ७२ नुसार ७% वक्फ फंड मंडळाचे अंशदानाची तरतूद करण्यात आली. त्यानुसार मराठवाडा विभागात ७% वक्फ फंड उत्पन्नावर अंशदान म्हणून घेण्यात येत आहे. वक्फ मंडळाच्या बैठकीत निर्णयानुसार महाराष्ट्रातील इतर विभागात २% रक्कम अंशदान म्हणून वसूल करण्यात येत आहे.
१४	वक्फ बोर्डामध्ये मूल्यनिर्धारणावर जिल्हा निहाय नोंदवही ठेवण्यात आली आहे काय असल्यास, केव्हापासून तसेच ती अद्ययावर स्वरुपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहे ?	वक्फ मंडळाच्या निर्मितीपासून (सन२००२) वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ प्रमाणे वक्फ मालमत्तांच्या तपशीला संबंधित नोंदवही ठेवण्यात येत आहे. आतापर्यंत ५८९१ वक्फांची नोंदणी करण्यात आली असून उर्वरित वक्फ संस्थांची नोंदणी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून प्रयत्न सुरुआहेत.
१५	वक्फ बोर्डामध्ये गेल्या ३ वर्षामध्ये वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे आहे उक्त अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम अल्पसंख्याक प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राखून ठेवण्यात आली आहे ?	सन २००८-०९ - १,०८,२५,०१४/- सन २००९ - १०- १,१२,८२,७३८/- सन २०१०-११ - ३,८४,९०,०००/- वक्फ मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची आहे. अल्पसंख्याक प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी अशी कोणतीही योजना वक्फ मंडळाकडे शासनाकडून देण्यात आलेली नाही व त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद वक्फ मंडळाकडे वर्ग करण्यात आलेली नाही. म्हणून सदरच्या कारणास्तव रक्कम ठेवण्यात येत नाही.
१६	राज्यातील वक्फ बोर्डाची मालमत्ता कोणकोणत्या व्यक्तींना देण्यात आली आहे	वक्फ संस्थेच्या विश्वस्ताकडून किंवा मुतवल्लीकडून जिल्हा वक्फ अधिकारी किंवा

	त्याचा विस्तृत तपशील देण्यात यावा . बोर्डाची मालमत्ता खाजगी व्यक्तींना/संस्थांना देता येते काय याबाबत बोर्डाची काय कार्यपध्दती आहे ?	प्रादेशिक वक्फ अधिकारी यांचा अहवाल मागवून सदरचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीसमोर ठेवून भाडे निश्चित करुन व मंडळाच्या मान्यतेने मंजूर झाल्यानंतर संबंधितांना व संस्थांना जागा वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ च्या अधीन राहून देण्यात येत आहे. यादी सोबत जोडली आहे.
१७	आतापर्यंत देण्यात आलेल्या जागचा वापर कोणत्या कारणासाठी होतो आहे. याबाबतचा विस्तृत तपशील देण्यात यावा ?	मराठवाडयातील सरळ वक्फ मंडळाच्या निगराणीखाली असलेल्या वक्फ संस्थांच्या मिळकती शेतीची लावणी करण्यासाठी देण्यात येते. तसेच गरीब होतकरु व गरजू लोकांना निवासासाठी, छोटे व्यवसाय करण्यासाठी, शैक्षणिक संस्थांना शिक्षणाच्या उपक्रमासाठी जागा देण्यात आलेली आहे.
१८	राज्यात वक्फ बोर्डाची मालमत्ता विकसित करतांना कोणत्या अटी व शर्तींच्या अधीन राहून "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात आले?	वक्फ अधिनियम,१९९५ चे कलम ३२ (४) मधील तरतूदीनुसार विविध वक्फ संस्थानी मागणी केल्याप्रमाणे त्या वक्फ संस्थांच्या संबधीत असलेल्या वक्फ मिळकतीच्या विकसित करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यात मुख्य अटी व शर्थी खालीलप्रमाणे आहेत. १. विकसित केल्यानंतर सदर मिळकतीचे कायमस्वरुपी हस्तांतर होणार नाही, मालकी वक्फ संस्थेची राहील. २. वक्फ संस्थांनी विकसित करतांना विकसित केलेल्या इमारतीमध्ये वक्फ संस्थेसाठी काही भाग कायमस्वरुपी दयावा. ३. विकसित करतांना ज्या बिल्डर्सला विकासाचे काम देण्यात येते ते त्यांचे दर वक्फ संस्थेला परवडणारे असावे .
१९	वक्फ बोर्डाची गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?	अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

परिशिष्ट - "क"

(अल्पसंख्याक विकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती)

अलपसंख्याक कल्याण समितीच्या दि. ८ मे, २०१२ ते दि. २७ नोव्हेंबर, २०१३ या कालावधीत झालेल्या बैठकांमध्ये अल्पसंख्याकं विकास विभाग,मंत्रालय, यांच्याकडून मागितलेली माहिती.

अ.क्र.	आश्वासित माहिती / विभागाकडून मागितलेली माहिती	अभिप्राय
१	१.जिल्हा परिषदेच्या स्कीम मध्ये फक्त मुलींना गणवेश देण्यात येतात तर अल्पसंख्यांक विभागाच्या स्कीममध्ये मुली तसेच मुलांना गणवेश पुरविण्यात येतात, त्यामुळे स्कीमचे ड्युप्लीकेशन होते किंवा कसे याबाबतची माहिती	अलपसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोफत गणवेश वाटप योजनेंतर्गत प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शासनाच्या अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही योजनेनुसार गणवेश वाटप होत असल्यास अशा विद्यार्थ्यास (मुले/ मुलींना) दुहेरी गणवेश वाटप होणार नाही, अशी तरतूद संबंधित शासन निर्णयामध्ये आहे. (शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग दि. २८/३/२०११ परिशिष्ट१). मोफत गणवेश वाटप योजना सन २०१३-१४ या वर्षापासून बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
	२.राज्यातील अल्पसंख्यांक कल्याण समाजाच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी देण्याबाबतची सहायक अनुदान योजनेची माहिती.	राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमुह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन या समाजातील लोकांना शिक्षण, आरोग्य, निवाससुविधा, रोजगार, पतपुरवठा व इतर मुलभूत सुविधा प्राप्त करण्यासाठी सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या समस्या / प्रश्नाबाबत संशोधन तसेच "अल्पसंख्याकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे " या विषयावर राज्य प्रशासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना यशदा, पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबतची माहिती राज्यातील जनसामान्यापर्यंत पोहोचावी या उद्देशाने या सर्व योजनांना महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राज्यातील सर्व भाषांमधील प्रमुख वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई तसेच महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),पुणे यांच्यामार्फत करण्यात येते.

३५

	३.अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतीगृहाची संपूर्ण योजना तयार करणेबाबतची माहिती.	अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्हयात वसतीगृह बांधण्यास दि. २.३.२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यातील विद्यापीठांच्या जागेवर अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह सुरु करणेसंदर्भात शासन निर्णय दि.२०.१२.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. (परिशिष्ट२) त्यानुसार सन २००९-१०, २०१०-११, २०११-१२ व २०१३-१४ मध्ये एकूण १६ वसतीगृहांसाठी वसतीगृहांना मान्यता देण्यात आली असून त्याकरिता आतापर्यंत रु.२८.२९ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

अल्पसंख्याक मुलींसाठी बांधण्यात येत असलेली वसतीगृहे

अ.क्र	जिल्हा	वसतीगृहाचे बांधकामासाठी निश्चित केलेली जागा	उपलब्ध करून दिलेला निधी रू. कोटी
सन २००९-१० मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे			
१	चंद्रपूर	नझूल मोहल्ला सिव्हीललाइन येथील शिट नं.३, ब्लॉक ३, प्लॉट नं ४, नगर भूमापन क्र. ८४, ८५ पैकी आराजी २७१६ चौ.मी. जागा	२.०७
२	नंदूरबार	मौजे टोकरतलाव, ता.जि. नंदूरबार येथील सरकारी गट नं.६५ मधील २ एकर जागा	१.००
३	औरंगाबाद	शासकीय विज्ञान संस्था परिसरात अर्धा एकर	१.००
४	पूर्णा (परभणी)	मौजे आडगाव, ता. पूर्णा येथील गट नं.६० मधील २ हेक्टर जमिन	२.००
सन २०१०-११ मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे			
५	भंडारा	भंडारा नगरपरिषदेने दिलेली गांधी विद्यालयाच्या परिसरातील २१०० चौ. मीटर	१.२५

३६

		६	कोल्हापूर	राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर	४.२२
		७	पनवेल (रायगड)	शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल	३.२१
		८	अमरावती	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,अमरावती	१.००
		सन २०११-१२ मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे			
		९	घनसावंगी (जालना)	मौजे घनसावंगी, ता. घनसावंगी येथील ग.नं. ४० मधून ०.४० आर जमिन	४.३४
		१०	पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला	विद्यापीठ आवार	१.००
		११	रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड,	विद्यापीठ आवार	१.००
		१२	मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,	विद्यापीठ आवार	२.००
		१३	उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव	विद्यापीठ आवार	१.५०
		१४	(कळमनुरी) हिंगोली	कळमनुरी येथे सर्व्हे नं.१४ येथील ८० आर जागा	१.००
		सन २०१२-१३ मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे			
		१५	जेव्हीपीडी, अंधेरी मुंबई	(महिला आर्थिक विकास महामंडळ)	०.७०
		सन २०१३-१४ मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे			
		१६	शासकीय तंत्रनिकेतन, पुणे	तंत्रनिकेतन आवार	१.००
				एकूण	२८.२९

		११ व्या पंचवार्षिक योजनेत केन्द्र शासनाच्या अल्पसंख्याक बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत परभणी, वाशिम व हिंगोली या जिल्हयांमध्ये प्रत्येकी ०२ याप्रमाणे एकूण ०६ मुलींच्या वसतीगृहांचे बांधकाम करण्यात येत असून ते प्रगतीपथावर आहे. याबाबतचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे :- अ.क्र. | जिल्हा | वसतीगृहाचे ठिकाण | मंजूर निधी (रु. लाखात) १ | हिंगोली | हिंगोली व बसमत | ३१९.१० २ | वाशिम | वाशिम व मंगरुळ पीर | ३३२.०० ३ | परभणी | परभणी व गंगाखेड | ३१९.०८ | | एकूण | ९७०.१८ त्याचप्रमाणे केंद्र शासनाने अल्पसंख्याक बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत परभणी, वाशिम व हिंगोली या जिल्हयांमध्ये अनुक्रमे ०३, ०३ (मुलींचे) आणि ०२ (मुलांचे) याप्रमाणे एकूण ०८वसतीगृहांच्या बांधकामासाठी एकूण रु.२१ कोटी ७० लक्ष इतका निधी नव्याने मंजूर केला आहे.
	४.अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींवर झालेल्या अत्याचारासंदर्भात छाननी केल्याचा अहवाल.	महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ मधील कलम १० (त्र) (परिशिष्ट ३) येथील कार्यकक्षेनुसार प्राप्त तक्रारीमध्ये लक्ष घालून अशा बाबी समुचित प्राधिकरणाकडे नेण्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत करण्यात येते. आयोगाकडे दि.८ मे,२०१२ ते २७ मे,२०१३ पर्यंत ४२०२ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ३९६२ तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली आहे.
२.	५.मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडे असलेल्या २५० कोटी रुपयांच्या भाग भांडवलाच्या	मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलात रु.२५० कोटीवरुन रु.५०० कोटी इतकी वाढ करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना व मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना या दोन शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना राष्ट्रीय अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ (NMDFC) यांची असून मौलाना

	अनुषंगाने अल्पसंख्यांकांसाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करण्याची योजना तसेच इतर योजनांचा समावेश असलेली एक सर्वसमावेशक योजना विभागाने तयार करणेबाबतची माहिती.	आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ हे NMDFC ची वाहिनीकृत यंत्रणा (state chanelising agency) आहे आणि मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना ही योजना महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. या दोन्ही योजनांच्या निधीचे स्रोत अनुक्रमे NMDFC व महामंडळ हे आहेत. तसेच महामंडळामार्फत ज्या इतर योजना राबविण्यात येत आहेत त्या प्रत्येक योजनांचा उद्देश स्वतंत्र आहे. उदा. शिक्षणाकरिता शैक्षणिक कर्ज योजना, महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी सुक्ष्म पतपुरवठा योजना,इ. राबविण्यात येतात. या सर्व योजनांची माहिती शासनाच्या www.mdd.mahashtra.gov.in व महामंडळाच्या www.mamfdc.org या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात आली आहे.
३.	६. गत दहा वर्षात वक्फ बोर्डाच्या किती जमीनीवर अतिक्रमण झाले आहे? वक्फ बोर्डाच्या ज्या जमीनीवर अतिक्रमण झाले नाही अशी किती जमीन आहे याबाबतची माहिती.	महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्याखालील किती जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे याबाबतची नेमकी माहिती उपलब्ध नाही. शासनाने प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या कृती दलाच्या (Task force) अहवालानुसार सुमारे ७०% वक्फ मालमत्तांवर बेकायदेशीर ताबा/अतिक्रमणे अस्तित्वात आहेत. वक्फ मंडळाच्या अधिपत्याखाली नेमकी किती जमीन अतिक्रमण मुक्त आहे व कोणाला किती भाडे आकारुन भाडेपट्टयावर देण्यात आलेली आहे. याबाबतची देखील निश्चित माहिती वक्फ मंडळाकडे उपलब्ध नाही. अपुरे कर्मचारी वृंद व अपुऱ्या निधी अभावी याबाबतचे सर्वेक्षण हाती घेणे वक्फ मंडळला शक्य होत नाही. वक्फ मंडळाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार वक्फ जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याच्या दृष्टिने वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ खाली सुमारे ५००० प्रकरणे सुरु करणे आवश्यक आहे.
	७. श्री. जैनुद्दिन जव्हेरी हे विधानमंडळाचे सदस्य असताना त्यांची वक्फ बोर्डावर "सदस्य" म्हणून निवड झाली होती, कालांतराने त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आले तरी त्यांची	वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये वक्फ (सुधारणा)अधिनियम, २०१३ अन्वये सुधारणा करण्यात आलेली असून सदर अधिनियमातील कलम १४ मधील तरतूदीनुसार वक्फ मंडळाचे सदस्य असलेले संसद सदस्य किंवा विधानसभा सदस्य हे ज्या दिवशी विधानसभा सदस्यत्वाचा कालावधी पूर्ण करतील त्याच दिवशी त्यांनी वक्फ मंडळाचे सदस्यत्वाचे पद रिक्त केले आहे, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, विधानपरिषद सदस्यांसंदर्भात यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला नसल्याने याबाबत संदिग्धता आहे. यासाठी दि.२०.११.२०१३ च्या पत्रान्वये अल्पसंख्याक कार्य मंत्रालय व सेंट्रल वक्फ कौन्सील यांच्याकडून दि.२३.१२.२०१३ च्या पत्रानुसार याबाबत संदिग्धता दूर करण्याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.

	वक्फ बोर्डावरील नेमणूक कायम राहिली. त्या पार्श्वभूमीवर एखाद्या विधीमंडळ सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यानंतर त्यांची वक्फ बोर्डावरील नेमणूक कायम रहाते किंवा संपुष्टात येते याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिमत	
	८. जैन, शिख, ख्रिश्चन व बौध्द लोकांसाठी अल्पसंख्याक विभागाच्या कोणत्या योजना आहेत ? उक्त लोकांना या योजनांचा फायदा मिळाला आहे किंवा कसे याबाबतची माहिती.	अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्यांकासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या योजना पुढीलप्रमाणे:- १) राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करणे. २) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना शाळांना पायाभूत सुविधांसाठी सहायक अनुदान योजना. ३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर शिक्षण शिक्षण घेणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना. ४) अलपसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ म.वि. अंपग शाळा व औदयोगिक प्रशिक्षण संस्थाना पायाभूत सोयीसुविधांसाठी अनुदान योजना ५) डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना ६) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरीता गणवेष योजना. ७) अल्पसंख्याक समाजातील शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकरिता पालकांना प्रोत्साहन भत्ता देणे. ८) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम ९) अल्प कालावधीतील व्यवसायावर आधारित पाठ्य क्रमांकरीता सहायक अनुदान. १०) अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी हेल्प लाईनची सुविधा उपलब्ध करुन देणे. ११) अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण, व योजनांना प्रसिध्दी देणे.

		१२) केंद्र पुरस्कृत योजना, अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना. १३) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यीनींकरीता वसतीगृह योजना. १४) अल्पसंख्याक सकेंद्रित क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहायक अनुदान १५) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नविन तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासाठी सहायक अनुदान योजना. १६) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरु करणे. १७) बचत गट योजना १८) मोफत प्रशिक्षण योजना व संबदध योजना १९) नागरी सेवा पूर्व परिक्षा मार्गदर्शन केंद्र आणि पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण, मराठी फाऊंडेशन वर्ग तपशील/माहिती परिशिष्ट ४ येथे नमूद केली आहे. या योजनांचा लाभ अल्पसंख्यांकाच्या सर्व प्रवर्गांना (मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, बौध्द, जैन व शीख) यांना होत आहे.
४.	९. वक्फ बोर्डावरील नियुक्ती प्रक्रियेबाबत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास अवगत करण्याबाबत	वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ अन्वये सुधारणा करण्यात आलेली असून सदर अधिनियमातील कलम १४ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर सदस्य नियुक्ती करण्याकरिता तरतुदी विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर कलमातील तरतुदींनुसार एकूण ४ संवर्गातून निवडणूकीद्वारे एक किंवा दोन व नामनिर्देशनाने एक संवर्गातून दोन तर उर्वरित दोन संवर्गातून प्रत्येकी एक अशा एकूण कमाल १२ सदस्यांची वक्फ मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती करता येते. निवडणुकीद्वारे सदस्य नियुक्त करणे आवश्यक असलेल्या संवर्गातून निवडणूक घेण्याकरिता जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दि.२९ ऑक्टोबर, २००१ च्या शासन अधिसूचनेअन्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे. निवडून आलेल्या उमेदवारांची तसेच नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येते. वरील तपशिलावरुन स्पष्ट होईल की वक्फ मंडळावर सदस्य नियुक्ती प्रक्रियेबाबत विधानमंडळ सचिवालयास अवगत करण्याविषयी वक्फ अधिनियमात तरतूद नसल्याने तशी कार्यवाही करणे शक्य होत नाही.

		अ.क्र	वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम	निर्वाचक गण	सद्यस्थिती
		१	कलम १४ (१)(ब)(i)- निवडणूक प्रक्रियेने १ किंवा २	संसदेचे राज्यातील मुस्लिम सदस्य	श्री.हुसेन दलवाई, संसद सदस्य यांच्या नियुक्तीबाबतची नस्ती मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.
		२	कलम १४ (१)(ब)(ii)- निवडणूक प्रक्रियेने १ किंवा २	राज्य विधानमंडळाचे मुस्लिम सदस्य	श्री.जैनुद्दीन जव्हेरी, विधान परिषद सदस्य (तत्कालीन) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. (दि.३.५.२०१२) श्री. दुरानी अब्दुला खान अ.लतीफ खान उर्फ बाबा जानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे (दि.३.४.२०१३)
		३	कलम १४ (१)(ब)(iii)- निवडणूक प्रक्रियेने १ किंवा २	राज्य बार कौन्सिलचे मुस्लिम सदस्य.	ॲड.श्री.असिफ शौकत कुरेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. (दि.१७.४.२०१२).
		४	कलम १४ (१)(ब)(iv)- निवडणूक प्रक्रियेने १ किंवा २	रु.१ लाख किंवा त्यापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या वक्फ संस्थांचे मुतवल्ली	श्री.हबीब फकीह व श्री.सय्यद जमील अहमद जानी मिया यांच्या नियुक्तीबाबतची करण्यात आली आहे. (दि.३.४.२०१३)
		५	कलम १४(१) (क) नामनिर्देशनाने	नगर रचना किंवा व्यवस्थापन सामाजिक कार्य, वित्तिय किंवा महसूल, कृषि आणि विकास कार्य या मधील व्यवसायिक अनुभव असलेली व्यक्ती	
		६	कलम १४ (१)(ड)- नामनिर्देशनाने	इस्लामी ईश्वर शास्त्रातील मान्यताप्राप्त	शासनाच्या मान्यतेकरिता नस्ती सादर करण्यात आली आहे

			किमान १ किंवा २	विद्याव्यासंगी	
		७	कलम १४ (१)(इ)- नामनिर्देशनाने	सह सचिव पदापेक्षा कमी नाही असे पद धारण करणारा राज्य शासनाचा अधिकारी.	श्रीमती अैनुल अत्तार, सह सचिव, (अ.वि.वि.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. (दि.१६.१.२०१३)
	१०. वक्फ बोर्डाच्या जिल्हानिहाय जमीनींची माहिती त्यातील किती जमीनींची "शासनाची जमीन" अशी नोंद आहे याबाबतची माहिती.	वक्फ मंडळाची जिल्हा निहाय जमीनीची माहिती व त्यातील किती जमीनीची शासनाची जमीन अशी नोंद आहे याबाबत माहिती संकलीत करण्यासंबधी पूर्वीपासूनच जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना वक्फ मंडळास ७/१२ च्या प्रतीसह सादर करण्यास वक्फ मंडळाकडून वेळोवेळी कळविण्यात आले आहे. मात्र वक्फ मंडळाकडे अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने महसूल विभागाकडून अभिलेखे प्राप्त करुन माहिती अवगत केली जाईल, असे वक्फ मंडळाने कळविले आहे.			
५.	११. वक्फ बोर्डाच्या जमीनीवरील अतिक्रमणांची माहिती व बोर्डाच्या जमीनीचा सॅटेलाईट सर्व्हे करणे.	राज्यातील वक्फ मालमत्तेचा सॅटेलाईट सर्व्हे करण्याच्या दृष्टीने ओयासिस टेक्नॉलॉजी या संस्थेने सादर केलेल्या Expression of Interest अनुसार एकूण २३५६६ वक्फ संस्थांच्या मालकीच्या एकूण ३७,३३०.९० हेक्टर इतक्या जमिनीचे सेटॅलाईट सर्व्हे करण्याकरिता रु.७,४६,६१,८००/-, GIS web base solution करिता रु.१०,००००००/- व software Environment करिता रु.१०,००००००/- इतका खर्च अपेक्षित आहे. संकीर्ण व किरकोळ खर्च हिशोबाबत धरल्यास सॅटेलाईट सर्व्हेसाठी एकूण सुमारे ८ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून वक्फ मंडळाची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदरचा खर्च वक्फ मंडळास करणे शक्य होईल असे वाटत नाही.			
	१२. एखाद्या विधीमंडळ सदस्यास आपले वेतन वक्फ बोर्डास देता येऊ शकते काय तसेच लोकवर्गधी जमा करुन वक्फ बोर्डास देता येऊ	सदर प्रकरणी विधी व न्याय विभागाने पुढील अर्थाचे अभिप्राय दिले आहेत :- "वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ७२(१) मधील (f) येथील परंतूक तसेच कलम ७७(१) येथील तरतुदींवरुन स्पष्ट आहे की कोणत्याही व्यक्तिला किंवा विधान सभा/विधान परिषद सदस्यांना वक्फ मंडळाला देणगी देणे कायदेशीर दृष्टया शक्य (Legally feasible) असून अशा देणग्या वक्फ फंडाचा भाग राहतील."			

	शकते काय याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिमत.	
६.	१३. धर्माच्या आधारावर जनगणना करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून अशा धर्माच्या आधारावर केलेल्या जनगणनेची विस्तृत माहिती (प्रवर्गनिहाय) जनगणना आयोगाकडून घेऊन समितीस सादर करण्यात यावी.	जनगणनेचे काम सुरु असल्यामुळे माहिती प्रसिध्द करण्यात आलेली नाही, असे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने कळविले आहे.
	१४. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येते त्या धर्तीवर अल्पसंख्याक समाजाच्या कल्याण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येते किंवा कसे याबाबतची माहिती	अनुसूचित जाती व अनु. जमाती प्रवर्गासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते. त्या धर्तीवर अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येत नाही. अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याकाच्या कल्याणाकरीता राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडून विभागास दरवर्षी नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येतो.
	१५. सन २०१३-१४ च्या राज्याच्या अर्थसंकल्पात अल्पसंख्याकासाठी शैक्षणिक	अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात रु. ३६२.०५ कोटी इतकी तरतूद असून योजनानिहाय करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीचे विवरणपत्र (परिशिष्ट ५) सोबत जोडले आहे.

	तसेच विकासात्मक बाबींसाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे याबाबतची माहिती.	
	१६. राज्यात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण इत्यादी शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या सोयीसवलती देण्यात येतात ? त्यासाठी शासनाकडून किती खर्च करण्यात येतो त्याबाबतची माहिती.	राज्यात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण इत्यादी शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या सोयीसवलती देण्यात येतात, याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे:- अ.क्र. | विभागाचे नाव | संबंधित विभागामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना १. | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | १) मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती योजना २) अल्पसंख्याक समाजाच्या संस्था व शाळांसाठी पायाभूत विकास योजना (IDMI) ३) मदरसांमधून गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी योजना (SPQEM) माहिती व तपशिल परिशिष्ट ६ येथे नमूद केली आहे. २. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १) पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिप योजना २) अल्पसंख्याक विद्यार्थीनींसाठी वसतीगृह बांधणे ३) अल्पसंख्याक बहुल भागामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यवसाय अभ्यासक्रमाची दुसरी व तिसरी तुकडी सुरु केली आहे. माहिती व तपशिल परिशिष्ट ७ येथे नमूद केली आहे. ३ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील गरीब आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची योजना लागू करण्यात आलेली आहे. त्याअन्वये पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांला रुपये २५,०००/- किंवा शैक्षणिक शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. त्याअनुषंगाने एकूण पात्र विद्यार्थी व त्यांना वाटप करण्यात आलेली वर्षनिहाय शिष्यवृत्तीच्या रकमेचा तपशील परिशिष्ट १० येथे नमूद केली आहे.

७५

		४. | अल्पसंख्याक विकास विभाग | १) राज्यातील उच्च व्यावसायिक व इ.१२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना २) अल्पसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ म.वि. अंपग शाळा व औदयोगिक प्रशिक्षण संस्थाना अनुदान ३) डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना. (परिशिष्ट ४)
	१७. राज्यामध्ये "दलित वस्ती सुधार कार्यक्रम" सुरु आहे व त्यासाठी "दलित वस्ती निधी " देण्यात येतो. त्याअनुषंगाने राज्यात अल्पसंख्याक समाजाच्या कोणत्या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे व अल्पसंख्याक समाजासाठी "दलित वस्ती निधीच्या" आधारावर अल्पसंख्याकांसाठी "विशेष निधी" उपलब्ध करुन देता येईल काय ? याबाबत विभागाचे अभिप्राय देण्यात यावे ?	अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रासाठी सन २००८-०९ या वर्षापासून क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला असून, त्याअन्वये खालील प्रयोजनांसाठी नगर परिषदा व महानगरपालिकांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे :- १) कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती | २) पिण्याच्या पाण्याची सुविधा ३) विद्युत पुरवठा | ४) सांडपाण्याची व्यवस्था ५) रस्ते / पथदिवे | ६) सार्वजनिक स्वच्छतागृहे ७) अंगणवाडी, बालवाडी केंद्र इत्यादी | ८) समाजमंदीर / सामाजिक सभागृह इत्यादी तसेच सन २०१३-१४ या वर्षापासून राज्यातील एकूण ४४० अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना पुढील पायाभूत सोयी सुविधांच्या विकासाकरिता प्रत्येकी रु.१० लक्ष इतक्या कमाल मर्यादेपर्यंत अनुदान उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे:- १) कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंतीसह सर्व सुरक्षा | २) पिण्याच्या पाण्याची सुविधा ३) विद्युत पुरवठा | ४) सांडपाण्याची व्यवस्था ५) रस्ते / पथदिवे | ६) सार्वजनिक स्वच्छतागृहे ७) अंगणवाडी, बालवाडी केंद्र इत्यादी | ८) समाजमंदीर / सामाजिक सभागृह / शादीखाना / हॉल इत्यादी

७६

	१८. अल्पसंख्याक प्रवर्गात "बौध्दाचा" देखील समावेश आहे तसेच बौध्द धर्मातील काही जाती अनुसूचित जातीमध्ये येतात त्याअनुषंगाने अल्पसंख्याक प्रवर्गात येणाऱ्या बौध्द समाजास तसेच अनुसूचित जातीमध्ये येणाऱ्या बौध्दांना कोणत्या कोणत्या सवलती/सुविधा देण्यात येतात ?	अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ हा अनुसूचित जाती तसेच नवबौध्द घटकांतील लाभार्थ्यांना देण्यात येतो. त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती सन २०१३-१४ करिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नियतव्ययासह सोबत जोडली आहे.
	१९. अनुसूचित जातीमध्ये येणारे "बौध्द" व अल्पसंख्याक प्रवर्गामध्ये येणारे "बौध्द" या दोन्हींमध्ये काय तफावत आहे ?	अनुसुचित जातीमध्ये बौध्द या समाजास वेगळी तरतुद करण्यात आलेली नाही. सदर समाजास अनुसुचित जातीसाठी असलेल्या सर्व सुविधा व योजनाचा लाभ देण्यात येतो. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडे मोठया प्रमाणावर बौध्द समाजाकडून अनुसुचित जातीचे लाभ घेण्यात येतात. या समाजास जात पडताळणी समितीकडून अनुसुचित जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात येते. अल्पसंख्याक विकास विभागाकडून बौध्द धर्मिय लोकसमुहास विभागाच्या योजनांचा लाभ देण्यात येतो.
	२०.उपरोक्त दोनही प्रवर्गातून सवलती/सुविधा किंवा लाभ प्राप्त करण्यात आल्याचे उदाहरणे आढळून आली आहेत काय?	सर्वसाधारणपणे लाभार्थ्यांना दुहेरी लाभ होणार नाही अशी तरतूद अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनांमध्ये करण्यात आली आहे. उपरोक्त दोन्ही प्रवर्गातून सवलती/सुविधा प्राप्त करण्यात आल्याची उदाहरणे आढळून आलेली नाहीत.

	असल्यास अशा तऱ्हेचा दुहेरी लाभ प्राप्त करण्यापासून रोखण्यासाठी विभागामार्फत कार्य काय्रवाही करण्यात आली?	
	२१. यापुर्वी वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींचे सॅटेलाईट सर्वे करण्याबाबत आपल्या विभागास कळविण्यात आले होते त्याअनुषंगाने आदेश निर्गमित करण्यात आल्याचे विभागाने कळविले होते. वक्फ बोर्डाची मालकी असलेली जमीन राज्यभरात विखुरलेल्या स्वरुपात असल्याने अशा जमिनींचा अचूक सॅटेलाईट सर्वे करणे व अतिक्रमण झाले असल्याचे शोधणे शक्य आहे किंवा कसे याबाबत विभागाचे अभिप्राय देण्यात यावेत.	२१ व २२) वक्फ जमिनीवरील अतिक्रमाणांचा सॅटेलाईट/व्हिडीओग्राफी सर्व्हे द्वारा शोध घेण्यास मर्यादित प्रमाणात वाव आहे, असे वाटते.
	२२.वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींचे सॅटेलाईट सर्वे शक्य	

	नसल्यास व्हीडीयोग्राफीक सर्वे करणे उपयुक्त ठरु शकेल किंवा कसे याबाबत विभागाचे अभिप्राय देण्यात यावे.	
	२३.वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींचे सॅटेलाईट सर्वे ऐवजी व्हीडीयोग्राफीक सर्वे केल्यास त्यास किती खर्च येणे व किती कालावधी लागणे अपेक्षित आहे याबाबतची विस्तृत माहिती, प्रस्ताव च अंदाजित खर्च याबाबतची माहिती.	सदर सर्वेसाठी किती खर्च अपेक्षित आहे याबाबत एखादया एजन्सीकडून Expression of Interest प्राप्त करुन घेण्याच्या वक्फ मंडळाला दि.१९.११.२०१३ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या असून त्यांच्याकडून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
	२४. सदर खर्चासाठी करावायाचा निधी शासनाकडून उपलब्ध होऊ शकतो किंवा कसे याबाबतचे विभागाचे अभिप्राय देण्यात यावे.	याबाबत वित्त विभागाच्या सल्ल्याने निर्णय होणे आवश्यक आहे.
	२५. सच्चरसमितीच्या किती व कोणत्या शिफारशी	न्या.सच्चर समितीने मुस्लिम समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीबाबतचा आपला अहवाल केन्द्र शासनास सादर केला आहे. सदर अहवालात समितीने केलेल्या २२ शिफारशी विविध विभागाशी संबंधीत असून या २२ शिफारशींवर

	शासनाने स्विकारल्या आहेत व त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात आली आहे याबाबतची माहिती देण्यात यावी. तसेच अन्य कोणत्या शिफारशींची अंमलबजावणी प्रलंबित आहे याबाबतची माहिती. (सच्चर समितीच्या अहवालाच्या २५ प्रती देखील देण्यात याव्यात.)	कार्यवाही सुरु आहे. सच्चर समितीने केलेल्या राज्य शासनाशी संबंधीत शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय संनियंत्रण व आढावा समितीची दि.१९.०५.२०१२ च्या शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली आहे (परिशिष्ट८) सच्चर समितीच्या शिफारंशीवर विविध विभागांनी केलेल्या कार्यवाहीची माहितीचे विवरण सोबत जोडण्यात आले आहे. तसेच न्या.सच्चर कमिटीच्या अहवालाच्या २५ प्रती (परिशिष्ट १३) सोबत पाठविण्यात येत आहेत. तसेच सच्चर कमिटीचा पूर्ण अहवाल www.minorityaffairs.gov.in या केन्द्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
	२६. ज्याप्रमाणे मंदिरासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो त्याप्रमाणे राज्यातील दर्ग्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो काय व नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत याबाबत विभागाने अभिप्राय द्यावेत.	ग्राम विकास विभागामार्फत ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजनेमध्ये ज्याप्रमाणे मंदिरासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो, त्याप्रमाणे राज्यातील दर्ग्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत एकूण ६ दर्गातिर्थक्षेत्रासाठी एकूण रु.५,५१,६५,०००/- इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
	२७. राज्यात जास्तीत जास्त उर्दू शाळांना मान्यता देण्याबाबत तसेच राज्यातील शाळांमध्ये उर्दू शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत तसेच	जिल्हास्तर समिती व राज्यस्तर समिती या दोन्ही समितीच्या शिफारस प्राप्त २०१ उर्दू माध्यमाच्या शाळांना परवानगी देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत राज्यात RTE अधिनियम, २००९ लागू झाला असल्याने, ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनावर आहे. त्याअंतर्गत राज्यात मराठी व उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे खाजगी संस्थेला उर्दू शाळा सुरु करण्यास

	भा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिका किंवा खाजगी उर्दू शाळांमध्ये मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था करण्याबात इतर मुलभुत सुविधांबाबत विभागाकडून काय पाठपुरावा करण्यात आला?	पारवानगी देता येणार नाही. तथापि संबंधित संस्था अल्पसंख्याक संस्था असल्याने या संस्थेस उर्दू माध्यमाची शाळा सुरु करावयाची इच्छा असल्यास त्या संस्थेस प्रचलीत नियुमानुसार स्वयंअर्थसहाय्यित शाळा (व्यवस्थापन व नियमन) २०१२ अंतर्गत नवीन शाळेसाठी अर्ज करमा येईल. परिशिष्ट १२
	२८. राज्यात अल्पसंख्याक वर्गातील उमेदवारांसाठी शासकीय, निमशासकीय सार्वजनिक उपक्रम, वैधानिक मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानावर चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठांमधील नोकऱ्यांमध्ये आरक्षण आहे काय ?	२८ व २९) अल्पसंख्याकांसाठी शासन सेवेत कोणतेही आरक्षण विहित केलेले नाही. तथापि, शासनाने मागासवर्गीयांसाठी ठेवलेले सामाजिक आरक्षण हे जाती आधारित आहे. त्यामुळे अल्पसंख्याक समाजातील ज्या जाती मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट आहेत, त्यांना त्या जाती प्रवर्गासाठी ठेवलेल्या आरक्षणाचा लाभ मिळतो. उदा. अनुसूचित जमाती मधील तडवी. विजा/भज मधील बेलदार, सेक्कलगर(मुस्लिम धर्मीय) मुस्लिम शिकलगार इ. इतर मागासवर्गीय मधील मुस्लिम भांड, तांबोळी (मुस्लिम धर्मिय पानफरोश) ही जात अनुसूचित जाती व त्यामधील बौध्द धर्मांतरीत यांना अनुसूचित जाती साठी असलेल्या आरक्षणाचा लाभ मिळतो.
	२९. असल्यास, मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन उमेदवारांसाठी प्रत्येकी किती टक्के आरक्षित आहेत ?	

	३०.सद्य:स्थितीत राज्यात शासकीय सेवेतील अल्पसंख्याकांच्या किती पदांचा अनुशेष भरणे बाकी आहे ? सदर अनुशेष भरणे बाकी आहे ? सदर अनुषेष भरण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे ?	शासकीय सेवेत अल्पसंख्याक या घटकांतर्गत कोणतेही आरक्षण विहित केलेले नाही, त्यामुळे शासन स्तरावर अल्पसंख्याकांचा अनुशेष अशी माहिती संकलित करण्यात येत नाही.
	३१. भिवंडी तसेच मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत दोन वर्षांपुर्वी घोषणा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने भिवंडी व मालेगाव येथे तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे? नसल्यास होत असलेलया विलंबाची कारणे व याप्रकरणाची सद्यस्थिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून मागविण्यात यावी.	मालेगाव, भिवंडी व मुंबई येथे अल्पसंख्याकासाठी तंत्रनिकेतन सुरू करण्यास दि.५.२.२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. (परिशिष्ट ९) सदर ठिकाणी तंत्रनिकेतन सुरू करण्यासाठी निवड झालेल्या शैक्षणिक संस्थेस एकवेळचे अनुदान म्हणून रू. ३.०० कोटी अनुदान देण्यात येणार आहे. त्यानुसार खाजगी संस्थाकडून तंत्रनिकेतन सुरू करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. मुंबई येथे तंत्रनिकेतन स्थापन करण्यासाठी फेर जाहीरातीस अनुसरून एकही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. मालेगाव व भिवंडी येथून प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये उपलब्ध जमिन शहराबाहेर असल्याचे आढळून आल्याने शासन निर्णयात बदल करून तीनही ठिकाणी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत फेर जाहीरात देवून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. यासंदर्भात मुंबईमधून एकही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. प्राप्त प्रस्तावांची अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या Approval Process Handbook (सन २०१३-१४) मध्ये मान्यता देण्याच्या प्रक्रीयेमध्ये बदल करण्यात आला त्यामुळे सुधारित निकषानुसार शासन निर्णयात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आला होता. यासंदर्भात शासकीय व खाजगी तंत्रनिकेतनात रिक्त असलेल्या जागांचा अंदाज घेऊन त्याअनुषंगाने नवीन क्षमतेच्या तंत्रनिकेतनबद्दल फेरविचार करावा, अशा आशयाचे अभिप्राय वित्त विभागाने दिले होते. तद्नंतर राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्रनिकेतनामध्ये खाजगी व शासकीय संस्थांमध्ये रिक्त असलेल्या जागांचा तपशिल संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय व संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला . या कार्यालयांकडून प्राप्त माहिती पाहता, राज्यात मोठया प्रमाणात रिक्त जागा शिल्लक असल्याचे आढळून येत असल्याचे दिसते. सबब दि.५.२.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे तंत्रनिकेतन, औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात यावी किंवा कसे. ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

	३२. राज्यात अल्पसंख्याक विकास विभागाकडून अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची तपशीलवार माहिती देण्यात यावी.	अल्पसंख्याकांच्या कल्याणकरिता राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती सोबत जोडली आहे. (परिशिष्ट-४)
	३३. वक्फ बोर्ड ॲक्टच्या १० प्रती देण्यात याव्यात.	सोबत १० प्रती ठेवल्या आहेत. (~~परिशिष्ट-५~~)

परिशिष्ट-१

राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील प्राथमिक शाळेत
शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत
गणवेष वाटप योजना.
(सन २०१०-११).

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग,
शासन निर्णय क्र.अविवि - २०१०/प्र.क्र. ९७ /कार्यासन- ७
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २८ मार्च, २०११.

संदर्भ :- १. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक पीआरई-२००३/(१७/२००३)/प्राशि-४, दिनांक २० मे, २००४
२. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. असंस-२००९/प्र.क्र.३६/कार्यासन-१, दि. २४ फेब्रवारी, २००९
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.एसएसए २०११/प्रक्र ३८ /प्राशि४, दि. ४ फेब्रुवारी, २०११

प्रस्तावना :-

सर्व शिक्षण अभियान कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेष वाटप योजना, शालेय व क्रीडा विभागाच्या संदर्भ क्र. ३ मधील दि. ४ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यन्वित करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयाच्या धर्तीवर अल्पसंख्याक विकास विभागाची अल्पसंख्याक समाजातील प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेष योजना सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील शासन मान्य सर्व शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित (इंग्रजी माध्यमांच्या कायम विनाअनुदानित शाळा वगळून) प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थीच्या अल्पसंख्यांक (मुस्लिम, बौध्द, शीख, ख्रिश्चन, जैन व पारशी) समाजातील शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना (मुलीं/मुलींना) सन २०१०-११ या वर्षापासून दोन गणवेष (२ शर्ट, २ हाफ पँट / २ स्कर्ट, २ ब्लाऊज / २ सलवार २ कमीज, २ दुपट्टा) मोफत वाटप करण्यास या आदेशाद्वारे शासनाची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तथापि, या मंजूरीतून वरील संदर्भ क्र.३ मधील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. ४ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या शासन

निर्णयामधील तरतुदीनुसार गणवेश वाटप करण्यात येणाऱ्या शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील सर्व मुली , अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची सर्व मुले, दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले यांना वगळण्यात येत आहे. या योजनेची अंमलबजावणी संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण, पुणे यांनी करावी व त्यांनी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व कार्यालय प्रमुख, शाळा व्यवस्थापन समिती आणि शाळेच्या मुख्याध्यापक / मुख्याध्यापिकांना लेखी स्वरुपात दयावी.

२. या योजनेंतर्गत गणवेषाकरिता प्रति विद्यार्थी रु.४००/- (रुपये चारशे फक्त) देय राहील. उपलब्ध माहितीनुसार प्राथमिक शाळेत एकूण अंदाजे ४,५०,००० (चार लक्ष पन्नास हजार) विद्यार्थीसंख्या (शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेंच्या शाळेतील मुली अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची सर्व मुले, दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले यांना वगळता) अल्पसंख्यांक विद्यार्थी / विद्यार्थिनी असून त्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

३. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या गणवेषाची शिलाई, स्थानिक महिला बचत गटामार्फत करण्यात यावी. जर एखाद्या ठिकाणी महिला बचत गट उपलब्ध नसेल तर नजिकच्या बचत गटांमार्फत शिलाई करुन घ्यावी आणि जर नजिकच्या ठिकाणी बचत गट नसेल तर स्थानिक शिंप्याकडून शिलाई करुन घेण्यात यावी.

४. या योजनेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास (मुले/मुली) दोन गणवेष देण्यात यावेत. शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना खाकी पॅन्ट व सफेद रंगाचा शर्ट व मुलींना नेव्ही ब्ल्यु रंगाचा स्कर्ट व सफेद रंगाचा ब्लाऊज अशा प्रकारचा गणवेष देण्यात यावा व विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी गणवेष संबंधित शाळांनी निश्चित केलेल्या गणवेषाप्रमाणे असावेत. गणवेषासाठी लागणारे कापड शासनाने आरक्षित केलेल्या महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून शासनाने विहित केलेल्या दरकराराप्रमाणे घेण्यात यावे.

५. गणवेषाचे कापड, गणवेषाची शिलाई, गणवेष प्रमाणित करणे व इतर बाबी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी दि. ४ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केल्याप्रमाणे असतील.

६. सदर योजनेतंर्गत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेष वाटप करतांना याबाबतचा प्राथम्यक्रम खालील प्रमाणे राहील :-

१. विना अनुदानित /(खाजगी) शाळेतील दारिद्रय रेषेखालील अल्पसंख्याक मुली
२. शासकीय शाळां / स्थानिक स्वराज्य संस्था/ जिल्हा परिषद शाळांमधील अल्पसंख्याक समाजातील सर्व मुले

३. खाजगी / विनाअनुदानित शाळांतील (इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळा वगळून) अल्पसंख्यांक लोकसमूहातील मुले / मुली.

७. प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शासनाच्या **अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही योजनेनुसार गणवेष वाटप होत असल्यास अशा विद्यार्थ्यांस (मुले/मुलींना) दुहेरी गणवेष वाटप होणार नाही याची जबाबदारी शिक्षण संचालक , अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेवर राहील.**

८. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र. झेड ई-१, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०३) प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता गणवेषासाठी सहायक अनुदान (२२३५-ए-१०४) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) " या खाली सन २०१०-११ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.mdd.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०३२९१११०१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्यंकटेश भट)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई ,
प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई, त्यांना विनंती आहे की, मा.विधानसभा / विधानपरिषद सदस्यांना कृपया या शासन निर्णयाची प्रत वितरीत करावी,

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
निबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, मुंबई,
निबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर,
निबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, सर्व महानगरपालिका
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, १,मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, १,मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, २, नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, २, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागरे
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, प्रशासकीय इमारत ,मंत्रालयासमोर, मुंबई
संचालक, प्रशिक्षण शिक्षण, पुणे
सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
वित्त विभाग (व्यय-४ आर्णि अर्थ-१४) मंत्रालय, मुंबई,
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती.
* पत्राद्वारे.

राज्यातील अल्पसंख्याक समाजातील प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेष वाटप योजना.
(सन २०१०-११).

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शुध्दीपत्रक क्रमांक:अविवि-२०१०/प्र.क्र.९७/का-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २७ जून, २०११
वाचा :- शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग,क्र.अविवि-२०१०/प्र.क्र.९७/का.७, दि.२८ मार्च, २०११.

शुध्दीपत्रक

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अविवि-२०१०/प्र.क्र.९७/का.७, दि.२८ मार्च, २०११ मधील परिच्छेद ४ येथील "शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना खाकी पॅन्ट व सफेद रंगाचा शर्ट व मुलींना नेव्ही ब्ल्यु रंगाचा स्कर्ट व सफेद रंगाचा ब्लाऊज अशा प्रकारचा गणवेष देण्यात यावा व विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी गणवेष संबंधित शाळांनी निश्चित केलेल्या गणवेषाप्रमाणे असावेत " या वाक्याऐवजी " शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना खाकी पॅन्ट व सफेद रंगाचा शर्ट आणि विद्यार्थीनींना नेव्ही ब्ल्यु रंगाचा स्कर्ट व सफेद रंगाचा ब्लाउज किंवा सलवार, कमिज व दुपट्टा अशा प्रकारचा गणवेष देण्यात यावा व विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी गणवेष संबंधित शाळांनी निश्चित केलेल्या गणवेषाप्रमाणे असावेत " असे वाचण्यात यावे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद ६ येथील अनुक्रमांक १ " विनाअनुदानित / (खाजगी) शाळांतील दारिद्रय रेषेखालील अल्पसंख्याक मुली " याऐवजी "अनुदानित/विनाअनुदानित (इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळा वगळून) शाळांमधील अल्पसंख्याक समाजातील दारिद्रय रेषेखालील विद्यार्थी/विद्यार्थीनी " असे वाचण्यात यावे. तर याच परिच्छेदातील अनुक्रमांक ३ " खाजगी/विनाअनुदानित शाळांतील (इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळा वगळून) अल्पसंख्याक लोकसमूहातील मुले/मुली " याऐवजी " खाजगी अनुदानित/विनाअनुदानित शाळांतील (इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळा वगळून) अल्पसंख्याक लोकसमूहातील विद्यार्थी/विद्यार्थीनी " असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(व्यंकटेश भट)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

परिशिष्ट-२

अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण
घेणा-या मुलींसाठी विद्यापीठात वसतीगृहे
सुरु करण्याबाबत योजना.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय वसगृ-२०११/प्र.क्र.१३०/का.८,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०११.

वाचा : शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि-२००९/प्र.क्र.१५/ का.८, दि.०२.०३.२०१०.

प्रस्तावना :-

अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये वसतीगृहे सुरू करण्याबाबतचा शासन निर्णय दि. ०२.०३.२०१० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीवर विद्यापीठांमार्फत अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह बांधण्यासंदर्भात सदर शासन निर्णयातील काही अटींमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीवर अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह बांधण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

१. अल्पसंख्याक मुलींच्या वसतीगृहासाठी विद्यापीठ जमिन देवून स्वत: बांधकाम करणार असल्यास वसतीगृहाचे बांधकाम विद्यापीठामार्फत त्यांच्या आराखडयानुसार करता येईल. त्यासाठी आराखडा व अंदाजपत्रक शासनाकडून मान्य करून घेणे बंधनकारक राहील. अन्यथा मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तयार केलेल्या नकाशा व अंदाजपत्रकानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकाम करता येईल.

२. वसतीगृहाच्या जमिनीवर विद्यापीठाची मालकी राहील तसेच जमिनीबाबतचे हक्क व अधिकार विद्यापीठाकडे रहातील.

३. अल्पसंख्याक मुलींच्या वसतीगृहाच्या इमारतीचा उपयोग अल्पसंख्याक मुलींच्या वसतीगृहाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाबींसाठी करता येणार नाही, या अटीच्या अधिन राहून अल्पसंख्याक विकास विभागाकडून उपलब्ध करून दिलेल्या निधीमधून बांधलेल्या वसतीगृहाच्या इमारतीबाबतचे सर्व हक्क व अधिकार विद्यापीठाकडे रहातील.

४. सदर वसतीगृहासाठी आवश्यक फर्निचरकरीता अल्पसंख्याक विकास विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. मात्र वसतीगृहाच्या इमारतीची देखभाल व दुरुस्ती तसेच वसतीगृह चालविण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी विद्यापीठास निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

५. वसतीगृह विद्यापीठामार्फतच चालविण्यात येईल.

६. या वसतीगृहात १०० मुलींच्या निवासाची सोय करण्यात येईल. यापैकी ७०% जागा अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी राखीव असतील तर उर्वरित ३०% जागा बिगर अल्पसंख्याक समाजातील मुलींमधून शासनाच्या प्रचलित आरक्षणानुसार भरण्यात येतील.

७० जागांपैकी मुस्लिम मुलींसाठी ३५, बौध्द मुलींसाठी २१, ख्रिश्चन मुलींसाठी ६, जैन मुलींसाठी ६, शीख व पारसी मुलींसाठी प्रत्येकी १ जागा राखीव असेल. तसेच एका प्रवर्गातील मुली उपलब्ध न झाल्यास अन्य प्रवर्गातील मुलींना रिक्त जागी प्रवेश देण्यात येईल. सदर वसतीगृहात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणा-या अल्पसंख्याक समुदायातील मुलींनाच प्रवेश देण्यात येईल व जर काही जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा विद्यापीठामार्फतच इतर विदयार्थीनीना प्रवेश देवून भरता येतील.

७. अल्पसंख्याक मुलींच्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी विद्यापीठ किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार आवश्यक निधी अल्पसंख्याक विकास विभागाकडून संबधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत उपलब्ध करून दिला जाईल.

८. वसतीगृह चालविण्यासाठी येणारा दैनंदिन खर्च व इमारतीच्या देखभालीवरील खर्च वसतीगृहात प्रवेश घेणाऱ्या मुलींकडून निवास व भोजन व्यवस्थेसाठी वाजवी दराने फी/भाडे आकारणी करून भागविण्यात यावा. आकारण्यात येणारे भाडे / फी चे दर विद्यापीठामार्फत चालविण्यात येणा-या इतर वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणा-या फी पेक्षा जास्त असू नये.

९. अल्पसंख्याक मुलींच्या वसतीगृहाचे निरीक्षण करण्याचे अधिकार अल्पसंख्याक विभागाचे अधिकारी किंवा प्रतिनिधी यांना राहील.

१०. वसतीगृहाच्या इमारतीचा उपयोग अल्पसंख्याक समाजातील शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या निवासाव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडई-१, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २००- इतर कार्यक्रम, (०१)(०८) शहरातील अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतीगृहाकरिता सहाय्यक अनुदान (२२३५ ए १४२) ३१ सहाय्यक अनुदान" या लेखाशीर्षातंर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

३. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.mdd.maharashtra.gov.in)उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक क्र. २०१११२२००९४६२३९२२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(एस. एस. काद्री)
शासनाचे सहसचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
राज्यातील सर्व विद्यापीठे
संचालक, लेखा व कोषागारे
सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
सर्व मंत्रालयीन विभाग
उपसचिव, वित्त विभाग व्यय-४,मंत्रालय, मुंबई
उपसचिव,नियोजन विभाग १४७५,मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.

परिशिष्ट-३

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, ऑगस्ट ८, २००५/श्रावण १७, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

	पृष्ठे
सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—राज्य अल्पसंख्याक आयोग घटित करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.	४२९-४३६

दिनांक ५ ऑगस्ट २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ८ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

राज्य अल्पसंख्याक आयोग घटित करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ३० नोव्हेंबर, २००० रोजी मांडलेले महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग विधेयक, २००० (सन २००० चे विधानसभा विधेयक क्रमांक ७८) हे दिनांक ३० एप्रिल, २००२ रोजी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले होते आणि ते संयुक्त समितीकडे प्रलंबित होते ;

आणि ज्याअर्थी, अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधी, अल्पसंख्याक आयोगाचा, दीर्घकाळ प्रलंबित असलेला सांविधिक दर्जा [illegible] शासनाकडे सतत विनंती करीत होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नसते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी राज्य अल्पसंख्याक आयोग घटित करण्याकरिता कायदा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून त्यांनी दिनांक २४ ऑगस्ट २००४ रोजी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अध्यादेश, २००४ प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. २९.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे विवक्षित फेरबदलांसह राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

प्रारंभिक

संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २४ ऑगस्ट, २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "आयोग" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेला महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, असा आहे ;

(ख) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा सदस्य, असा आहे ;

(घ) "अल्पसंख्याक" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यात राहणारा आणि शासनाने ज्याला अल्पसंख्याक म्हणून राजपत्रातील आदेशाद्वारे वेळोवेळी घोषित केले आहे असा लोकसमूह, असा आहे ;

(ङ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(च) "सचिव" याचा अर्थ, आयोगाचा सचिव, असा आहे.

प्रकरण दोन

राज्य अल्पसंख्याक आयोग

आयोग घटित करणे.

३. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, शासन, मुंबई येथे मुख्यालय असलेले, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग म्हणून संबोधले जाणारे एक मंडळ या अधिनियमान्वये आयोगाला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि त्याच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, घटित करील.

(२) हा आयोग, पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल,—

(क) प्रतिष्ठित, सक्षम व प्रामाणिक व्यक्तींमधून शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक अध्यक्ष, उपाध्यक्ष व नऊ इतर सदस्य :

परंतु, अध्यक्ष व उपाध्यक्षासह सर्व सदस्य हे अल्पसंख्याकांमधील असतील ; आणि

(ख) शासनानें नियुक्त केलेला आयोगाचा सचिव हा शासनाच्या उप सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसेल.

अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती.

४. (१) शासनाच्या मर्जीला अधीन राहून, आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व प्रत्येक सदस्य हा, त्याने अधिकारपद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(२) आयोगाच्या अध्यक्षास, उपाध्यक्षास किंवा सदस्यास आपल्या सहीनिशी, शासनाला संबोधून लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, परंतु, त्याचा राजीनामा स्वीकृत करण्यात येईपर्यंत तो पद धारण करणे चालू ठेवील.

(३) अध्यक्षाला, उपाध्यक्षाला किंवा इतर सदस्यांना, विहित करण्यात येतील असे वेतन व भत्ते मिळतील.

(४) अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते, कलम ११ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून भागवण्यात येतील.

(५) सदस्याचे नैमित्तिक रिक्त पद शासनाकडून शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल आणि अशाप्रकारे नामनिर्देशित केलेला सदस्य हा, ज्याच्या जागी त्याचे नामनिर्देशन झाले असेल अशा सदस्याने जोपर्यंत ते पद धारण केले असते तोपर्यंत ते पद धारण करील.

(६) अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, उपाध्यक्ष हा, अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांखालील अध्यक्षाची कार्ये पार पाडील.

अनर्हता.

५. (१) कोणतीही व्यक्ती जर—

(क) ती, शासनाच्या मते ज्यामध्ये नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव आहे अशा अपराधाबद्दल दोषी ठरविलेली असेल आणि तिला कारावासाची शिक्षा झाली असेल ; किंवा

(ख) ती विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने ती तशी असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(ग) ती अमुक्त नादार असेल ; किंवा

(घ) तिला केंद्र सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या सेवेतून किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांचे नियंत्रण असलेल्या संस्थेच्या किंवा महामंडळाच्या सेवेतून काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल ; किंवा

(ङ) तिने काम करण्यास नकार दिला असेल किंवा ती काम करण्यास असमर्थ झाली असेल ; किंवा

(च) आयोगाकडून अनुपस्थितीची परवानगी न घेता आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना ती अनुपस्थित राहिली असेल ; किंवा

(छ) तिने अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य पदाचा अशा प्रकारे गैरवापर केला असेल की, ज्यामुळे तिचे पदावर राहणे अल्पसंख्याकाच्या हिताच्या किंवा लोकहिताच्या दृष्टीने हानीकारक ठरेल असे शासनाचे मत असेल,

तर तिला अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा यथास्थिति, सदस्य म्हणून, नियुक्त केले जाण्यासाठी आणि त्या पदावर राहण्यासाठी अनर्ह ठरविण्यात येईल :

परंतु कोणत्याही व्यक्तीला, त्याबाबतचे आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय या खंडान्वये तिला पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये अनर्ह ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस शासनाकडून पदावरून दूर करण्यात येईल.

आयोगाचा सचिव.

६. (१) सचिवाला, शासन वेळोवेळी निर्धारित करील असे वेतन व इतर भत्ते मिळतील.

(२) शासनास, सचिवाला, वेळोवेळी, अनुपस्थितीची परवानगी देता येईल.

(३) सचिव हा आयोगाचा मुख्य कार्यकारी असेल आणि तो,—

(क) आयोगाच्या अनुदानाचा उपयोग करील ;

(ख) आयोगाचे लेखे ठेवण्याची व्यवस्था करील ; आणि

(ग) हा अधिनियम किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांद्वारे किंवा त्यांअन्वये त्याच्यावर सोपविण्यात आली असतील अशी इतर कार्ये पार पाडील.

आयोगाचा कर्मचारीवर्ग.

७. (१) शासन, आयोगाचे कामकाज योग्य रीतीने होण्यासाठी आवश्यक असेल असा कर्मचारी वर्ग आयोगाला पुरवील.

(२) आयोगाचा सचिव व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते आणि निवृत्तीवेतन यांसह आयोगाचा प्रशासनिक खर्च, कलम ११ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

आयोगाच्या बैठकी.

८. (१) आयोगाची बैठक आवश्यक असेल त्या त्यावेळी मुंबईत किंवा अध्यक्षाला योग्य वाटेल अशा इतर ठिकाणी होईल :

परंतु, आयोगाची बैठक तीन महिन्यांतून किमान एकदा होईल.

(२) आयोग आपली स्वतःची कार्यपध्दती विनियमित करील.

(३) आयोगाचे सर्व आदेश व निर्णय सचिवाकडून किंवा सचिवाने त्याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या, आयोगाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

रिक्त पदे इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही विधिअग्राह्य न होणे.

९. आयोगामध्ये कोणतेही पद रिक्त आहे किंवा त्याच्या घटित होण्यात कोणताही दोष आहे याच केवळ कारणासाठी आयोगाच्या कोणत्याही कृतीबाबत किंवा कार्यवाहीबाबत हरकत घेण्यात येणार नाही किंवा कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही विधिअग्राह्य ठरविण्यात येणार नाही.

प्रकरण तीन

आयोगाची कार्ये

आयोगाची कार्ये.

१०. (१) आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(क) अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी भारताच्या संविधानामध्ये आणि राज्य विधानमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यांमध्ये तरतूद करण्यात आलेल्या विविध संरक्षक उपाययोजनांच्या कार्यक्षमतेची तपासणी करणे ;

(ख) सर्व संरक्षक उपाययोजनांचे प्रभावी कार्यान्वयन व अंमलबजावणी होण्याची खात्री करून घेण्याच्या दृष्टीने शिफारशी करणे ;

(ग) संविधान आणि संसदेने आणि राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेले कायदे यात तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजना आणि अल्पसंख्याकांसाठी असलेली राज्य शासनाची धोरणे आणि योजना यांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवणे ;

(घ) अल्पसंख्याकांच्या बाबतीत होणारा भेदभाव टाळण्याच्या प्रश्नाबाबत अभ्यास, संशोधन व विश्लेषण करणे ;

(ङ) शासन, शासकीय उपक्रम, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या सेवेतील अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधित्वाचे वास्तविक निर्धारण करणे आणि प्रतिनिधित्व अपुरे असल्यास त्याबाबतीत इच्छित पातळी गाठण्यासाठी उपाय सुचविणे ;

(च) राज्यात जातीय ऐक्याची सुनिश्चिती करण्यासाठी, ते राखण्यासाठी आणि त्याला उत्तेजन देण्यासाठी शिफारशी करणे ;

(छ) शासनाला विहित कालांतराने नियतकालिक अहवाल सादर करणे ;

(ज) अल्पसंख्याकांचे कल्याण आणि विकास यांच्या दृष्टीने, आयोगाच्या मते महत्त्वाची असेल, अशा इतर कोणत्याही बाबीचा अभ्यास करणे आणि समुचित शिफारशी करणे ;

(झ) अल्पसंख्याकांच्या गाऱ्हाण्यांचा विचार करणे आणि त्यांवर वेळोवेळी यथोचित उपाय सुचविणे ;

(ञ) अल्पसंख्याकांना अधिकार व संरक्षक उपाययोजना यांपासून वंचित ठेवण्यासंबंधातील विनिर्दिष्ट तक्रारींमध्ये लक्ष घालणे आणि अशा बाबी समुचित प्राधिकरणाकडे नेणे ;

(ट) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी असलेल्या पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन व पर्यवेक्षण करणे ;

परंतु, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही प्रकरण राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अधिनियम, १९९२ याच्या कलम ३ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाने हाती घेतले असेल तर, अशा प्रकरणामध्ये राज्य आयोगास असलेली अधिकारिता समाप्त होईल. १९९२ चा १९.

(२) शासन, आयोगाच्या शिफारशीच्या संबंधात केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कारवाईसंबंधीचे ज्ञापन आणि अशा शिफारशींमधील कोणतीही शिफारस स्वीकारण्यात आली नसल्यास त्यासंबंधीची कारणे यांसह आयोगाच्या शिफारशी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्याची व्यवस्था करील.

प्रकरण चार

वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

आयोगाचा अर्थसंकल्प आणि शासनाकडून मिळणारी अनुदाने.

११. (१) आयोग, प्रत्येक वर्षी, एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून प्रारंभ होणाऱ्या पुढील वित्तीय वर्षासाठी, त्याचे उत्पन्न आणि खर्च यांचे अर्थसंकल्पीय अंदाज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा दिनांकापूर्वी तयार करील आणि ते शासनाकडे पाठवील.

(२) शासन, या बाबतीतील कायद्याद्वारे राज्य विधानमंडळाकडून यथोचित विनियोजन करण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता वापर करण्यासाठी, त्यास योग्य वाटतील अशा रकमा अनुदानांच्या स्वरूपात आयोगास देईल.

(३) या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी, आयोगाला, त्यास योग्य वाटतील अशा रकमा अनुदानातून खर्च करता येतील आणि अशा रकमा, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून देय असलेला खर्च म्हणून समजण्यात येतील.

लेखे व लेखापरीक्षा.

१२. (१) आयोगाचे उत्पन्न व खर्च यांचे लेखे, विहित करण्यात येतील अशा नियमांनुसार ठेवण्यात येतील.

(२) आयोग, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(३) आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, शासन नियुक्त करील अशा लेखापरीक्षकांकडून आणि भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांच्या कार्यालयाकडून दरवर्षी करण्यात येईल.

(४) लेखापरीक्षकाला, लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी, आयोगाचे सर्व लेखे आणि इतर अभिलेख पाहता येतील.

(५) आयोग, लेखापरीक्षेसाठी विहित करण्यात येईल असा खर्च अनुदानातून देईल.

(६) लेखापरीक्षकांकडून अहवाल मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, आयोग, लेख्यांच्या वार्षिक विवरणपत्राची एक प्रत, लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या प्रतीसह, शासनाकडे पाठवील आणि विहित करण्यात येईल अशा पध्दतीने लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र प्रसिध्द करण्याची व्यवस्था करील.

(७) शासन, लेखापरीक्षकांच्या अहवालाचे अवलोकन केल्यानंतर, त्यास योग्य वाटतील असे निदेश आयोगास देईल आणि आयोग अशा निदेशांचे पालन करील.

वार्षिक अहवाल.

१३. आयोग, मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्याचा पूर्ण वृत्तांत देणारा, त्याचा वार्षिक अहवाल, प्रत्येक वित्तीय वर्षासाठी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यांमध्ये व अशा वेळी तयार करील आणि त्याची एक प्रत शासनाकडे पाठवील.

वार्षिक अहवाल व लेखापरीक्षा अहवाल राज्य विधानमंडळासमोर ठेवणे.

१४. (१) शासन, वार्षिक अहवाल, त्यामधील राज्य शासनाशी संबंधित असतील अशा शिफारशींच्या संबंधात केलेल्या कारवाईसंबंधीचे ज्ञापन आणि अशा कोणत्या शिफारशी स्वीकारण्यात आल्या नसल्यास त्यासंबंधीची कारणे व लेखापरीक्षा अहवाल, ते अहवाल मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

(२) आयोगास, राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या निदेशानुसार, लोकहिताच्या असलेल्या अशा कोणत्याही बाबीवरील विशेष अहवाल वेळोवेळी शासनास सादर करता येतील.

प्रकरण पाच

संकीर्ण

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.

१५. या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार, सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात आयोग किंवा आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा त्याचा कोणताही सदस्य किंवा आयोगाच्या निदेशांनुसार कृती करणारी कोणतीही व्यक्ती, यांच्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि कर्मचारीवर्ग लोकसेवक असणे.

१८६० चा ४५.

१६. आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य तसेच या अधिनियमाखालील कर्तव्ये पार पाडण्यासाठी आयोगाकडून नियुक्त किंवा प्राधिकृत करण्यात आलेला प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

नियम करण्याचा अधिकार.

१७. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी, शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि तो अशा प्रकारे ज्या अधिवेशनामध्ये ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करावा म्हणून किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि तशा आशयाचा आपला निर्णय ते **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा निर्णयाच्या **राजपत्रातील** प्रसिद्धीच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिती, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्यांचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

१८. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, शासनास, प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २९ याचे निरसन व व्यावृत्ती.

२००४ चा महा. अध्या. २९.

१९. (१) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अध्यादेश, २००४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाखाली करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) या अधिनियमाखाली करण्यात आलेली गोष्ट किंवा यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

परिशिष्ट-४

३) अल्पसंख्याकांसाठी विविध योजना :-

❖ **राज्यातील अल्पसंख्यांक लोकसमूहातील महिलांसाठी स्वयंसहाय्यता बचतगट :-**

अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांमध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध, जैन व पारशी या लोकसमूहातील महिलांचे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यास शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि.२८/०२/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर क्षेत्र (मुंबई शहर व मुंबई उपनगर), नांदेड, मालेगांव (जि.नाशिक), कारंजा (जि. वाशिम), परभणी, पुणे, नागपूर, औरंगाबाद, भिंवडी, मुंब्रा-कौसा(जि. ठाणे) आणि मिरज (जि.सांगली) या ११ शहरांमध्ये अल्पसंख्यांक महिलांचे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेची अंमलबजावणी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु. २ कोटी एवढी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

❖ **मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबद्ध योजना :-**

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्याकरिता केंद्रिय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकींग सेवा इ. स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण आणि इ. १० वी व १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक उमेदवारांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करण्यासाठी राज्यातील विश्वसनीय अशा नामांकित बिगर शासकीय खाजगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंध्द योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई, ठाणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर नाशिक व पुणे या शहरांमध्ये प्रशिक्षण केंद्रांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

या योजनेंतर्गत नागरी सेवा परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.२५,०००/- किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल. राज्य नागरी सेवा परिक्षांच्या (राजपत्रित) परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.२०,०००/- किंवा संस्थेमार्फत आकरण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल. राज्य नागरी सेवा परिक्षांच्या (अराजपत्रित) परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.१५,०००/- किंवा संस्थेमार्फत आकरण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल. बँकिग सेवा परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.८,०००/- किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल. तांत्रिक /व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशांकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार प्रति वर्ष रु.२०,०००/- किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल. (२ वर्षासाठी कमाल मर्यादा रु. ४०,०००/-). इ. १० वी व १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी विशेष शिकवणी वर्ग परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना इ. १० वी साठी प्रति उमेदवार रु.४,०००/- व इ. १२ वी साठी प्रति उमेदवार रु. ५,०००/- एवढी रक्कम किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदर योजनेंतर्गत खालीलप्रमाणे उमेदवारांना विविध प्रशिक्षण वर्गामध्ये प्रशिक्षण देणे प्रस्तावित आहे :-

प्रशिक्षण वर्ग			
लोकसेवा आयोग स्पर्धा परिक्षा	UPSC		२५०
	MPSC	राजपत्रित	२५०
		अराजपत्रित	५००
		एकूण	१०००
बँकिंग सेवा परिक्षा	४००		
तांत्रिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम	अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र		२००
	वैद्यकिय		२००
	संगणक लेखापाल,व्यवस्थापन, विधी व तत्सम		२००
		एकूण	६००
माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष शिकवणी वर्ग	१० वी	१०००	
	१२ वी	१०००	

❖ **अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, अपंग शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांमध्ये पायाभूत सोयी — सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना :-**

अ) योजनेचा लक्ष्यगट — राज्यातील ज्या शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांमध्ये ७० % व अपंग शाळांमध्ये ५० % पेक्षा जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा शाळा/ औद्योगिक प्रशिक्षण संस्था

ब) योजनेचे उद्दीष्ट :- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्राबल्य असलेल्या राज्यातील शाळांमध्ये /औद्योगिक प्रशिक्षण संस्थामंध्ये पायाभूत सोयी — सुविधा उपलब्ध करुन देवून शिक्षणाचा दर्जा उंचावणे.

क) योजना :- या योजनेंतर्गत राज्यातील ज्या शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये ७०% व अपंग शाळांमध्ये ५०% पेक्षा जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा शाळांच्या इमारतीची नुतनीकरण व डागडुजी, शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे, ग्रंथालय अद्ययावत करणे,प्रयोगशाळा उभारणे/ अद्ययावत करणे, संगणक कक्ष उभारणे/अद्ययावत करणे,प्रसाधनगृह/स्वच्छतागृह उभारणे/डागडुजी करणे, बेंचेस , पंख्याची व्यवस्था करणे, इन्व्हर्टरची सुविधा निर्माण करणे व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य इ.साठी कमाल रु.२.०० लक्ष पर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

या योजनेंतर्गत मागील ५ आर्थिक वर्षामध्ये वितरीत करण्यात आलेला निधी व लाभार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	वर्ष	वितरीत निधी	लाभार्थ्यांची संख्या
१	२००८-०९	२१.९९ कोटी	११०७ शाळा
२	२००९-१०	२४.६४ कोटी	१२३२ शाळा
३	२०१०-११	३७.२६ कोटी	१८६३ शाळा
४	२०११-१२	४१.९० कोटी	२१११ शाळा
५	२०१२-१३	३४.७२ कोटी	१८७२ शाळा
	एकूण	**१६०.५१ कोटी**	**८१८५ शाळा**

ड) योजनेकरिता आर्थिक तरतूद (सन २०१३-१४)- रु. ४०.०० कोटी
इ) भौतिक उद्दिष्ट :- २००० शाळा
ई) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- जिल्हाधिकारी कार्यालय/अल्पसंख्याक विकास विभाग

❖ **डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना**

अ) योजनेचा लक्ष्यगट —राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेले मदरसे
ब) योजनेचे उद्दीष्ट :- असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना मदरशांमध्ये शिकत समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे आधुनिक शिक्षण देणे

क) योजना :- मदरशांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयाचे शिक्षण देणे त्याकरीता शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, इ. १० वी, इ. ११वी व इ. १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, यादृष्टीने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सविधा, ग्रंथालय,इ. साठी अनुदान देणे.

शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे :-

अ.क्र.	इयत्ता	एकूण विद्यार्थी	शिष्यवृत्तीची रक्कम
१	९ वी व १० वी	६००	रु.४,०००/-
२	११ वी, १२ वी व ITI	४००	रु.५,०००/-

ड) योजनेकरीता आर्थिक तरतूद :- सन २०१३-१४ करीता १०.०० कोटी.

इ) भौतिक उद्दीष्ट :- २०० मदरसे

ई) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- जिल्हाधिकारी कार्यालय व अल्पसंख्याक विकास विभाग

❖ **उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना -**

अ) योजनेचा लक्ष्यगट :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उच्च व तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेत असलेले विद्यार्थी.
ब) योजनेचे उद्दिष्ट :-अल्पसंख्याक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्रेरीत करणे.
क) योजना :- या योजनेतंर्गत अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात आलेल्या वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु.२५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. तसेच संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व स्त्रोतांव्दारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत मागील ५ आर्थिक वर्षामध्ये वितरीत करण्यात आलेला निधी व लाभार्थ्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	वर्ष	वितरीत निधी	लाभार्थ्यांची संख्या
१	२००८-०९	११.८५ कोटी	६२९०
२	२००९-१०	३४.७९ कोटी	१५६४८
३	२०१०-११	५६.०४ कोटी	२४३५१
४	२०११-१२	७०.१८ कोटी	२७६६९
५	२०१२-१३	७५.८३कोटी	३२००० (अंदाजित)
एकूण		**२४८.६९ कोटी**	

ड) योजनेकरिता आर्थिक तरतूद (सन २०१३-१४) - रु. ७३ ००.कोटी

इ) भौतिक उद्दिष्ट :- दरवर्षी १९५०० नवीन विद्यार्थी अधिक नुतनीकरणाच्या शिष्यवृत्ती

ई) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- संचालक (वैद्यकिय शिक्षण), वैद्यकिय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

❖ **राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांत मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम योजना :-**

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सन २००८ – ०९ या वर्षापासून राज्यातील अल्पसंख्याक संकेंद्रीत नागरी क्षेत्रांत मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला असून केंद्र शासनाने निश्चित केलेल्या महाराष्ट्रातील ४३ अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांसाठी तसेच ज्या शहरांच्या एकूण लोकसंख्येपैकी किमान १० % लोकसंख्या अल्पसंख्याकांची आहे, अशा शहरातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांसाठी अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. या योजनेंतर्गत महानगरपालिकांना कमाल रु. २० लाख, अ वर्ग नगरपालिकांना कमाल रु. १५ लाख तर ब वर्ग नगरपालिकांना कमाल रु. १० लाख इतके अनूदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

या योजनेंतर्गत सन २०१२-१३ या वर्षात १२८ महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायती यांना एकूण रु. १४,४०,००,०००/- एवढे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

सदर योजना सन २०१३-१४ या वर्षातही राबविण्यात येत असून याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येईल.

❖ **राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रमीण क्षेत्रांत मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम योजना :-**

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रमीण क्षेत्रांत मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन ग्रमीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमूहातील नागरीकांच्या जीवनानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि.१४/५/२०१३ अन्वये सन २०१३-१४ या वर्षापासून ग्रामीण क्षेत्रविकास कार्यकम कार्यान्वित करण्यात आला आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक लोकसुहाची (मुस्लिम, ख्रिश्चन,शीख, बौद्ध, जैन व पारसी) लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ग्रामपंचायतींना अनुज्ञेय पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठी योजनेच्या विहीत कार्यपद्धती व निकषांनुसार प्रति ग्रामपंचायत कमाल रु. १० लक्ष एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. सन २०१३-१४ या वर्षासाठी ४४० ग्रामपंचायतींना योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

❖ **अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांसाठी केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्रीय विकास कार्यकम :-**

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कामकाज मंत्रालयाने लोकसंख्या, सामाजिक व आर्थिक स्थिती आणि मूलभूत सुविधांची उपलब्धता या मानकाच्या आधारे महाराष्ट्रातील परभणी, बुलढाणा, वाशिम व हिंगोली हे चार जिल्हे मागासलेले अल्पसंख्याक बहुल जिल्हे म्हणून घोषित केले असून या जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत इंदिरा आवास योजनेखाली ११६७० घरकुले, अंगणवाडी योजनेंतर्गत ६२६ अंगणवाडी केंद्रे आणि अल्पसंख्याक मुलींसाठी १४ वसतीगृहे उभारण्यात येत आहेत.

१२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये ९ जिल्ह्यातील ८ तालुके व ६ शहरांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

